THE MAHARASHTRA ASSOCIATION OF ANTHROPOLOGICAL SCIENCES

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे नियतकालिक

वर्ष : ३१ वे
अंक : पहिला/दुसरा

# हाकारा

जानेवारी–जून २०१०









## आदिवासी मोखाडा तालुक्याची सामाजिक व आर्थिक स्थिती

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे

**आधारस्तंभ : डॉ. रजनीकांत आरोळे**

पद्मभूषण, मॅगसेसे पुरस्काराने सन्मानित, संचालक – सर्वांगीण ग्रामीण आरोग्य प्रकल्प, जामखेड
आणि स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी (राष्ट्रीय ग्रामीण विकास कार्यक्रम)

## कार्यकारी मंडळ (२०१० – २०१३)

| | | |
|---|---|---|
| संस्थापक-अध्यक्ष | : | **प्राध्यापक रा. के. मुटाटकर,** वैद्यकीय मानवशास्त्र |
| उपाध्यक्ष | : | **डॉ. मोहन दिगंबर गुप्ते,** साथरोग शास्त्रज्ञ |
| खजिनदार | : | **श्री. संजीव नरहरी खडके,** वित्तीय प्रशासक |
| सचिव | : | **श्री. गणपत पंडित**<br>अभ्यासक, मराठी वाङ्मय व कार्यकारी संपादक 'हाकारा' |
| सहसचिव | : | **डॉ. शौनक कुलकर्णी**<br>प्रपाठक, मानवशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ |
| कार्यकारी सदस्य | : | **डॉ. चंद्रकांत एस. पांडव**<br>प्राध्यापक आणि प्रमुख, सेंटर फॉर कम्युनिटी मेडिसीन,<br>अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था, दिल्ली |
| | | **डॉ. रमेश अवस्थी,** समाज शास्त्रज्ञ |
| | | **डॉ. बाबुल पठाण,** सामाजिक कार्यकर्ते, बांधकाम व्यावसायिक |
| | | **डॉ. राम गंभीर,** प्रपाठक, मानवशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ |
| | | **डॉ. सौ. कल्पना मुटाटकर,** स्त्री-रोग तज्ञ, संशोधन सल्लागार |
| | | **ॲड. सुरेखा दळवी,** ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या |
| | | **श्री. जयवंत मंत्री,** सामाजिक कार्यकर्ते |
| | | **डॉ. सतीश डुंबरे,** आयुष विशेषज्ञ |

कष्टकरी जनता, भूषण भारता। वंदन करितो पददलिता।।

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे नियतकालिक

संपादक
रामचंद्र मुटाटकर

# हाकारा (त्रैमासिक)

कार्यकारी संपादक
ग. शां. पंडित

वर्ष : ३१ वे | जानेवारी-जून २०१० | अंक : पहिला/दूसरा

## डॉ. जयवंत इंगळे

यांच्या 'मोखाडा तालुक्याचा सामाजिक-आर्थिक पाहणी अभ्यास' या प्रबंधावर आधारीत विशेषांक

## अनुक्रमणिका

संपादकीय ---------------------------------------------- २

१. आदिवासी कुटुंबांच्या उत्पन्न व खर्चाचा अभ्यास ---------------------- ५

२. आदिवासींना भेडसावणारी उपासमार --------------------------- ३५

३. आदिवासींचे स्थलांतर ---------------------------------- ४९

४. आदिवासी समाजातील साक्षरता ------------------------------ ५९

५. आदिवासींच्या राहणीमानाचा अभ्यास --------------------------- ७३

६. दुसऱ्याची जमीन खंडाने कसणाऱ्या ---------------------------- ८९
आदिवासींच्या खंडाच्या शेतीचा अभ्यास

◆ **पत्रव्यवहाराचा पत्ता**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७.
दूरध्वनी : (०२०)२५८९७२९८

अंक मूल्य ८०/- रूपये

◆ **अक्षर जुळणी**
नंदू हि. दिघे

◆ **मुद्रण स्थळ**
ओम एंटरप्राईजेस, पुणे

◆ **सहकार्य**
सुशिल कहात

◆ **मुद्रक व प्रकाशक**
रा. के. मुटाटकर
अध्यक्ष, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

◆ **मुखपृष्ठ**
आदिवासी उत्थान
कार्यक्रमाची छायाचित्रे

**या अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.**

या अंकास महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने अनुदान दिले असले तरी अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

# संपादकीय

'हाकारा'चा हा जोड विशेषांक ठाणे जिल्ह्यातील मोखाडा या आदिवासी तालुक्याच्या सामाजिक-आर्थिक पाहणी-अभ्यासावर आधारीत आहे. डॉ. जयवंत इंगळे यांनी आपल्या संशोधनपर प्रबंधलेखनासाठी मोखाडा या आदिवासी तालुक्याची निवड केली. या प्रबंधातील निवडक लेखांवर हा विशेषांक प्रकाशित होत आहे.

ठाणे जिल्हा हा सह्याद्रीच्या रांगेतील उत्तर कोकणचा भाग. सुमारे ६०-६५ टक्के आदिवासी लोकसंख्या असलेल्या तालुक्यापैकी मोखाडा हा एक दुर्गम तालुका म्हणून ओळखला जातो. निसर्गाचा वरदहस्त लाभलेल्या या तालुक्यात कोकणा, वारली, ठाकर व कातकरी आदी आदिवासी जमातींचा अधिवास आहे. डोंगर-दऱ्यांनी वेढलेल्या या तालुक्यातील जनतेचे उपजिविकेचे साधन शेती व मजुरी एवढेच आहे. भात, नाचणी, उडीद, वरई आदी पिके घेतली जातात; पण तीही पावसावरच अवलंबून. पावसाचे प्रमाण अधिक असले तरी नियोजनाच्या अभावामुळे पाण्याचे दुर्भिक्ष्य देखील तेवढेच जाणवते.


नापीक जमिनीचे क्षेत्र अधिक असल्यामुळे व कमालीचे दारिद्र्य असल्याने पाण्याच्या नैसर्गिक स्त्रोतांचा लाभ येथील आदिवासींना घेता येत नाही. त्यामुळे मजुरीसाठी मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होते. याशिवाय कुपोषण व उपासमारीने होणारे मृत्यू या कारणांसाठी देखील हा तालुका कुप्रसिद्ध आहे.

डॉ. जयवंत इंगळे यांनी मोखाडा तालुक्यातील ४२० कुटुंबांचा अभ्यास केला आहे. त्यातून त्यांना जाणवलेल्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक इत्यादी परिस्थितीचे विश्लेषण त्यांनी या अंकात मांडले आहे. विशेषत: ज्या आदिवासी जमाती येथे राहतात त्यांपैकी कोणत्या जमातींमध्ये अधिक मागासलेपण आहे व ते का आहे, याची सविस्तर माहिती त्यातून आपल्याला मिळते.

विद्यापीठात संशोधन करणाऱ्या अभ्यासकांना, सामाजिक कार्यकर्त्यांना, विचारवंतांना व सर्वसामान्यांना देखील यातून बरीच उपयुक्त माहिती उपलब्ध होऊ शकते. तसेच आदिवासींमधील समस्यांची जाणीव देखील होते.

या अंकाबाबतच्या आपल्या प्रतिक्रिया/अभिप्राय जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

**ग. शां. पंडित**
कार्यकारी संपादक



# लेखक - डॉ. जयवंत इंगळे
## अल्प परिचय

रयत शिक्षण संस्थेच्या मंचर येथील अण्णासाहेब आवटे महाविद्यालयात डॉ. जयवंत इंगळे हे असोसिएट प्रोफेसर आणि व्यावसायिक अर्थशास्त्र विभागप्रमुख या पदावर ५ वर्षांपासून काम करीत आहेत. संस्थेच्या सातारा, कोल्हापूर, सोलापूर, ठाणे व रायगड या जिल्ह्यांतील विविध महाविद्यालयात सिनियर विभागात अर्थशास्त्र विषयाचे प्राध्यापक म्हणून त्यांनी काम केले आहे. डॉ. इंगळे यांनी अर्थशास्त्रात पीएच.डी. प्राप्त केली आहे. त्यांना सलग ५ वर्षे भारत सरकारची राष्ट्रीय पातळीवरील मेरिट स्कॉलरशिप मिळालेली आहे. वक्तृत्व, निबंध, कथालेखन आणि कथाकथन, एकांकिका, अभिनय, काव्यलेखन इत्यादी स्पर्धांमध्ये शालेय आणि महाविद्यालयीन जीवनात जवळजवळ १०० पारितोषिके त्यांना मिळालेली आहेत.


डॉ. इंगळे त्यांच्या संशोधनपर लेखनासाठी ओळखले जातात. त्यांच्या आर्थिक आणि सामाजिक विषयांवरील विविध लेखांना आणि शोधनिबंधांना राज्य व राष्ट्रीय पातळीवरील २० पारितोषिके मिळाली आहेत. त्यातील काही महत्त्वाचे पुरस्कार असे : 'भारतातील कृषीमाल बाजार व्यवस्थेच्या समस्या आणि उपाय' या त्यांच्या शोधनिबंधाला राज्य पातळीवरील द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार, 'जागतिकीकरण : फेरविचार आवश्यक' या वैचारिक लेखास 'लोकमत'चा पत्रपंडित पा. वा. गाडगीळ सामाजिक-आर्थिक विकास लेखन राज्यस्तरीय पुरस्कार', 'प्रश्न स्थलांतरित आदिवासींचे' या वैचारिक लेखाला 'लोकमत'चा 'पत्रपंडित पा. वा गाडगीळ पुरस्कार'. तर बालमृत्यूच्या प्रश्नावर लिहिलेल्या संशोधनपर लेखाला 'लोकमत'चाच ५,००० रुपयांचा 'पा. वा. गाडगीळ राज्यस्तरीय पुरस्कार' नुकताच जाहीर झाला आहे.

राष्ट्रीय पातळीवरील अर्थशास्त्र विषयाच्या प्राध्यापकांची संघटना असलेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेची राष्ट्रीय पातळीवरील सर्वोत्कृष्ट शोधनिबंधासाठीची प्रथम क्रमांकाची दोन पारितोषिके डॉ. इंगळे यांना मिळाली अहेत. 'ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील आदिवासींच्या दारिद्र्याची समस्या' या शोधनिबंधाला मराठी अर्थशास्त्र परिषदेचे 'कै. ग. प्र. पिंपरकर आणि कांतीभाई ठक्कर ऋणमुक्ती प्रतिष्ठाना'चे 'डॉ. अमर्त्य सेन पारितोषिक' प्राप्त झाले आहे. कोकणातील आदिवासी समस्यांच्या गर्तेत, 'आदिवासी समाजातील बालमृत्यू-समस्या व उपाय', 'भारतीय शेतीवरील मानवी गडांतरे' या वैचारिक लेखांना अकोला येथील अंकुर साहित्य संघाचे राज्य पातळीवरील ३ पुरस्कार मिळाले आहेत. आकाशवाणीच्या विविध केंद्रांवरून त्यांची भाषणे प्रसारित होत असतात. आदिवासी भागात नोकरी करीत असताना आदिवासी गाव स्वच्छता मोहीम, आरोग्य शिबिर, अंधश्रद्धा निर्मूलन, आदिवासी महिला शिबिर इत्यादी शिबिरे व कार्यक्रमांचे आयोजन त्यांनी केले. २ ते ४ फेब्रुवारी २००७ या कालावधीत नागपूर येथे झालेल्या ८० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील कविवर्य सुरेश भट स्मृती गझल वाचन कार्यक्रमात गझल सादर करण्यासाठी निमंत्रित करण्यात आले होते. काही मराठी गझलांना राज्य पातळीवरील पारितोषिकेही मिळाली आहेत.


*(साभार : लोकमत, १४ जुलै २०१० )*

# ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्याचे स्थान आणि महत्त्वाची आकडेवारी

ठाणे जिल्हा →




मोखाडा तालुका →




| बाब | संख्या |
|---|---|
| एकूण गावे | ५९ |
| ग्रामपंचायती | २८ |
| **लोकसंख्या** | |
| एकूण | ६७३१९ |
| पुरुष | ३४,०८० |
| स्त्रिया | ३३,२३९ |
| अनुसूचित जाती | ६०३ |
| अनुसूचित जमाती | ६०,९६४ |
| **साक्षरता** | |
| एकूण | ५१.५३ |
| पुरुष | ६२,७० |
| स्त्रिया | ४०.०६ |
| **जमिनीचा वापर (०० हेक्टर)** | |
| भौगोलिक क्षेत्र | ४८९ |
| जंगलव्याप्त | १३६ |
| लागवडीखालील | २७६ |
| ओलिताखालील | – |
| **पिकांखालील क्षेत्र (०० हेक्टर)** | |
| भात | १९ |
| नाचणी | ३१ |
| वरी | ७२ |
| **प्राथमिक शैक्षणिक संस्था** | |
| संस्था | १४५ |
| शिक्षक | ३३८ |
| विद्यार्थी | ९,९९३ |

# अदिवासी कुटुंबांच्या उत्पन्न व खर्चाचा अभ्यास

## प्रास्ताविक

महाराष्ट्रातील बहुसंख्य आदिवासींचे वास्तव्य डोंगराळ व जंगल भागात आहे. बिगर आदिवासी उपभोग घेत असलेली रेडिओ, दूरदर्शन सारखी करमणुकीची, प्रवासी वाहतुकीची साधने इत्यादी काही सुविधा आदिवासी भागात पोहचल्या असल्या तरी या सुविधा पुरेशा प्रमाणात पोहचलेल्या नाहीत. तसेच या सुविधांचा लाभ घेणाऱ्या आदिवासींचे प्रमाणही खूप कमी आहे. म्हणून तशा अर्थाने सुद्धा आदिवासी प्रदेशातील बराचसा भाग आजही दुर्गम आणि अतिदुर्गमच ठरतो.

प्रस्तुत संशोधन विषयाची प्रमुख उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१) आदिवासी लोकांच्या उत्पन्नाच्या साधनांचा अभ्यास करणे.

२) आदिवासींच्या उपभोग खर्चाचा अभ्यास करणे.

या भागात महाराष्ट्रातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आदिवासी कुटुंबांची त्यांच्या उत्पन्न मर्यादेनुसार वर्गवारी दिली आहे. तसेच आदिवासी कुटुंबांच्या उत्पन्नाची साधन निहाय वर्गवारी दर्शविली आहे.

खालील तक्त्यात बेंचमार्क सर्व्हेक्षण १९९६-९७ नुसार आदिवासी उपयोजना क्षेत्रातील अनुसूचित जमातीच्या कुटुंबांची त्यांच्या उत्पन्न मर्यादेनुसार वर्गवारी दर्शविली आहे.

तक्ता क्रमांक - १

| अ.क्र. | उत्पन्न मर्यादा | अनुसूचित जमातीच्या कुटुंबांची संख्या | उत्पन्न मर्यादेनुसार अनुसूचित जमातीच्या कुटुंबांची टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | रूपये २००० पर्यंत | 26944 | 4.25 |
| 2 | रूपये २००१ ते ३६०० | 92510 | 14.58 |
| 3 | रूपये ३६०१ ते ५००० | 178116 | 28.07 |
| 4 | रूपये ५००१ ते ७००० | 144192 | 22.72 |
| 5 | रूपये ७००१ ते ११००० | 136374 | 21.49 |
| 6 | रूपये ११००१ ते २०००० | 37893 | 5.97 |
| 7 | रूपये २०००१ व त्यावरील | 18551 | 2.92 |
| | एकूण | **634580** | **100.00** |

*संदर्भ: वार्षिक आदिवासी उपयोजना, २००८-२००९ महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, पृ.क्र. ४८६*

वरील तक्त्यावरून असे दिसते की, १९९६-९७ च्या बेंचमार्क सर्व्हेक्षणानुसार २०००० रूपयांपर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण ९७.०८ टक्के एवढे आहे. तर २०००१ आणि त्यावरील वार्षिक उत्पन्न असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण केवळ २.९२ टक्के इतके आहे. रूपये २००० पर्यंत

वार्षिक उत्पन्न असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण ४.२५ टक्के एवढे असल्याचे वरील तक्त्यावरून दिसून येते. रूपये ३६०१ ते ५००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण मोठे असून ते २८.०७ टक्के इतके आहे.

खालील तक्त्यात बेंचमार्क सर्व्हेक्षण १९९६-९७ नुसार अनुसूचित जमातीच्या कुटुंबांच्या उत्पन्नाची साधन निहाय वर्गवारी व टक्केवारी दर्शविली आहे.

तक्ता क्रमांक २

| अ.क्र. | उत्पन्नाची साधने | एकूण उत्पन्नाशी टक्केवारी |
|---|---|---|
| १ | शेती | 43.41 |
| २ | शेतमजूर | 35.80 |
| ३ | वन मजूर | 2.75 |
| ४ | व्यापार | 0.75 |
| ५ | नोकरी | 13.50 |
| ६ | दूध | 1.23 |
| ७ | इतर साधने | 2.56 |
| | एकूण | 100.00 |

संदर्भः वार्षिक आदिवासी उपयोजना, २००८-२००९ महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, पृ.क्र. ४८६

वरील तक्त्यात महाराष्ट्रातील आदिवासींच्या उत्पन्नाचे स्त्रोत दर्शविले आहेत. तसेच एकूण उत्पन्नात प्रत्येक स्त्रोताचा किती वाटा आहे ते दर्शविले आहे. वरील तक्त्यावरून असे दिसते की, शेती आणि शेतमजुरी ही आदिवासींच्या उत्पन्नाची प्रमुख साधने आहेत. तर व्यापार, नोकरी इत्यादी व्यवसायामध्ये गुंतलेल्या आदिवासी लोकांचे प्रमाण अत्यंत अल्प आहे. कारण एकूण उत्पन्नात या स्त्रोतांपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वाटा अत्यंत अल्प आहे.

**वार्षिक प्राप्तीनुसार आदिवासी कुटुंबांचे वर्गीकरण:-**

मोखाडा तालुक्यातील सर्व्हेक्षित विविध सात जमातीतील ४२० कुटुंबांचे वर्गीकरण वार्षिक प्राप्तीनुसार खालील तक्त्यात दर्शविले आहे.

तक्ता क्रमांक - ३

| अ. क्र. | उत्पन्न गट (रूपये) | जमातीनुसार कुटुंबांची संख्या व शेकडा प्रमाण | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | महादेव कोळी | ढोर कोळी | कातकरी | वारली | कोकणा | म ठाकूर | क ठाकूर | एकूण |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 1 | रूपये २०००० पर्यंत | 29 (14.15) (48.33) | 37 (18.53) (63.34) | 19 (9.27) (31.67) | 28 (13.66) (46.66) | 27 (13.17) (45.00) | 27 (13.17) (45.00) | 37 (18.05) (61.67) | 205 (100) (48.80) |
| 2 | रूपये २०००१ ते ३०००० | 22 (15.83) (36.67) | 18 (12.95) (30.00) | 22 (15.83) (36.67) | 22 (15.83) (36.67) | 25 (17.98) (41.67) | 16 (11.51) (26.67) | 14 (10.07) (23.33) | 139 (100) (33.10) |
| 3 | रूपये ३०००१ ते ४०००० | 02 (5.00) (3.33) | 04 (10.00) (6.66) | 11 (27.50) (18.33) | 06 (15.00) (10.00) | 06 (15.00) (10.00) | 10 (25.00) (16.66) | 01 (2.50) (1.66) | 40 (100) (9.53) |
| 4 | रूपये ४०००१ च्या पुढे | 07 (19.45) (11.67) | 0 | 08 (22.22) (13.33) | 04 (11.11) (6.67) | 02 (5.55) (3.33) | 07 (19.45) (11.67) | 08 (22.22) (13.34) | 36 (100) (8.57) |
| | एकूण | 60 (100) | 60 (100) | 60 (100) | 60 (100) | 60 (100) | 60 (100) | 60 (100) | 420 (100) |

१. *संदर्भ: प्राथमिक सर्व्हेक्षण*

२. *स्तंभ क्रमांक ३ ते ९ मधील वरच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी उत्पन्नाच्या एका विशिष्ट गटानुसार एका जमातीतील कुटुंबांचे उत्पन्नाच्या त्याच एका विशिष्ट गटानुसार विविध सात जमातीतील एकुण कुटुंबांशी असणारे शेकडा प्रमाण दर्शविते.*

३. *स्तंभ क्रमांक ३ ते ९ मधील खालच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका विशिष्ट जमातीतील एका उत्पन्न गटातील कुटुंबांचे त्याच एका विशिष्ट जमातीतील सर्व उत्पन्न गटातील एकूण कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

४. *स्तंभ क्रमांक १० मधील खालच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी सर्व्हेक्षित सर्व सात जमातीतील एका उत्पन्न गटातील कुटुंबांचे सर्व जमातीतील सर्व प्रकारच्या उत्पन्न गटातील एकूण कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

वरील तक्त्यावरून असे दिसते की, रूपये २०,००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण सर्वात जास्त असून ते ४८.८० टक्के एवढे आहे. रूपये २०००१ ते ३०००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण ३३.१० टक्के एवढे आहे. ३०००१ ते ४०००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण ९.५३ टक्के आहे आणि रूपये ४०००१ च्या पुढे वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण सर्वात कमी म्हणजे ८.५७ टक्के एवढे आहे.

विविध जमातींचा तुलनात्मक विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की, रूपये २०,००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण ढोर कोळी या जमातीत असून ते १८.५३ टक्के आहे. त्या खालोखाल हे प्रमाण क ठाकूर या जमातीत असून ते १८.०५ टक्के आहे. रूपये २०,००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे सर्वात कती प्रमाण कातकरी या जमातीत असून ९.२७ टक्के एवढे आहे.

रूपये २०००१ ते ३०,००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण कोकणा या जमातीत असून ते १७.९८ टक्के आहे. त्या खालोखाल हे प्रमाण महादेव कोळी, कातकरी आणि वारली या जमातीत असून ते प्रत्येकी १५.८३ टक्के एवढे आहे. रूपये २०,००१ ते ३०,००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे सर्वात कमी प्रमाण क ठाकूर या जमातीत असून ते १०.०७ टक्के आहे.

रूपये ३०,००१ ते ४०,००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण कातकरी या जमातीत असून ते २७.५० टक्के एवढे आहे. त्याखालोखाल हे प्रमाण म ठाकूर या जमातीत असून ते २५.०० टक्के एवढे आहे. रूपये ३०,००१ ते ४०००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे सर्वात कमी प्रमाण क ठाकूर या जमातीत असून ते २.५० टक्के आहे. महादेव कोळी या जमातीत हे प्रमाण ५.०० टक्के आहे.

रूपये ४०,००१ च्या पुढे वार्षिक उत्पन्न असणाऱ्या आदिवसी कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण कातकरी आणि क ठाकूर या जमातीत असून ते प्रत्येकी २२.२२ टक्के एवढे आहे. त्या खालोखाल हे प्रमाण महादेव कोळी आणि म ठाकूर या जमातीत असून ते प्रत्येकी १९.४५ टक्के एवढे आहे. तर ढोर कोळी जमातीत हे प्रमाण शून्य आहे.

**महादेव कोळी**

एकेका जमातीचा स्वतंत्रपणे विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की, महादेव कोळी या जमातीत रूपये २०,००० पर्यंत वार्षिक उत्पन्न

असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण सर्वात जास्त असून ४८.३३ टक्के एवढे आहे. तर २०,००१ ते ३०००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ३६.६७ टक्के आहे. या जमातीत रूपये ३०,००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ८५ टक्के एवढे मोठे आहे. यावरून महादेव कोळी जमातीत दारिद्र्याचे प्रमाण किती मोठे आहे याची कल्पना येते. रूपये ३०,००१ ते ४०,००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण महादेव कोळी जमातीत ३.३३ टक्के आहे. तर रूपये ४०,००१ च्या पुढे उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ११.६७ टक्के एवढे आहे. याचा अर्थ या जमातीत रूपये ३०००१ च्या पुढे उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण केवळ १५.०० टक्के इतकेच आहे.

**ढोर कोळी**

ढोर कोळी या जमातीत रूपये २०००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ६३.३४ टक्के एवढे आहे. तर रूपये २०००१ ते ३०००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ३०.०० टक्के आहे. या जमातीत रूपये ३०००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ९३.३४ टक्के एवढे मोठे आहे. हे प्रमाण महादेव कोळी जमातीपेक्षा जास्त आहे. या प्रमाणावरून ढोर कोळी जमातीतील आदिवासींच्या भीषण दारिद्र्याची कल्पना येते. रूपये ४०००१ च्या पुढे वार्षिक उत्पन्न असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण ढोर कोळी जमातीत शून्य असून रूपये ३०००१ ते ४०००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण अवघे ६.६६ टक्के आहे.

**कातकरी**

कातकरी या जमातीत रूपये २०००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण ३१.६७ टक्के असून रूपये २०००१ ते ३०००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ३६.६७ टक्के आहे. रूपये ३०००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण या जमातीत ६८.३४ टक्के एवढे आहे. याही जमातीत दारिद्र्याचे प्रमाण मोठे आहे. परंतु महादेव कोळी आणि ढोरकोळी जमातीपेक्षा ते कमी आहे. कारण इतर जमातींच्या तुलनेत या जमातीची परगावी कामाच्या ठिकाणी राहण्याची किंवा थांबण्याची तसेच कष्टाची कामे करण्याची क्षमता जास्त असते. या जमातीत स्थलांतर करणाऱ्यांचे प्रमाण मोठे आहे. कातकरी जमातीत रूपये ३०००१ च्या पुढे उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ३१.६६ टक्के एवढे आहे.

**वारली**

वारली या जमातीत रूपये २०००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ४६.६६ टक्के एवढे आहे. तर रूपये २०००१ ते ३०००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ३६.६७ टक्के एवढे आहे. रूपये ३०००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण या जमातीत ८३.३३ टक्के एवढे आहे. यावरून याही जमातीत दारिद्र्याचे प्रमाण मोठे असल्याचे स्पष्ट होते. वारली जमातीत रूपये ३०००१ च्या पुढे उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण कमी असून ते १६.६७ टक्के एवढे आहे.

**कोकणा**

कोकणा या जमातीत रूपये २०००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ४५.०० टक्के एवढे आहे. तर रूपये २०००० ते ३०००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ४१.६७ टक्के एवढे आहे. या जमातीत रूपये ३०००० पर्यंत

वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ८६.६७ टक्के एवढे मोठे आहे. यावरून याही जमातीत दारिद्र्याचे प्रमाण मोठे असल्याचे स्पष्ट होते. कोकणा जमातीत रूपये ३०००१ ते ४०००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण १०.०० टक्के एवढे आहे. तर रूपये ४०००० पेक्षा अधिक वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण केवळ ३.३३ टक्के आहे.

**म ठाकूर**

वरील तक्त्यावरून असे दिसते की, म ठाकूर या जमातीत रूपये २०००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ४५.०० टक्के आहे. तर रूपये २०००१ ते ३०००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण २६.६७ टक्के आहे. रूपये ३०००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण या जमातीत ७१.६७ टक्के एवढे आहे. रूपये ३०००० च्या पुढे वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण म ठाकूर जमातीत २८.३३ टक्के एवढे आहे.

**क ठाकूर**

क ठाकूर या जमातीत रूपये २०००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ६१.६७ टक्के आहे. तर रूपये २०००१ ते ३०००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण २३.३३ टक्के आहे. रूपये ३०००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण या जमातीत ८५.०० टक्के एवढे मोठे आहे. यावरून याही जमातीत दारिद्र्याचे प्रमाण मोठे असल्याचे स्पष्ट होते. रूपये ३०००१ च्या पुढे वार्षिक उत्पन्न असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण क ठाकूर जमातीत १५.०० टक्के एवढे अल्प आहे.

वरील स्पष्टीकरणावरून असे लक्षात येते की, सर्वच आदिवासी जमातीत आर्थिक दृष्ट्या दुर्बल असणाऱ्यांचे प्रमाण मोठे आहे. सर्वच जमातीत ६८.०० टक्के पेक्षा जास्त आदिवासी कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न ३०००० रूपयापेक्षा कमी आहे. महादेव कोळी जमातीत रूपये ३०००० पेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ८५.०० टक्के, ढोरकोळी जमातीत ९३.३४ टक्के, कातकरी जमातीत ६८.३४ टक्के, वारली जमातीत ८३.३३ टक्के, कोकणा जमातीत ८६.६७ टक्के, म ठाकूर जमातीत ७१.६७ टक्के आणि क ठाकूर जमातीत ८५.०० टक्के आहे. कातकरी आणि म ठाकूर जमात वगळता इतर जमातीत हे प्रमाण ८५.०० टक्के पेक्षा जास्त आहे.

**उत्पन्नाच्या साधनानुसार वर्षभरात मिळालेले एकूण उत्पन्न**

खालील तक्त्यात उत्पन्नाची विविध साधने दर्शविली असून प्रत्येक साधनापासून सर्व्हेक्षित सर्व ४२० आदिवासी कुटुंबांना एकूण किती उत्पन्न मिळाले ते दर्शविले आहे. तसेच उत्पन्नाच्या प्रत्येक साधनाचा एकूण उत्पन्नातील शेकडा हिस्सा दर्शविला आहे.

तक्ता क्रमांक – ४

| अ.क्र. | उत्पन्नाचे साधन | वर्षभरात मिळालेले एकूण उत्पन्न | एकूण उत्पन्नात शेकडा हिस्सा |
|---|---|---|---|
| 1 | शेती | २२०००५५ | २१.३६ |
| 2 | मजुरी | ६१७९०७५ | ६०.०१ |
| 3 | नोकरी | १३२९६०० | १२.९१ |
| 4 | स्वयंरोजगार | ३८६५०० | ३.७६ |
| 5 | इतर | २००९०० | १.९६ |
|  | एकूण | **१०२९६१३०** | **१००** |

संदर्भः प्राथमिक सर्व्हेक्षण

वरील तक्त्यावरून असे दिसते की, शेती, मजुरी, नोकरी, स्वयंरोजगार इत्यादी आदिवासींच्या उत्पन्नाची पाच साधने असली तरी शेती आणि मजुरी हीच त्यांच्या उत्पन्नाची प्रमुख दोन साधने आहेत.

वरील तक्त्यावरून असे दिसते की, शेती, मजुरी इत्यादी पाच साधनापासून सर्व्हेक्षण केलेल्या सर्व ४२० आदिवासी कुटुंबांना एका वर्षात मिळालेले उत्पन्न १०२९६१३० रूपये एवढे आहे. आदिवासी कुटुंबांना सर्वात जास्त उत्पन्न मजुरी या साधनापासून प्राप्त झाले असून एकूण उत्पन्नात त्याचा शेकडा हिस्सा ६०.०१ टक्के एवढा आहे. त्याखालोखाल शेती या साधनाचा क्रम लागतो. शेतीपासून मिळालेल्या उत्पन्नाचा एकूण उत्पन्नात २१.३६ टक्के एवढा हिस्सा आहे. नोकरीपासून मिळालेल्या उत्पन्नाचा एकूण उत्पन्नातील हिस्सा १२.९१ टक्के एवढा आहे. नोकरी करणाऱ्या आदिवासींचे प्रमाण अत्यंत कमी असल्याने तसेच तृतीय आणि चतुर्थ श्रेणीच्या पदावर काम करणाऱ्यांचे प्रमाण मोठे असल्याने एकूण उत्पन्नात नोकरीपासून मिळालेल्या उत्पन्नाचा वाटा कमी आहे. स्वयंरोजगारापासून मिळालेल्या उत्पन्नाचा एकूण उत्पन्नातील वाटा ३.७६ टक्के आहे. तर उत्पन्नाच्या इतर साधनांपासून मिळालेल्या उत्पन्नाचा उत्पन्नाच्या सर्व साधनापासून मिळालेल्या एकूण उत्पन्नातील वाटा १.९६ टक्के इतका अल्प आहे.

**जमाती आणि उत्पन्नाच्या साधनानुसार एकूण वार्षिक उत्पन्न**

खालील तक्त्यात जमातीनुसार आणि उत्पन्नाच्या साधनानुसार सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबांचे सन २००३-२००४ या वर्षातील एकूण उत्पन्न दर्शविले आहे.

तक्ता क्रमांक - ५

| अ.क्र. | जमातीचे नाव | उत्पन्नाची साधने आणि त्यापासून मिळालेले उत्पन्न (रूपये) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | शेती | मजुरी | नोकरी | स्वयंरोजगार | इतर | एकूण उत्पन्न |
| 1 | महादेव कोळी | 499785 (30.04) (22.72) | 626475 (37.66) (10.13) | 472200 (28.38) (35.52) | 46000 (2.77) (11.91) | 19200 (1.15) (9.56) | 1663660 (100) (16.16) |
| 2 | ढोर कोळी | 98670 (9.00) (4.48) | 798175 (72.74) (12.92) | 3600 (0.32) (0.27) | 78000 (7.10) (20.18) | 118800 (10.84) (59.13) | 1097245 (100) (10.66) |
| 3 | कातकरी | 86515 (5.49) (3.94) | 1480575 (93.94) (23.97) | 0 | 9000 (0.57) (2.32) | 0 | 1576090 (100) (15.30) |
| 4 | वारली | 256685 (19.00) (11.67) | 894750 (66.20) (14.48) | 57600 (4.26) (4.33) | 95500 (7.06) (24.71) | 46900 (3.48) (23.34) | 1351435 (100) (13.13) |
| 5 | कोकणा | 487630 (34.11) (22.16) | 748750 (52.38) (12.12) | 154200 (10.79) (11.59) | 33000 (2.31) (8.53) | 6000 (0.41) (2.99) | 1429580 (100) (13.89) |
| 6 | म ठाकूर | 370370 (23.92) (16.84) | 936050 (60.46) (15.14) | 198000 (12.79) (14.90) | 40000 (2.58) (10.35) | 4000 (0.25) (1.99) | 1548420 (100) (15.03) |
| 7 | क ठाकूर | 400400 (24.57) (18.19) | 694300 (42.61) (11.24) | 444000 (27.24) (33.39) | 85000 (5.22) (22.00) | 6000 (0.36) (2.99) | 1629700 (100) (15.83) |
| | एकूण | 2200055 (21.36) (100) | 6179075 (60.01) (100) | 1329600 (12.92) (100) | 386500 (3.75) (100) | 200900 (1.96) (100) | **10296130 (100) (100)** |

१. *संदर्भ: प्राथमिक सर्व्हेक्षण*

२. *स्तंभ क्रमांक ३ ते ७ मधील वरच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका विशिष्ट जमातीतील उत्पन्नाच्या एका विशिष्ट स्त्रोतापासून वर्षभरात मिळालेल्या उत्पन्नाचे त्याच एका विशिष्ट जमातीला उत्पन्नाच्या सर्व स्त्रोतापासून वर्षभरात मिळालेल्या एकूण उत्पन्नाशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

३. *स्तंभ क्रमांक ३ ते ७ मधील खालच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीला उत्पन्नाच्या एका विशिष्ट स्त्रोतापासून वर्षभरात मिळालेल्या उत्पन्नाचे उत्पन्नाच्या त्याच विशिष्ट स्त्रोतापासून सर्व जमातीतील ४२० कुटुंबांना मिळालेल्या एकूण उत्पन्नाशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

४. *स्तंभ क्रमांक आठ मधील खालच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीला वर्षभरात उत्पन्नाच्या सर्व मार्गांनी मिळालेल्या एकूण उत्पन्नाचे सर्व्हेक्षित सर्व सात जमातींना वर्षभरात उत्पन्नाच्या सर्व स्त्रोतापासून मिळालेल्या एकूण उत्पन्नाशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

५. *स्तंभ क्रमांक २ मधील एकूण शब्दासमोरील वरच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी सर्व्हेक्षित सर्व सात आदिवासी जमातींना उत्पन्नाच्या एका स्त्रोतापासून वर्षभरात मिळालेल्या उत्पन्नाचे सर्व सात जमातींना उत्पन्नाच्या सर्व साधनापासून वर्षभरात मिळालेल्या एकूण १०२९६१३० रूपये उत्पन्नाशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

सर्व्हेक्षित सर्व सात जमातींचा तुलनात्मकदृष्ट्या विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की, विविध सात जमातीतील विविध जमातींचा सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबांना सन २००३-२००४ या वर्षात उत्पन्नाच्या सर्व मार्गांनी १०२९६१३० रूपये एवढे उत्पन्न मिळाले आहे. यामध्ये सर्वात जास्त उत्पन्न महादेव कोळी या जमातीला मिळाले आहे (१६.१६ टक्के). एकूण उत्पन्नात महादेव कोळी जमाती खालोखाल क ठाकूर जमातीचा वाटा असून तो १५.८३ टक्के आहे. कातकरी जमातीचा एकूण उत्पन्नातील वाटा १५.३० टक्के इतका आहे. एकूण उत्पन्नात सर्वात कमी वाटा ढोरकोळी या जमातीचा असून तो १०.६६ टक्के आहे.

आदिवासींच्या उत्पन्नाच्या विविध साधनांनुसार विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की, सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबांना सन २००३-२००४ या वर्षात उत्पन्नाच्या विविध साधनापासून १०२९६१३० रूपये एवढे उत्पन्न मिळाले आहे. या एकूण उत्पन्नात सर्वात जास्त वाटा मजुरी या साधनाचा असून तो ६०.०१ टक्के एवढा आहे. त्या खालोखाल वाटा शेती या साधनाचा आहे (२१.३६ टक्के). सर्व मार्गांनी मिळालेल्या एकूण उत्पन्नात नोकरीपासून मिळालेल्या उत्पन्नाचा हिस्सा १२.९२ टक्के इतका आहे. स्वयंरोजगारापासून मिळालेल्या उत्पन्नाचा वाटा ३.७५ टक्के इतका आहे. तर इतर साधनापासून मिळालेल्या उत्पन्नाचा वाटा १.९६ टक्के आहे. अशा प्रकारे उत्पन्नाच्या विविध स्त्रोतांपासून मिळालेल्या एकूण उत्पन्नात सर्वात जास्त वाटा मजुरी (६०.०१ टक्के) आणि शेती (२१.३६ टक्के) या साधनांचा आहे. त्यामुळे मजुरी आणि शेती ही आदिवासींच्या उत्पन्नाची प्रमुख साधने असल्याचे स्पष्ट होते.

उत्पन्नाच्या एकेका साधनाचा स्वतंत्रपणे विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की, विविध सात आदिवासी जमातींना शेती या साधनापासून सन २००३-२००४ या वर्षात २२०००५५ रूपये एवढे उत्पन्न मिळाले आहे. सर्व जमातींना शेतीपासून मिळालेल्या एकूण उत्पन्नात सर्वात जास्त वाटा महादेव

कोळी जमातीचा असून तो २२.७२ टक्के एवढा आहे. त्या खालोखाल कोकणा जमातीचा क्रम लागतो (२२.१६ टक्के). शेतीपासून मिळालेल्या एकूण उत्पन्नात क ठाकूर जमातीचा वाटा १८.१९ टक्के असून म ठाकूर जमातीचा १६.८४ टक्के तर वारली जमातीचा ११.६७ टक्के आहे. शेतापासून मिळालेल्या उत्पन्नात सर्वात कमी वाटा कातकरी जमातीचा असून तो ३.९४ टक्के आहे. तर ढोर कोळी जमातीचा वाटा ४.४८ टक्के आहे. वरील तक्त्यावरून असे दिसते की, विविध सात जमातींना शेतीपासून मिळालेल्या एकूण उत्पन्नात सर्वात जास्त वाटा महादेव कोळी (२२.७२ टक्के), कोकणा (२२.१६ टक्के), क ठाकूर (१८.१९ टक्के) आणि म ठाकूर (१६.८४ टक्के) आहे. वारली जमातीचाही शेतीपासून मिळालेल्या एकूण उत्पन्नातील वाटा बऱ्यापैकी आहे (११.६७ टक्के). परंतु कातकरी आणि ढोर कोळी जमातीचा शेतीपासून मिळालेल्या एकूण उत्पन्नात फार कमी वाटा असल्याने (अनुक्रमे ३.९४ टक्के आणि ४.४८ टक्के) या जमातींचा मागासलेपणा स्पष्ट होतो.

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सर्व्हेक्षित विविध सात आदिवासी जमातींना उत्पन्नाच्या मजुरी या साधनापासून सन २००३-२००४ या वर्षात ६१७९०७५ रूपये एवढे उत्पन्न मिळाले आहे. सर्व जमातींना मजुरीपासून मिळालेल्या एकूण उत्पन्नात सर्वात जास्त वाटा कातकरी या जमातीचा असून तो २३.९७ टक्के एवढा आहे. म ठाकूर या जमातीचा वाटा १५.१४ टक्के, वारली जमातीचा १४.४८ टक्के, ढोर कोळी जमातीचा १२.९२ टक्के, कोकणा जमातीचा १२.१२ टक्के आणि क ठाकूर जमातीचा ११.२४ टक्के इतका आहे. तर विविध सात जमातींना मजुरीपासून मिळालेल्या एकूण उत्पन्नात सर्वात कमी वाटा महादेव कोळी या जमातीचा असून तो १०.१३ टक्के आहे. वरील तक्त्यावरून असे दिसते की, इतर जमातींच्या तुलनेत कातकरी जमातीला मजुरीपासून अधिक उत्पन्न मिळाले आहे. यावरून मजुरी हा कातकरी आदिवासींच्या उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत असल्याचे स्पष्ट होते.

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सर्व्हेक्षित विविध सात आदिवासी जमातींना उत्पन्नाच्या नोकरी या साधनापासून सन २००३-२००४ या वर्षात १३२९६०० रूपये एवढे उत्पन्न मिळाले आहे. सर्व जमातींना नोकरी या साधनापासून मिळालेल्या एकूण उत्पन्नात सर्वात जास्त वाटा महादेव कोळी या जमातीचा असून ३५.५२ टक्के आहे. त्या खालोखाल वाटा क ठाकूर या जमातीचा असून ता ३३.३९ टक्के आहे. नोकरीपासून मिळालेल्या एकूण उत्पन्नात म ठाकूर या जमातीचा हिस्सा १४.९० टक्के तर कोकणा जमातीचा तो ११.५९ टक्के आहे. वारली जमातीचा वाटा ४.३३ टक्के तर कातकरी जमातीचा तो शून्य टक्के इतका आहे. सर्व जमातींना नोकरीपासून मिळालेल्या एकूण उत्पन्नात कातकरी (शून्य टक्के) आणि वारली (४.३३ टक्के) या जमातींचा वाटा इतर जमातींच्या तुलनेत कमी असल्याने या जमातीतील बहुसंख्य आदिवासी कुटुंबांना नोकरी सारखे उत्पन्नाचे निश्चित साधन नसल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे या जमातींना उपजिविकेसाठी मजुरी या साधनावरच जास्तीत जास्त अवलंबून राहावे लागते.

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सर्व्हेक्षित विविध सात आदिवासी जमातींना उत्पन्नाच्या स्वयंरोजगार या साधनापासून सन २००३-२००४ या वर्षात ३८६५०० रूपये एवढे एकूण उत्पन्न मिळाले आहे. सर्व जमातींना स्वयंरोजगार या साधनापासून

मिळालेल्या एकूण उत्पन्नात सर्वात जास्त वाटा वारली या जमातीचा असून तो २४.७१ टक्के एवढा आहे. त्या खालोखाल क ठाकूर जमातीचा क्रम लागतो. या जमातीचा स्वयंरोजगार या साधनापासून मिळालेल्या एकूण उत्पन्नात २२.०० टक्के एवढा वाटा आहे. ढोर कोळी या जमातीचा वाटा २०.१८ टक्के आहे. स्वयंरोजगार या साधनापासून मिळालेल्या एकूण उत्पन्नात महादेव कोळी जमातीचा वाटा ११.९१ टक्के, तर म ठाकूर जमातीचा १०.३५ टक्के तर कोकणा जमातीचा वाटा ८.५३ टक्के आहे. सर्वात कमी वाटा कातकरी जमातीचा असून तो २.३२ टक्के एवढा आहे.

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सर्व्हेक्षित विविध सात आदिवासी जमातींना उत्पन्नाच्या इतर साधनापासून सन २००३-२००४ या वर्षात २००९०० रूपये एवढे उत्पन्न मिळाले आहे. इतर साधनामध्ये हॉटेलात कामगार म्हणून काम करणे, भगतगिरी इत्यादी दहा प्रकारच्या कामांचा समावेश आहे. सर्व जमातींना उत्पन्नाच्या इतर साधनापासून मिळालेल्या एकूण उत्पन्नात सर्वात जास्त वाटा ढोर कोळी या जमातीचा असून तो ५९.१३ टक्के इतका आहे. वारली जमातीचा वाटा २३.३४ टक्के तर महादेव कोळी जमातीचा वाटा ९.५६ टक्के इतका आहे. उत्पन्नाच्या इतर साधनापासून मिळालेल्या एकूण उत्पन्नात सर्वात अल्प वाटा क ठाकूर (२.९९ टक्के), कोकणा (२.९९ टक्के), म ठाकूर (१.९९ टक्के) तर कातकरी (शून्य टक्के) या जमातींचा आहे.

**महादेव कोळी**

एकेका जमातीचा स्वतंत्रपणे विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की, महादेव कोळी या जमातीला उत्पन्नाच्या विविध स्त्रोतापासून सन २००३-२००४ या वर्षात एकूण १६६३६६० रूपये एवढे उत्पन्न मिळाले आहे. या एकूण उत्पन्नात या जमातीला सर्वात जास्त उत्पन्न मजुरी या साधनापासून मिळाले आहे (३७.६६ टक्के). त्यानंतर शेती या साधनाचा क्रम लागतो (३०.०४ टक्के). महादेव कोळी जमातीला मिळालेल्या एकूण उत्पन्नात नोकरीपासून मिळालेल्या उत्पन्नाचा वाटा २८.३८ टक्के इतका आहे. तर सर्वात अल्प वाटा उत्पन्नाच्या इतर साधनापासून मिळालेल्या उत्पन्नाचा असून तो १.१५ टक्के आहे. तर स्वयंरोजगार या साधनापासून मिळालेल्या उत्पन्नाचा वाटा एकूण उत्पन्नात २.७७ टक्के इतका आहे.

**ढोर कोळी**

वरील तक्त्यावरून असे दिसते की, ढोर कोळी या जमातीला उत्पन्नाच्या विविध स्त्रोतापासून सन २००३-२००४ या वर्षात एकूण १०९७२४५ रूपये उत्पन्न मिळाले आहे. या एकूण उत्पन्नामध्ये सर्वात जास्त उत्पन्न या जमातीला मजुरी या साधनापासून मिळाले असून ते ७२.७४ टक्के एवढे आहे. ढोर कोळी जमातीला मिळालेल्या एकूण उत्पन्नात इतर साधनापासून मिळालेल्या उत्पन्नाचा वाटा १०.८४ टक्के इतका आहे. एकूण उत्पन्नात शेतीपासून मिळालेल्या उत्पन्नाचा वाटा ९.०० टक्के, स्वयंरोजगारापासून मिळालेल्या उत्पन्नाचा वाटा ७.१० टक्के तर सर्वात कमी वाटा नोकरी या साधनापासून मिळालेल्या उत्पन्नाचा असून तो ०.३२ टक्के आहे.

**कातकरी**

वरील तक्त्यावरून असे दिसते की, कातकरी या जमातीला उत्पन्नाच्या विविध स्त्रोतापासून सन २००३-२००४ या वर्षात १५७६०९० रूपये एवढे उत्पन्न मिळाले आहे. या एकूण उत्पन्नामध्ये सर्वात जास्त उत्पन्न या जमातीला मजुरी या साधनापासून

मिळाले असून ते ९३.९४ टक्के इतके आहे. शेतीपासून मिळालेल्या उत्पन्नाचा वाटा एकूण उत्पन्नामध्ये ५.४९ टक्के इतका आहे. तर स्वयंरोजगारापासून मिळालेल्या उत्पन्नाचा वाटा ०.५७ टक्के इतका आहे. उत्पन्नाच्या नोकरी आणि इतर साधनापासून मिळालेल्या उत्पन्नाचा एकूण उत्पन्नामध्ये वाटा शून्य इतका आहे.

**वारली**

वरील तक्त्यावरून असे दिसते की, वारली या जमातीला उत्पन्नाच्या विविध स्त्रोतापासून सन २००३-२००४ या वर्षात १३५१४३५ रूपये एवढे उत्पन्न मिळाले आहे. या एकूण उत्पन्नामध्ये सर्वात जास्त उत्पन्न या जमातीला मजुरी या साधनापासून मिळाले असून एकूण उत्पन्नामध्ये मजुरीपासून मिळालेल्या उत्पन्नाचा वाटा ६६.२० टक्के आहे. शेतीपासून मिळालेल्या उत्पन्नाचा वाटा १९.०० टक्के आहे. या जमातीचा स्वयंरोजगारापासून मिळालेल्या उत्पन्नाचा वाटा एकूण उत्पन्नामध्ये ७.०६ टक्के आहे. नोकरीपासून मिळालेल्या उत्पन्नाचा वाटा ४.२६ टक्के आणि इतर साधनापासून मिळालेल्या उत्पन्नाचा वाटा ३.४८ टक्के एवढा अल्प आहे.

**कोकणा**

वरील तक्त्यावरून असे दिसते की, कोकणा या जमातीला उत्पन्नाच्या विविध स्त्रोतापासून सन २००३-२००४ या वर्षात १४२९५८० रूपये एवढे एकूण उत्पन्न मिळाले आहे. या एकूण उत्पन्नामध्ये सर्वात जास्त वाटा मजुरी या साधनाचा असून तो ५२.३८ टक्के आहे. त्याखालोखाल उत्पन्नाच्या शेती या साधनाचा क्रम लागतो. शेतीपासून मिळालेल्या उत्पन्नाचा हिस्सा १०.७९ टक्के आहे. स्वयंरोजगारापासून मिळालेल्या उत्पन्नाचा वाटा २.३१ टक्के असून इतर साधनापासून मिळालेल्या उत्पन्नाचा वाटा ०.४१ टक्के एवढा आहे.

**म ठाकूर**

वरील तक्त्यावरून असे दिसते की, म ठाकूर या जमातीला उत्पन्नाच्या विविध स्त्रोतापासून सन २००३-२००४ या वर्षात १४५८४२० रूपये एवढे एकूण उत्पन्न मिळाले आहे. यामध्ये मजुरीपासून मिळालेल्या उत्पन्नाचा वाटा सर्वात जास्त असून तो ६०.४६ टक्के एवढा आहे. शेतीपासून मिळालेला उत्पन्नाचा वाटा २३.९२ टक्के, नोकरी या साधनापासून मिळालेल्या उत्पन्नाचा वाटा १२.७९ टक्के, स्वयंरोजगारापासून मिळालेल्या उत्पन्नाचा वाटा २.५८ टक्के तर उत्पन्नाच्या इतर साधनापासून मिळालेल्या उत्पन्नाचा वाटा ०.२५ टक्के एवढा अल्प आहे.

**क ठाकूर**

वरील तक्त्यावरून असे दिसते की, क ठाकूर या जमातीला उत्पन्नाच्या विविध स्त्रोतापासून सन २००३-२००४ या वर्षात १६२९७०० रूपये एवढे एकूण उत्पन्न मिळाले आहे. यामध्ये मजुरीपासून मिळालेल्या उत्पन्नाचा वाटा जास्त असून तो ४२.६१ टक्के एवढा आहे. नोकरीपासून मिळालेल्या उत्पन्नाचा वाटा २७.२४ टक्के तर शेतीपासून मिळालेल्या उत्पन्नाचा वाटा २४.५७ टक्के एवढा आहे. स्वयंरोजगापासून मिळालेल्या उत्पन्नाचा वाटा ५.२२ टक्के आणि इतर साधनापासून मिळालेल्या उत्पन्नाचा वाटा ०.३६ टक्के इतका आहे.

**उत्पन्नाची साधने आणि आदिवासी कुटुंबांचे वार्षिक सरासरी उत्पन्न**

या विभागात शेती, मजुरी, नोकरी, स्वयंरोजगार आणि इतर साधने इत्यादी उत्पन्नाच्या प्रत्येक

साधनापासून आदिवासी कुटुंबांना सन २००३-२००४ या वर्षात मिळालेल्या वार्षिक सरासरी उत्पन्नाची माहिती दिली आहे.

खालील तक्त्यात केवळ शेतकरी कुटुंबे विचारात घेऊन तसेच सर्व्हेक्षित सर्व कुटुंबे विचारात घेऊन आदिवासी कुटुंबांना शेतीपासून मिळालेले वार्षिक सरासरी उत्पन्न दर्शविले आहे.

तक्ता क्रमांक ६

**शेतीपासून मिळालेले वार्षिक सरासरी उत्पन्न**

| अ.क्र. | जमातीचे नाव | आदिवासी शेतकरी कुटुंबाची संख्या | सर्व्हेक्षित आदिवासी कुटुंबांची संख्या | शेतीपासून मिळालेले एकूण उत्पन्न (रूपये) | केवळ आदिवासी शेतकरी विचारात घेऊन कुटुंबाचे शेतीपासूनचे वार्षिक सरासरी उत्पन्न (रूपये) | सर्व्हेक्षित सर्व आदिवासी कुटुंबे विचारात घेऊन कुटुंबाचे शेतीपासूनचे वार्षिक सरासरी उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | महादेव कोळी | 56 | 60 | 499785 | 8925 | 8330 |
| 2 | ढोर कोळी | 13 | 60 | 98670 | 7590 | 1644 |
| 3 | कातकरी | 32 | 60 | 86515 | 2704 | 1442 |
| 4 | वारली | 46 | 60 | 256685 | 5580 | 4278 |
| 5 | कोकणा | 60 | 60 | 487630 | 8127 | 8127 |
| 6 | म ठाकूर | 57 | 60 | 370370 | 6498 | 6173 |
| 7 | क ठाकूर | 57 | 60 | 400400 | 7025 | 6673 |
| | एकूण | 321 | 420 | 2200055 | 6854 | 5338 |

१. संदर्भः प्राथमिक सर्व्हेक्षण

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबांपैकी शेतकरी कुटुंबांची संख्या ३२१ इतकी असून केवळ शेतकरी कुटुंबे विचारात घेता कुटुंबाचे शेतीपासूनचे वार्षिक सरासरी उत्पन्न ६८५४ रूपये एवढे आहे. तर सर्व्हेक्षित सर्व ४२० आदिवासी कुटुंबे विचारात घेता कुटुंबाचे शेतीपासूनचे वार्षिक सरासरी उत्पन्न ५३३८ रूपये एवढे आहे.

केवळ आदिवासी शेतकरी कुटुंबे विचारात घेता शेतकरी कुटुंबांचे शेतीपासूनचे वार्षिक सरासरी उत्पन्न सर्वात जास्त महादेव कोळी या जमातीत असून ते ८९२५ रूपये एवढे आहे. त्याखालोखाल कोकणा जमातीचा क्रम लागतो. या जमातीतील शेतकरी कुटुंबाचे शेतीपासूनचे वार्षिक सरासरी उत्पन्न ८१२७ रूपये एवढे आहे. ढोर कोळी जमातीचे ७५९० रूपये, क ठाकूर जमातीचे ७०२५ रूपये, म ठाकूर जमातीचे ६४९८ रूपये आणि वारली जमातीचे ५५८० रूपये आहे. इतर जमातीशी तुलना करता आदिवासी शेतकरी कुटुंबांचे शेतीपासूनचे वार्षिक सरासरी उत्पन्न सर्वात कमी कातकरी जमातीचे असून ते २७०४ रूपये एवढे आहे.

प्रत्येक जमातीतील सर्व्हेक्षित सर्व आदिवासी कुटुंबे विचारात घेता आदिवासी कुटुंबांचे शेतीपासूनचे वार्षिक सरासरी उत्पन्न सर्वात जास्त महादेव कोळी या जमातीचे असून ते ८३३० रूपये आहे. त्या खालोखाल कोकणा (८१२७ रूपये), क ठाकूर (६६७३ रूपये), म ठाकूर (६१७३ रूपये) या

जमातीचा क्रम लागतो. इतर जमातीशी तुलना करता सर्व्हेक्षित कुटुंबांचे शेतीपासून वार्षिक सरासरी उत्पन्न सर्वात कमी कातकरी या जमातीचे असून ते १४४२ रूपये आहे. त्या खालोखाल ढोर कोळी (१६४४ रूपये) आणि वारली (४२७८ रूपये) या जमातीचा क्रम लागतो.

### मजुरीपासून मिळालेले वार्षिक सरासरी उत्पन्न

खालील तक्त्यात केवळ मजुर कुटुंबे विचारात घेऊन तसेच सर्व्हेक्षित सर्व आदिवासी कुटुंबे विचारात घेऊन आदिवासी कुटुंबांना मजुरीपासून मिळालेले वार्षिक सरासरी उत्पन्न दर्शविले आहे.

तक्ता क्रमांक ७

| अ.क्र. | जमातीचे नाव | आदिवासी मजूर कुटुंबांची संख्या | सर्व्हेक्षित आदिवासी कुटुंबांची संख्या | मजुरीपासून मिळालेले एकूण उत्पन्न (रूपये) | केवळ मजूर कुटुंबे विचारात घेऊन कुटुंबाचे मजूरीपासूनचे वार्षिक सरासरी उत्पन्न (रूपये) | सर्व्हेक्षित सर्व आदिवासी कुटुंबे विचारात घेऊन कुटुंबाचे मजुरीपासूनचे वार्षिक सरासरी उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | महादेव कोळी | 52 | 60 | 626475 | 12048 | 10441 |
| 2 | ढोर कोळी | 58 | 60 | 798175 | 13762 | 13303 |
| 3 | कातकरी | 60 | 60 | 1480575 | 24676 | 24676 |
| 4 | वारली | 57 | 60 | 894750 | 15697 | 14912 |
| 5 | कोकणा | 54 | 60 | 748750 | 13866 | 12479 |
| 6 | म ठाकूर | 56 | 60 | 936050 | 16715 | 15601 |
| 7 | क ठाकूर | 49 | 60 | 694300 | 14169 | 11572 |
|  | एकूण | 386 | 420 | 6179075 | 16008 | 14712 |

*१. संदर्भः प्राथमिक सर्व्हेक्षण.*

*२. टीपः मजूर कुटुंबामध्ये स्थानिक भागात शेतमजुरी करणारी कुटुंबे, स्थानिक भागात सरकारच्या रोजगार योजनेत काम केलेली कुटुंबे आणि परगावी स्थलांतराच्या ठिकाणी मजुरी केलेली कुटुंबे यांचा समावेश केला आहे.*

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबापैकी सर्व प्रकारच्या मजुरी केलेल्या कुटुंबांची संख्या ३८६ इतकी त्यांना सन २००३-२००४ या सर्व्हेक्षणाच्या वर्षात मजुरीपासून मिळालेले एकूण उत्पन्न ६१७९०७५ असून रूपये एवढे आहे. केवळ मजूर कुटुंबे विचारात घेता कुटुंबाचे मजुरीपासूनचे वार्षिक सरासरी उत्पन्न १६००८ रूपये एवढे आहे. तर सर्व्हेक्षित सर्व ४२० आदिवासी कुटुंबे विचारात घेता मजुरीपासूनचे कुटुंबाचे वार्षिक सरासरी उत्पन्न १४७१२ रूपये एवढे आहे.

केवळ मजूर कुटुंबे विचारात घेता मजूर कुटुंबांचे सर्व प्रकारच्या मजुरीपासूनचे वार्षिक सरासरी उत्पन्न सर्वात जास्त कातकरी या जमातीचे असून ते २४६७६ रूपये एवढे आहे. तर सर्वात कमी महादेव कोळी या जमातीचे असून ते १२०४८ रूपये एवढे आहे.

सर्व्हेक्षित सर्व आदिवासी कुटुंबे विचारात घेता आदिवासी कुटुंबांचे सर्व प्रकारच्या मजुरीपासूनचे वार्षिक सरासरी उत्पन्न सर्वात जास्त कातकरी या जमातीचे आहे (२४६७६ रूपये). तर सर्वात कमी महादेव कोळी या जमातीचे आहे (१०४११ रूपये).

### नोकरीपासूनचे वार्षिक सरासरी उत्पन्न

खालील तक्त्यात सर्व्हेक्षण केलेल्या ४२० आदिवासी कुटुंबापैकी ज्या कुटुंबात नोकरदार आहेत अशा कुटुंबांची संख्या, नोकरदार असलेली कुटुंबे तसेच सर्व्हेक्षित सर्व आदिवासी कुटुंबे विचारात घेऊन नोकरीपासूनचे वार्षिक सरासरी उत्पन्न दर्शविले आहे.

तक्ता क्रमांक - ८

| अ.क्र. | जमातीचे नाव | ज्या कुटुंबात नोकरदार आहेत अशा कुटुंबांची संख्या व प्रमाण | सर्व्हेक्षण केलेल्या कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण * | नोकरीपासून मिळालेले एकूण उत्पन्न (रूपये) | शेकडा प्रमाण | नोकरदार असलेली कुटुंबे विचारात घेऊन कुटुंबाचे वार्षिक सरासरी उत्पन्न (रूपये) | सर्व्हेक्षित सर्व आदिवासी कुटुंबे विचारात घेऊन कुटुंबांचे वार्षिक सरासरी उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | महादेव कोळी | 07 (31.81) | 60 | 11.66 | 472200 | 35.52 | 67457 | 7870 |
| 2 | ढोर कोळी | 01 (4.54) | 60 | 1.66 | 3600 | 0.27 | 3600 | 60 |
| 3 | कातकरी | 0 | 60 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 4 | वारली | 02 (9.09) | 60 | 3.33 | 57600 | 4.33 | 28800 | 960 |
| 5 | कोकणा | 03 (13.63) | 60 | 5.00 | 154200 | 11.59 | 51400 | 2570 |
| 6 | म ठाकूर | 03 (13.63) | 60 | 5.00 | 198000 | 14.90 | 66000 | 3300 |
| 7 | क ठाकूर | 06 (27.27) | 60 | 10.00 | 444000 | 33.39 | 74000 | 7400 |
| | एकूण | 22 (100) | 420 | 5.23 | 1329600 | 100 | 60436 | 3166 |

१. *संदर्भः प्राथमिक सर्व्हेक्षण*

२. *स्तंभ क्रमांक ३ मधील कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील ज्या कुटुंबात नोकरदार आहेत अशा कुटुंबांचे सर्व्हेक्षित सर्व जमातीतील ज्या कुटुंबांत नोकरदार आहेत अशा २२ कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

३. *स्तंभ क्रमांक ५ मधील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील ज्या कुटुंबांत नोकरदार आहेत अशा कुटुंबांचे त्याच एका विशिष्ट जमातीतील सर्व्हेक्षण केलेल्या एकूण कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

४. *स्तंभ क्रमांक ७ मधील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीला नोकरीपासून मिळालेल्या उत्पन्नाचे सर्व्हेक्षित सर्व जमातींना नोकरीपासून मिळालेल्या एकूण उत्पन्नाशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

५. * ज्या कुटुंबात नोकरदार आहेत अशा कुटुंबांचे सर्व्हेक्षण केलेल्या एकूण कुटुंबांशी शेकडा प्रमाण.

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबांमध्ये ज्या कुटुंबात नोकरदार व्यक्ती आहेत अशा कुटुंबाचे प्रमाण अत्यंत अल्प असून ते ५.२३ टक्के एवढे आहे.

विविध जमातींचा तुलनात्मकदृष्ट्या विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की, ज्या कुटुंबांत नोकरदार व्यक्ती आहेत अशा कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण महादेव कोळी या जमातीत असून ते ३१.८१ टक्के एवढे आहे. त्या खालोखाल हे प्रमाण क ठाकूर या जमातीत असून ते २७.२७ टक्के आहे. कातकरी जमातीतील एकाही कुटुंबात एकही नोकरदार व्यक्ती नाही.

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सर्व्हेक्षित विविध सात आदिवासी जमातीतील ४२० आदिवासी कुटुंबापैकी नोकरदार व्यक्ती असलेल्या कुटुंबांची संख्या २२ इतकी असून त्यांना सन २००३-२००४ या वर्षात नोकरी या उत्पन्नाच्या साधनापासून मिळालेले एकूण उत्पन्न १३२९६०० रूपये आहे. केवळ नोकरदार कुटुंबांचा विचार करता कुटुंबांचे वार्षिक सरासरी उत्पन्न ६०४३६ रूपये एवढे आहे. सर्वात जास्त वार्षिक सरासरी उत्पन्न क ठाकूर या जमातीचे असून ते ७४००० रूपये आहे. ढोर कोळी जमतीचे ते शून्य आहे.

सर्व्हेक्षित सर्व आदिवासी कुटुंबांचा विचार करता कुटुंबाचे वार्षिक सरासरी उत्पन्न ३१६६ रूपये एवढे आहे. यामध्ये सर्वात जास्त वार्षिक सरासरी उत्पन्न महादेव कोळी या जमातीचे असून ते ७८७० रूपये आहे. त्याखालोखाल क ठाकूर जमातीचा क्रमांक लागतो (७४०० रूपये). ढोर कोळी जमातीचे वार्षिक सरासरी उत्पन्न शून्य इतके आहे.

### नोकरीचे स्वरूप आणि मिळालेले एकूण उत्पन्न

खालील तक्त्यात नोकरदार असलेल्या २२ कुटुंबातील २३ व्यक्तींच्या नोकरीचे स्वरूप आणि त्यांना मिळालेले एकूण उत्पन्न इत्यादी बाबींची माहिती दिली आहे.

तक्ता क्रमांक - ९

| अ.क्र. | नोकरीचे स्वरूप | कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण | नोकरीपासून मिळालेले एकूण उत्पन्न (रूपये) | शेकडा हिस्सा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | प्राथमिक शिक्षक | 05 | 22.72 | 382200 | 28.75 |
| 2 | माध्यमिक शिक्षक | 01 | 4.54 | 120000 | 9.02 |
| 3 | वस्तीशाळा शिक्षक व अंगणवाडी शिक्षिका | 01 | 4.54 | 30000 | 2.25 |
| 4 | कोतवाल | 01 | 4.54 | 4200 | 0.30 |
| 5 | आश्रमशाळा स्वयंपाकी | 01 | 4.54 | 36000 | 2.70 |
| 6 | वॉचमन | 01 | 4.54 | 66000 | 5.00 |
| 7 | फॉरेस्ट गार्ड | 01 | 4.54 | 54000 | 4.06 |
| 8 | शिपाई | 11 | 50.00 | 637200 | 47.92 |
| | एकूण | 22 | 100 | 1329600 | 100 |

१. *संदर्भः प्राथमिक सर्व्हेक्षण*

२. *स्तंभ क्रमांक ४ मधील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका प्रकारची नोकरी करणाऱ्या कुटुंबांचे सर्व प्रकारच्या नोकऱ्या करणाऱ्या एकूण २२ कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

३. *स्तंभ क्रमांक ६ मधील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी नोकरीच्या एका प्रकारापासून मिळालेल्या उत्पन्नाचे नोकरीच्या सर्व प्रकारापासून मिळालेल्या एकूण उत्पन्नाशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

वरील तक्त्यावरून असे दिसते की, नोकरदार असलेल्या २२ कुटुंबांतील २३ व्यक्ती विविध नऊ प्रकारची नोकरी करतात. त्यामध्ये शिपाई पदावर नोकरी करणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण मोठे असून ते ५०.०० टक्के एवढे आहे. त्या खालोखाल हे प्रमाण प्राथमिक

शिक्षक या पदावर काम करणाऱ्या कुटुंबांचे असून ते २२.७२ टक्के एवढे आहे. या दोन पदाव्यतिरिक्त उर्वरित इतर पदावर काम करणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण प्रत्येकी ४.५४ टक्के एवढे अल्प आहे.

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबामध्ये ज्या कुटुंबात नोकरदार व्यक्ती आहेत अशा कुटुंबांची संख्या २२ इतकी असून या कुटुंबांना नोकरी या साधनापासून मिळालेले उत्पन्न १३,२९,६०० रूपये एवढे आहे. यामध्ये शिपाई पदावर काम केलेल्या कुटुंबांना मिळालेल्या उत्पन्नाचा वाटा सर्वाधिक असून तो ४७.९२ टक्के एवढा आहे. त्याखालोखाल वाटा प्राथमिक शिक्षक पदावर काम केलेल्या कुटुंबांचा लागतो (२८.७५ टक्के). सर्वात कमी उत्पन्न कोतवाल आणि वस्तीशाळा शिक्षक व अंगणवाडी शिक्षिका असलेल्या कुटुंबांना प्राप्त झाले आहे (अनुक्रमे ०.३० टक्के व २.२५ टक्के).

### स्वयंरोजगारापासून मिळालेले वार्षिक सरासरी उत्पन्न

खालील तक्त्यात जमातीनुसार स्वयंरोजगारात गुंतलेल्या कुटुंबांचे प्रमाण स्वयंरोजगारापासून मिळालेले एकूण वार्षिक उत्पन्न, वार्षिक सरासरी उत्पन्न इत्यादी बाबींची माहिती दिली आहे.

तक्ता क्रमांक - १०

| अ.क्र. | जमातीचे नाव | स्वयंरोजगारात गुंतलेल्या कुटुंबांची संख्या व प्रमाण | सर्व्हेक्षित कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण | स्वयंरोजगारापासून मिळालेले एकूण वार्षिक उत्पन्न (रूपये) | स्वयंरोजगारात गुंतलेल्या कुटुंबांचे वार्षिक सरासरी उत्पन्न (रूपये) | सर्व्हेक्षित सर्व कुटुंबांचा विचार करून कुटुंबांचे वार्षिक सरासरी उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | महादेव कोळी | 05 (16.12) | 60 | 8.33 | 46000 | 9200 | 767 |
| 2 | ढोर कोळी | 04 (12.90) | 60 | 6.66 | 78000 | 19500 | 1300 |
| 3 | कातकरी | 02 (6.46) | 60 | 3.33 | 9000 | 4500 | 150 |
| 4 | वारली | 08 (25.80) | 60 | 13.33 | 95500 | 11937 | 1592 |
| 5 | कोकणा | 04 (12.90) | 60 | 6.66 | 33000 | 8250 | 550 |
| 6 | म ठाकूर | 02 (6.46) | 60 | 3.33 | 40000 | 20000 | 667 |
| 7 | क ठाकूर | 06 (19.36) | 60 | 10.00 | 85000 | 14167 | 1417 |
| | एकूण | 31 (100) | 420 | 7.38 | 386500 | 12468 | 920 |

१. *संदर्भः प्राथमिक सर्व्हेक्षण*

२. *स्तंभ क्रमांक १ मधील कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील स्वयंरोजगारात गुंतलेल्या कुटुंबांचे सर्व जमातीतील स्वयंरोजगारात गुंतलेल्या एकूण ३१ कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

३. *स्तंभ क्रमांक ५ मधील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील स्वयंरोजगारात गुंतलेल्या कुटुंबांचे त्याच एका विशिष्ट जमातीतील सर्व्हेक्षण केलेल्या एकूण कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबामध्ये स्वयंरोजगारात गुंतलेल्या कुटुंबांचे प्रमाण ७.३८ टक्के एवढे अल्प आहे.

विविध जमातींचा तुलनात्मकदृष्ट्या विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की,

स्वयंरोजगारात गुंतलेल्या कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण वारली या जमातीत असून ते २५.८० टक्के एवढे आहे. त्याखालोखाल हे प्रमाण क ठाकूर (१९.३६ टक्के) आणि महादेव कोळी (१६.१२ टक्के) या जमातीत आहे. कातकरी आणि म ठाकूर या जमातीत हे प्रमाण अत्यल्प आहे (अनुक्रमे ६.४६ टक्के).

केवळ स्वयंरोजगार करणाऱ्या कुटुंबांचा विचार करता कुटुंबाचे वार्षिक सरासरी उत्पन्न १२४६८ रूपये आहे. तर सर्व्हेक्षित सर्व कुटुंबांचा विचार करता कुटुंबाचे वार्षिक सरासरी उत्पन्न ९२० रूपये एवढे अल्प आहे.

केवळ स्वयंरोजगार करणाऱ्या कुटुंबांचा विचार करता कुटुंबाचे वार्षिक सरासरी उत्पन्न सर्वात जास्त म ठाकूर या जमातीचे असून ते २०००० रूपये एवढे आहे. त्याखालोखाल ढोर कोळी (१९५०० रूपये) आणि क ठाकूर (१४१६७ रूपये) या जमातींचा क्रम लागतो. केवळ स्वयंरोजगार करणाऱ्या कुटुंबांचे वार्षिक सरासरी उत्पन्न सर्वात कमी कातकरी या जमातीचे असून ते ४५०० रूपये एवढे आहे.

सर्व्हेक्षित सर्व आदिवासी कुटुंबांचा विचार करता कुटुंबाचे वार्षिक सरासरी उत्पन्न सर्वात जास्त वारली या जमातीचे आहे (१५९२ रूपये). त्याखालोखाल क ठाकूर (१४१७ रूपये) आणि ढोरकोळी (१३०० रूपये) या जमातींचा क्रम लागतो. सर्व्हेक्षित सर्व आदिवासी कुटुंबांचा विचार करता कुटुंबांचे वार्षिक सरासरी उत्पन्न सर्वात कमी कातकरी या जमातीचे असून ते केवळ १५० रूपये एवढे आहे.

### स्वयंरोजगाराचे स्वरूप आणि मिळालेले एकूण उत्पन्न

खालील तक्त्यात स्वयंरोजगारात गुंतलेल्या ३१ कुटुंबांच्या स्वयंरोजगाराचे स्वरूप आणि त्यापासून त्यांना मिळालेले एकूण उत्पन्न इत्यादी बाबतची माहिती दिली आहे.

तक्ता क्रमांक – ११

| अ.क्र. | स्वयंरोजगाराचे स्वरूप | स्वयंरोजगारात गुंतलेल्या कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण | स्वयंरोजगारापासून मिळालेले एकूण उत्पन्न (रूपये) | शेकडा हिस्सा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | |
| 1 | दूध विक्री (पशुपालन, गाय व म्हैस) | 03 | 9.68 | 15000 | 3.90 |
| 2 | किराणा दुकान | 07 | 22.59 | 91000 | 23.55 |
| 3 | टेलरिंग (ब्लाऊज तयार करणे) | 03 | 9.68 | 24000 | 6.20 |
| 4 | गवंडी काम | 07 | 22.59 | 98000 | 25.35 |
| 5 | लोहार काम | 03 | 9.68 | 51500 | 13.32 |
| 6 | पिठाची गिरणी | 03 | 9.68 | 22000 | 5.70 |
| 7 | सुतारकाम | 01 | 3.22 | 10000 | 2.58 |
| 8 | इलेक्ट्रीक दुकान | 01 | 3.22 | 22000 | 5.70 |
| 9 | वस्तीगृहाला भाजी पुरविणे | 01 | 3.22 | 30000 | 7.75 |
| 10 | सुईरिण (बाळंतपणे करणे) | 01 | 3.22 | 1000 | 0.25 |
| 11 | किराणा दुकान व पिठाची गिरणी | 01 | 3.22 | 22000 | 5.70 |
| | एकूण | 31 | 100 | 386500 | 100 |

१. *संदर्भ: प्राथमिक सर्व्हेक्षण*

२. *स्तंभ क्रमांक ४ मधील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी स्वयंरोजगाराच्या एका प्रकारात गुंतलेल्या कुटुंबांचे सर्व प्रकारचे स्वयंरोजगार करणाऱ्या एकूण ३१ कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

३. *स्तंभ क्रमांक ६ मधील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी स्वयंरोजगाराच्या एका प्रकारापासून मिळालेल्या उत्पन्नाचे सर्व प्रकारच्या स्वयंरोजगारापासून मिळालेल्या एकूण उत्पन्नाशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबापैकी ३१ कुटुंबे विविध दहा प्रकारच्या स्वयंरोजगारात गुंतलेली असून यामध्ये किराणा दुकान आणि गवंडी काम या व्यवसायात गुंतलेल्या कुटुंबांचे प्रमाण मोठे आहे. (प्रत्येकी २२.५९ टक्के) दूध विक्री, टेलरिंग, लोहारकाम, पिठाची गिरण इत्यादी व्यवसायात गुंतलेल्यांचे प्रमाण प्रत्येकी ९.६८ टक्के इतके आहे. सुतारकाम, इलेक्ट्रीक दुकान, वस्तीगृहांना भाजी पुरवणे, सुईरिण (बाळंतपणे करणे) इत्यादी व्यवसाय करणाऱ्यांचे प्रमाण अत्यंत नगण्य आहे (प्रत्येकी ३.२२ टक्के).

वरील तक्त्यावरून असे दिसते की, स्वयंरोजगारात गुंतलेल्या ३१ आदिवासी कुटुंबांना सन २००३-२००४ या वर्षात विविध प्रकारच्या स्वयंरोजगारापासून ३८६५०० रूपये एवढे उत्पन्न मिळाले आहे. यामध्ये गवंड्यांची कामे केलेल्या कुटुंबांना मिळालेल्या उत्पन्नाचा वाटा सर्वाधिक असून तो २५.३५ टक्के एवढा आहे. तर किराणा दुकान चालवणाऱ्या कुटुंबांना मिळालेल्या उत्पन्नाचा वाटा २३.५५ टक्के एवढा आहे. लोहारकामात गुंतलेल्या कुटुंबांना मिळालेल्या उत्पन्नाचा एकूण उत्पन्नातील वाटा १३.३२ टक्के एवढा आहे. बाळंतपणाची कामे करणाऱ्या कुटुंबांचा एकूण उत्पन्नातील वाटा अत्यंत अल्प असून तो ०.२५ टक्के आहे.

### इतर साधनापासून मिळालेले वार्षिक सरासरी उत्पन्न

खालील तक्त्यात जमातीनुसार उत्पन्नाची इतर साधने असलेल्या कुटुंबांचे प्रमाण, इतर साधनापासून मिळालेले एकूण वार्षिक उत्पन्न, वार्षिक सरासरी उत्पन्न इत्यादी बाबींची माहिती दिली आहे.

तक्ता क्रमांक - १२

| अ.क्र. | जमातीचे नाव | उत्पन्नाची इतर साधने असलेल्या कुटुंबांची संख्या व प्रमाण | सर्व्हेक्षित कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण | उत्पन्नाच्या इतर साधनापासून मिळालेले एकूण वार्षिक उत्पन्न रू. | केवळ उत्पन्नाची साधने असलेल्या कुटुंबांच्या संदर्भात वार्षिक सरासरी उत्पन्न (रूपये) | सर्व्हेक्षित कुटुंबांचे वार्षिक सरासरी उत्पन्न (रूपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | महादेव कोळी | 03 (10.34) | 60 | 5.00 | 19200 | 6400 | 320 |
| 2 | ढोर कोळी | 16 (55.17) | 60 | 26.66 | 118800 | 7425 | 1980 |
| 3 | कातकरी | 0 | 60 | 0 | 0 | 0 | 0 |
| 4 | वारली | 07 (24.13) | 60 | 11.66 | 46900 | 6700 | 782 |
| 5 | कोकणा | 01 (3.44) | 60 | 1.66 | 6000 | 6000 | 100 |
| 6 | म ठाकूर | 01 (3.44) | 60 | 1.66 | 4000 | 4000 | 67 |
| 7 | क ठाकूर | 01 (3.44) | 60 | 1.66 | 6000 | 6000 | 100 |
| | एकूण | 29 (100) | 420 | 6.90 | 200900 | 6928 | 478 |

१. *संदर्भः प्राथमिक सर्व्हेक्षण*

२. *स्तंभ क्रमांक ३ मधील कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील उत्पन्नाची इतर साधने असलेल्या कुटुंबांचे सर्व जमातीतील उत्पन्नाची इतर साधने असलेल्या एकूण २९ कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

३. *स्तंभ क्रमांक ५ मधील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील उत्पन्नाची इतर साधने असलेल्या कुटुंबांचे त्याच एका विशिष्ट जमातीतील सर्व्हेक्षण केलेल्या एकूण कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सर्व्हेक्षित ४९० आदिवासी कुटुंबांपैकी २९ कुटुंबांकडे (७.३८ टक्के) उत्पन्नाची इतर साधने आहेत. अशा प्रकारे उत्पन्नाची इतर साधने असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण अत्यंत अल्प असल्याचे दिसून येते.

विविध जमातींचा तुलनात्मकदृष्ट्या विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की, उत्पन्नाची इतर साधने असलेल्या कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण ढोरकोळी या जमातीत असून ते ५५.१७ टक्के इतके आहे. कातकरी जमातीत हे प्रमाण शून्य आहे. तर वारली या जमातीत ते २४.१३ टक्के आहे. उत्पन्नाची इतर साधने असलेल्या कुटुंबांचे प्रमाण कोकणा, म ठाकूर आणि क ठाकूर या जमातीत प्रत्येकी ३.४४ टक्के आहे.

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सर्व्हेक्षित विविध सात आदिवासी जमातीतील ४२० आदिवासी कुटुंबांपैकी उत्पन्नाची इतर साधने असलेल्या कुटुंबांची संख्या २९ इतकी असून त्यांना सन २००३-२००४ या वर्षात उत्पन्नाच्या इतर साधनापासून मिळालेले एकूण उत्पन्न २००९०० रूपये एवढे आहे.

केवळ उत्पन्नाची इतर साधने असलेल्या कुटुंबांचा विचार करता कुटुंबांचे वार्षिक सरासरी उत्पन्न ६९२८ रूपये एवढे आहे. तर सर्व्हेक्षित सर्व कुटुंबांचा विचार करता कुटुंबांचे वार्षिक सरासरी उत्पन्न ४७८ रूपये इतके आहे.

केवळ उत्पन्नाची इतर साधने असलेल्या कुटुंबांचा विचार करता कुटुंबांचे वार्षिक सरासरी उत्पन्न सर्वात जास्त ढोरकोळी या जमातीचे असून ते ७४२५ रूपये एवढे आहे. वारली जमातीचे ते ६७०० रूपये तर महादेव कोळी जमातीचे ६४०० रूपये आहे. कोकणा आणि क ठाकूर जमातीचे वार्षिक सरासरी उत्पन्न प्रत्येकी ६००० रूपये एवढे आहे. तर कातकरी जमातीचे ते शून्य इतके आहे.

सर्व्हेक्षित सर्व आदिवासी कुटुंबांचा विचार करता कुटुंबांचे वार्षिक सरासरी उत्पन्न सर्वात जास्त ढोरकोळी या जमातीचे असून ते १९८० रूपये एवढे आहे. तर कातकरी जमातीचे ते शून्य इतके आहे.

**उत्पन्नाच्या इतर साधनांचे स्वरूप आणि मिळालेले एकूण उत्पन्न**

पुढील तक्ता क्र. १३ मध्ये उत्पन्नाची इतर साधने असलेल्या २९ कुटुंबांच्या इतर साधनांचे स्वरूप आणि त्यापासून त्यांना मिळालेले एकूण उत्पन्न इत्यादी बाबतची माहिती दिली आहे.

तक्त्यावरून असे दिसते की, सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबांपैकी २९ कुटुंबांकडे (६.९० टक्के) उत्पन्नाची १० वेगवेगळी इतर साधने आहेत. यामध्ये भगतगिरीचा व्यवसाय करणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण मोठे असून ते ३४.४८ टक्के एवढे आहे. तर गावातील एका छोट्या व्यवसायास प्लॅस्टिकची फुले तयार करून देणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण २०.६९ टक्के एवढे आहे.

### तक्ता क्रमांक १३

| अ.क्र. | इतर साधनांचे स्वरूप | इतर साधने असलेल्या कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण | इतर साधनापासून मिळालेले एकूण उत्पन्न (रूपये) | शेकडा हिस्सा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | बैल भाड्याने देणे | 01 | 3.45 | 12000 | 5.97 |
| 2 | तात्पुरते कामगार (हॉटेल, दर्गा) | 02 | 6.89 | 24000 | 11.96 |
| 3 | दारू तयार करून विकणे | 02 | 6.89 | 14000 | 6.97 |
| 4 | भगतगिरी | 10 | 34.48 | 46600 | 23.20 |
| 5 | दारू विक्री व भगतगिरी | 01 | 3.45 | 13500 | 6.72 |
| 6 | प्लॅस्टिकची फुले तयार करून देणे | 06 | 20.69 | 46000 | 22.90 |
| 7 | औत हाकणे | 01 | 3.45 | 2800 | 1.40 |
| 8 | नवऱ्याची पेन्शन | 01 | 3.45 | 18000 | 8.95 |
| 9 | वृद्धापकाळाची पेन्शन | 03 | 10.36 | 18000 | 8.95 |
| 10 | लाकूड फाटा विकणे | 02 | 6.89 | 6000 | 2.98 |
| | एकूण | 29 | 100 | 200900 | 100 |

१. *संदर्भ: प्राथमिक सर्व्हेक्षण*

२. *स्तंभ क्रमांक ४ मधील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी उत्पन्नाच्या इतर साधनापैकी एका प्रकारचे साधन असलेल्या कुटुंबांचे उत्पन्नाची सर्व प्रकारची साधने असलेल्या एकूण २९ कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

३. *स्तंभ क्रमांक ६ मधील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी उत्पन्नाच्या इतर साधनापैकी एका साधनापासून मिळालेल्या उत्पन्नाचे उत्पन्नाच्या इतर सर्व प्रकारच्या साधनापासून मिळालेल्या एकूण उत्पन्नाशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

वरील तक्त्यावरून असे दिसते की, उत्पन्नाची इतर साधने असलेल्या २९ कुटुंबांना सन २००३-२००४ या वर्षात विविध दहा प्रकारच्या उत्पन्नाच्या इतर साधनापासून २००९०० रूपये उत्पन्न मिळाले आहे. यामध्ये भगतगिरीचा व्यवसाय करणाऱ्या कुटुंबांना मिळालेल्या उत्पन्नाचा वाटा सर्वाधिक असून तो २३.२० टक्के एवढा आहे. तर प्लॅस्टिकची फुले तयार करून देण्याचा व्यवसाय असलेल्या कुटुंबांचा एकूण उत्पन्नातील वाटा २२.९० टक्के एवढा आहे. औत हाकण्याचा व्यवसाय करणाऱ्या कुटुंबांचा एकूण उत्पन्नातील वाटा २.९८ टक्के एवढा अल्प आहे.

**प्रत्येक जमातीतील सर्व्हेक्षित ६० कुटुंबांपैकी प्रत्यक्ष व्यवसाय करणाऱ्या कुटुंबांचा विचार करून जमातीनुसार आणि उत्पन्नाच्या साधनानुसार कुटुंबाचे वार्षिक सरासरी उत्पन्न**

तक्ता क्र. १४ मध्ये प्रत्येक जमातीतील सर्व्हेक्षित ६० कुटुंबांपैकी प्रत्यक्ष व्यवसाय करणाऱ्या कुटुंबांचा विचार करून जमातीनुसार आणि उत्पन्नाच्या साधनानुसार कुटुंबाचे वार्षिक सरासरी उत्पन्न दर्शविले आहे.

तक्त्यात प्रत्येक जमातीतील सर्व्हेक्षित ६० कुटुंबांपैकी प्रत्यक्ष व्यवसाय करणाऱ्या कुटुंबांचा विचार करून जमातीनुसार आणि उत्पन्नाच्या साधनानुसार कुटुंबांचे वार्षिक सरासरी उत्पन्न दर्शविले आहे. यानुसार आदिवासींना सर्वात जास्त वार्षिक सरासरी उत्पन्न नोकरी या साधनपासून मिळाले असून ते ६०४३६

तक्ता क्रमांक - १४

| अ.क्र. | जमातीचे नाव | प्रत्येक जमातीतील सर्व्हेक्षित 60 कुटुंबांपैकी प्रत्यक्ष व्यवसाय करणाऱ्या कुटुंबांचा विचार करून जमातीनुसार आणि उत्पन्नाच्या साधनानुसार कुटुंबाचे वार्षिक सरासरी उत्पन्न | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | शेती | मजुरी | नोकरी | स्वयंरोजगार | इतर |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | महादेव कोळी | 8925 (56) | 12048 (52) | 67457 (07) | 9200 (05) | 6400 (03) |
| 2 | ढोर कोळी | 7590 (13) | 13762 (58) | 3600 (01) | 19500 (04) | 7425 (16) |
| 3 | कातकरी | 2704 (32) | 24676 (60) | 0 | 4500 (02) | 0 |
| 4 | वारली | 5580 (46) | 15697 (57) | 28800 (02) | 11937 (08) | 6700 (07) |
| 5 | कोकणा | 8127 (60) | 13866 (64) | 51400 (03) | 8250 (04) | 6000 (01) |
| 6 | म ठाकूर | 6498 (57) | 16715 (56) | 66000 (03) | 20000 (02) | 4000 (01) |
| 7 | क ठाकूर | 7025 (57) | 14169 (49) | 74000 (06) | 14167 (06) | 6000 (01) |
| | एकूण | **6857 (321)** | **16008 (386)** | **60436 (22)** | **12468 (31)** | **6928 (29)** |

१. *संदर्भः प्राथमिक सर्व्हेक्षण*

२. *टीपः कंसातील आकडे तो तो व्यवसाय करणाऱ्या कुटुंबांची संख्या दर्शवितात.*

रूपये एवढे आहे. तर सर्वात कमी शेती या साधनापासून मिळाले असून ते ६८५४ रूपये इतके आहे. मजुरी या साधनापासून वार्षिक सरासरी उत्पन्न १६००८ रूपये मिळाले आहे. स्वयंरोजगारापासून वार्षिक सरासरी उत्पन्न १२४६८ रूपये तर उत्पन्नाच्या इतर साधनापासून ६९२८ रूपये मिळाले आहे.

**प्रत्येक जमातीतील सर्व्हेक्षित सर्व ६० कुटुंबे विचारात घेऊन जमातीनुसार आणि उत्पन्नाच्या साधनानुसार कुटुंबाचे वार्षिक सरासरी उत्पन्न**

तक्ता क्र. १५ मध्ये सर्व्हेक्षित प्रत्येक जमातीतील ६० कुटुंबे विचारात घेऊन जमातीनुसार आणि उत्पन्नाच्या साधनानुसार कुटुंबाचे वार्षिक सरासरी उत्पन्न दर्शविले आहे.

तक्त्यात प्रत्येक जमातीतील सर्व्हेक्षित सर्व ६० कुटुंबे विचारात घेऊन जमातीनुसार आणि उत्पन्नाच्या स्त्रोतानुसार आदिवासी कुटुंबांचे वार्षिक सरासरी उत्पन्न दर्शविले आहे.

सर्व्हेक्षित सर्व ४२० कुटुंबे विचारात घेता कुटुंबाचे वार्षिक सरासरी उत्पन्न २४५१५ रूपये इतके आहे. आदिवासींना सर्वात जास्त वार्षिक सरासरी

तक्ता क्रमांक - १५

| अ.क्र. | जमातीचे नाव | प्रत्येक जमातीतील सर्व्हेक्षित ६० कुटुंबे विचारात घेऊन वार्षिक सरासरी उत्पन्न (रूपये) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | शेती | मजुरी | नोकरी | स्वयंरोजगार | इतर साधने | एकूण |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | महादेव कोळी | 8330 | 10441 | 7870 | 767 | 320 | 27728 |
| 2 | ढोर कोळी | 1644 | 13303 | 60 | 1300 | 1980 | 18287 |
| 3 | कातकरी | 1442 | 24676 | 0 | 150 | 0 | 26268 |
| 4 | वारली | 4278 | 14912 | 960 | 1592 | 782 | 22524 |
| 5 | कोकणा | 8127 | 12479 | 2570 | 550 | 100 | 23826 |
| 6 | म ठाकूर | 6173 | 15601 | 3300 | 667 | 67 | 25807 |
| 7 | क ठाकूर | 6673 | 11572 | 7400 | 1417 | 100 | 27162 |
| | एकूण | 5338 | 14712 | 3166 | 920 | 478 | 24515 |

संदर्भः प्राथमिक सर्व्हेक्षण

उत्पन्न मजुरी या साधनापासून मिळाले असून ते १४७१२ रूपये एवढे आहे. तर सर्वात कमी वार्षिक सरासरी उत्पन्न हे उत्पन्नाच्या इतर साधनापासून प्राप्त झाले असून ते ४७८ रूपये एवढे आहे. शेतीपासून ५३३८ रूपये, नोकरी पासून ३१६६ रूपये तर स्वयंरोजगार या साधनापासून ९२० रूपये वार्षिक सरासरी उत्पन्न प्राप्त झाल्याचे वरील तक्त्यावरून दिसून येते.

शेतीपासून प्राप्त झालेले वार्षिक सरासरी उत्पन्न सर्वात जास्त कोकणा या जमातीचे आहे (८१२७ रूपये). तर सर्वात कमी कातकरी या जमातीचे आहे (१४४२ रूपये).

मजुरीपासून प्राप्त झालेले वार्षिक सरासरी उत्पन्न सर्वात जास्त कातकरी या जमातीचे आहे (२४६७६ रूपये). तर सर्वात कमी महादेव कोळी या जमातीचे आहे (१०४४१ रूपये). वरील तक्त्यावरून असे दिसते की, नोकरी या साधनापासून प्राप्त झालेले वार्षिक सरासरी उत्पन्न सर्वात जास्त महादेव कोळी या जमातीचे आहे (७८७० रूपये). तर सर्वात कमी कातकरी या जमातीचे आहे (शून्य रूपये).

स्वयंरोजगार या साधनापासून प्राप्त झालेले वार्षिक सरासरी उत्पन्न सर्वात जास्त वारली या जमातीचे आहे (१५९२ रूपये). तर सर्वात कमी कातकरी या जमातीचे आहे (१५० रूपये).

उत्पन्नाच्या इतर साधनापासून प्राप्त झालेले वार्षिक सरासरी उत्पन्न सर्वात जास्त ढोर कोळी या जमातीचे आहे (१९८० रूपये). तर सर्वात कमी कातकरी या जमातीचे आहे (शून्य रूपये).

**सरासरी उत्पन्न**

तक्ता क्र. १६ मध्ये विविध सात आदिवासी जमातीतील आदिवासी कुटुंबांचे सन २००३-२००४ या वर्षातील वार्षिक सरासरी उत्पन्न, दरडोई वार्षिक सरासरी उत्पन्न, कुटुंबाचे मासिक सरासरी उत्पन्न आणि दरडोई मासिक सरासरी उत्पन्न इत्यादी बाबातची माहिती दिली आहे.

तक्ता क्रमांक – १६

| अ.क्र. | जमातीचे नाव | सर्व्हेक्षण केलेल्या कुटुंबांची संख्या | कुटुंबातील सदस्यांची संख्या | कुटुंबाला सर्व मार्गांनी मिळालेले एकूण वार्षिक उत्पन्न (रूपये) | कुटुंबाचे वार्षिक सरासरी उत्पन्न (रूपये) | दरडोई वार्षिक सरासरी उत्पन्न (रूपये) | कुटुंबाचे मासिक सरासरी उत्पन्न (रूपये) | दरडोई मासिक सरासरी उत्पन्न(रूपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 6 | 7 |
| 1 | महादेव कोळी | 60 | 329 | 1663660 | 27728 | 5057 | 2311 | 421 |
| 2 | ढोर कोळी | 60 | 301 | 1097245 | 18287 | 3645 | 1524 | 304 |
| 3 | कातकरी | 60 | 344 | 1576090 | 26268 | 4582 | 2189 | 382 |
| 4 | वारली | 60 | 358 | 1351435 | 22524 | 3775 | 1877 | 315 |
| 5 | कोकणा | 60 | 375 | 1429580 | 23826 | 3812 | 1985 | 318 |
| 6 | म ठाकूर | 60 | 357 | 1548420 | 25807 | 4337 | 2151 | 361 |
| 7 | क ठाकूर | 60 | 261 | 1629700 | 27162 | 6244 | 2263 | 520 |
|  | एकूण | 420 | 2325 | 10296130 | 24515 | 4428 | 2043 | 369 |

१. संदर्भः प्राथमिक सर्व्हेक्षण

आदिवासी कुटुंबाचे वार्षिक सरासरी उत्पन्न २४५१५ रूपये एवढे आहे. दरडोई वार्षिक सरासरी उत्पन्न ४४२८ रूपये आहे. कुटुंबाचे मासिक सरासरी उत्पन्न २०४३ रूपये आहे. तर दरडोई मासिक सरासरी उत्पन्न ३६९ रूपये इतके आहे.

आदिवासी कुटुंबांचे वार्षिक सरासरी उत्पन्न २४५१५ रूपये एवढे आहे. सर्वात जास्त वार्षिक सरासरी उत्पन्न महादेव कोळी या जमातीचे असून ते २७७२८ रूपये आहे. त्याखालोखाल क्रमशः क ठाकूर (२७१६२ रूपये), कातकरी (२६२६८ रूपये), म ठाकूर (२५८०७ रूपये) या जमातीचा क्रम लागतो. कोकणा जमातीतील कुटुंबांचे वार्षिक सरासरी उत्पन्न २३८२६ रुपये असून वारली जमातीतील कुटुंबांचे वार्षिक सरासरी उत्पन्न २२५२४ रूपये आहे. इतर जमातींच्या तुलनेत आदिवासी कुटुंबांचे सर्वात कमी वार्षिक सरासरी उत्पन्न ढोर कोळी या जमातीचे असून ते १८२८७ रूपये एवढे आहे.

सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबातील सदस्यांची संख्या २३२५ इतकी आहे. दरडोई वार्षिक सरासरी उत्पन्न ४४२८ रूपये आहे. सर्वात जास्त दरडोई वार्षिक सरासरी उत्पन्न क ठाकूर या जमातीचे असून ते ६२४४ रूपये एवढे आहे. त्या खालोखाल महादेव कोळी जमातीचा क्रम लागतो. या जमातीचे दरडोई वार्षिक सरासरी उत्पन्न ५०५७ रूपये एवढे आहे. त्यामुळे इतर जमातींच्या तुलनेत क ठाकूर आणि महादेव कोळी या जमाती आर्थिकदृष्ट्या बऱ्या स्थितीतील असलेल्या जाणवतात. कातकरी जमातीचे दरडोई वार्षिक सरासरी उत्पन्न ४५८२ रूपये म ठाकूर जमातीचे ४३३७ रूपये, कोकणा जमातीचे ३८१२ रूपये तर वारली जमातीचे ३७७५ रूपये एवढे आहे. इतर जमातींच्या तुलनेत सर्वात कमी दरडोई वार्षिक सरासरी उत्पन्न ढोर कोळी या जमातीचे असून ते ३६४५ रूपये एवढे आहे. आदिवासी कुटुंबांचे मासिक सरासरी उत्पन्न २०४३ रूपये एवढे आहे. कुटुंबांचे मासिक सरासरी उत्पन्न सर्वात जास्त महादेव कोळी या जमातीचे असून ते २३११ रूपये एवढे आहे.

त्यानंतर क ठाकूर जमातीचा क्रम लागतो (२२६३ रूपये). कातकरी जमातीतील कुटुंबांचे मासिक सरासरी उत्पन्न २१८९ रूपये असून म ठाकूर जमातीचे ते २१५१ रूपये आहे. वारली जमातीतील कुटुंबांचे मासिक सरासरी उत्पन्न १८७७ रूपये आहे. तर सर्वात कमी मासिक सरासरी उत्पन्न ढोर कोळी जमातीचे असून ते १५२४ रूपये एवढे आहे.

दरडोई मासिक सरासरी उत्पन्न ३६९ रूपये एवढे आहे. दरडोई मासिक सरासरी उत्पन्न सर्वात जास्त क ठाकूर जमातीचे असून ते ५२० रूपये आहे. त्याखालोखाल महादेव कोळी जमातीचा क्रम लागतो. या जमातीचे दरडोई मासिक सरासरी उत्पन्न ४२१ रूपये आहे. कातकरी जमातीचे दरडोई मासिक सरासरी उत्पन्न ३८२ रूपये, म ठाकूर जमातीचे ३६१ रूपये, कोकणा जमातीचे ३१८ रूपये तर वारली जमातीचे ३१५ रूपये आहे. इतर जमातींच्या तुलनेत दरडोई मासिक सरासरी उत्पन्न सर्वात कमी ढोर कोळी जमातीचे असून ते ३०४ रूपये आहे.

## मोखाडा तालुक्यातील आदिवासींची खर्चविषयक माहिती

या विभागात सन २००३-२००४ या वर्षातील अभ्यासक्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील आदिवासी कुटुंबांनी विविध बाबींवर केलेल्या खर्चाची माहिती दिली आहे. तसेच वार्षिक आणि मासिक सरासरी खर्च, उत्पन्नापेक्षा खर्च जास्त असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण इत्यादींची माहिती दिली आहे.

## आदिवासी कुटुंबांचा वार्षिक सरासरी उपभोग खर्च

खालील तक्त्यात खर्चाचे विविध घटक, त्यावर झालेला खर्च आणि झालेल्या खर्चाची एकूण खर्चाशी टक्केवारी दर्शविली आहे.

तक्ता क्रमांक - १७

| अ.क्र. | खर्चाचे विविध घटक | झालेला सरासरी उपभोग खर्च (रूपये) | झालेल्या खर्चाची एकूण खर्चाशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | अन्न | 14097 | 61.36 |
| 2 | वस्त्र | 873 | 3.81 |
| 3 | घर दुरूस्ती | 344 | 1.49 |
| 4 | औषधे | 237 | 1.03 |
| 5 | शिक्षण | 14 | 0.06 |
| 6 | भगतावरील खर्च | 228 | 0.99 |
| 7 | दारू, तंबाखू इत्यादी | 3079 | 13.39 |
| 8 | प्रवास | 1193 | 5.19 |
| 9 | लाकूड, रॉकेल, वीज | 2210 | 9.62 |
| 10 | सण, जत्रा, जन्म, मृत्यू, लग्न | 253 | 1.10 |
| 11 | इतर (भांडी, चपला, न्हावी, करमणूक) | 452 | 1.96 |
| | सरासरी उपभोग खर्च | 22980 | 100 |

१. संदर्भः प्राथमिक सर्व्हेक्षण

वरील तक्त्यात सन २००३-२००४ या वर्षातील आदिवासी कुटुंबांचा विविध बाबीवरील वार्षिक सरासरी उपभोग खर्च दर्शविला आहे. आदिवासी कुटुंबांचा वार्षिक सरासरी उपभोग खर्च २२९८० रूपये इतका आहे. आदिवासींनी विविध बाबींवर केलेल्या खर्चाची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे दिली आहे.

### १) अन्न खर्च

अन्न खर्चामध्ये गहू, तांदूळ, नाचणी, डाळी, कडधान्ये, चटणी, इतर मसाला, गूळ, साखर, भाजीपाला, मिठाई भजी, वडा, खाद्य तेल, दूध, मासे, अंडी, मटण, नारळ आणि मीठ इत्यादीवरील खर्च विचारात घेतला आहे. वरील तक्त्यावरून असे

दिसते की, आदिवासी कुटुंबांचा सर्वात जास्त खर्च अन्न या घटकावर झाला आहे. एकूण सरासरी खर्चात अन्नावरील खर्चाचे शेकडा प्रमाण ६१.३६ इतके मोठे आहे. आदिवासी कुटुंबांचा अन्नावरील वार्षिक सरासरी खर्च १४०९७ इतका आहे.

### २) दारू, तंबाखू, बिडी इत्यादीवरील खर्च

आदिवासींच्या उपभोग खर्चात अन्न खर्चाखालोखाल दारू, तंबाखू इत्यादीवरील खर्चाचा क्रम लागतो. वरील तक्त्यावरून असे दिसते की, दारू, तंबाखू, इत्यादीवरील वार्षिक सरासरी खर्च ३०७९ रूपये इतका असून व्यसनावरील खर्चाची एकूण खर्चाशी टक्केवारी १३.३९ इतकी मोठी आहे.

### ३) जळाऊ लाकूड, रॉकेल इत्यादीवरील खर्च

आदिवासींच्या एकूण उपभोग खर्चात दारू, तंबाखू इत्यादीवरील खर्चानंतर लाकूड, रॉकेल, वीज इत्यादीवरील खर्चाचा क्रम लागतो. आदिवासी कुटुंबांचा या बाबीवरील वार्षिक सरासरी खर्च २२१० रूपये इतका असून त्याची एकूण खर्चाशी टक्केवारी ९.६२ इतकी आहे.

### ४) प्रवास खर्च

तालुक्यातील मोठ्या गावात आदिवासींना बाजारहाट करण्यासाठी यावे लागते. तसेच वर्षातील काही महिने परगावी कामासाठी स्थलांतर करावे लागते. त्यासाठी जो प्रवास खर्च करावा लागतो त्याचा विचार प्रवास खर्चात केला आहे. आदिवासी कुटुंबांचा वार्षिक सरासरी प्रवास खर्च ११९३ रूपये झाला असल्याचे वरील तक्त्यावरून दिसून येते. प्रवास खर्चाची झालेल्या एकूण उपभोग खर्चाशी टक्केवारी ५.१९ इतकी आहे. बहुसंख्य आदिवासी (९५ टक्केपेक्षा जास्त) बाजारहाट, लग्न इत्यादी विविध कामासाठी ३ ते २० किलो मीटर पायी ये-जा करतात. गरीबीमुळे आणि वाहन सुविधा वेळच्यावेळी व पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्यामुळे आदिवासींना पायीच प्रवास करावा लागतो. त्यामुळे आदिवासी कुटुंबांचा वार्षिक सरासरी प्रवास खर्च कमी असल्याचे दिसून येते.

### ५) वस्त्र खर्च

वस्त्र खर्चामध्ये आदिवासी स्त्री-पुरूषांच्या अंगावरील कपडे, चादर, गोधडी (दुपटी) इत्यादी वरील खर्चाचा विचार केला आहे. आदिवासी कुटुंबांचा वार्षिक सरासरी वस्त्र खर्च ८७३ रूपये इतका असून त्याची एकूण खर्चाशी टक्केवारी ३.८१ इतकी आहे. आदिवासी कुटुंबांचा वार्षिक सरासरी वस्त्र खर्च अत्यंत कमी असल्याचे वरील तक्त्यावरून दिसून येते. आदिवासींच्या अंगावरील कपडे, अंथरूण, पांघरूण अत्यंत साधे असते व कमी किंमतीचे असते. गरीबीमुळे बहुसंख्य आदिवासी साधे व कमी किंमतीचे कपडे सुद्धा पुरेशा प्रमाणात खरेदी करू शकत नाहीत. जुन्या कपड्यांपासून (स्त्रियांच्या अंगावरील लुगडी किंवा रंगीत फडकी) गोधडी तयार केली जातात. या गोधड्या घरीच तयार केल्या जातात व अंथरूण, पांघरूणासाठी त्याचा वापर केला जातो. पुरेसे कपडे आदिवासींकडे नसल्याने आदिवासी पावसाळ्यात व हिवाळ्यात शेकोटी पेटवून त्याभोवती रात्री झोपतात असे सर्व्हेक्षणाच्यावेळी आढळले.

### ६) इतर खर्च

इतर खर्चामध्ये भांडी, चपला, न्हावी आणि करमणूक खर्चाचा विचार केला आहे. या बाबीवरील आदिवासी कुटुंबांचा वार्षिक सरासरी उपभोग खर्च ४५२ रूपये इतका अल्प असल्याचे वरील तक्त्यावरून

दिसून येते. इतर खर्चाची एकूण उपभोग खर्चाशी टक्केवारी १.९६ इतकी आहे. आदिवासी भागात करमणुकीच्या सुविधा नसल्याने व जरी थोड्या प्रमाणात उपलब्ध असल्या तरी त्याचा गरीबीमुळे उपभोग घेता येत नाही. बहुसंख्य आदिवासी गावात एकमेकांचे केस फुकट कापतात. गरीबीमुळे भांडी, चपला, न्हावी आणि करमणूक या बाबीवरील आदिवासी कुटुंबांचा वार्षिक सरासरी खर्च अत्यंत कमी आहे.

### ७) घर दुरूस्ती खर्च

आदिवासी कुटुंबांचा प्रति कुटुंब वार्षिक सरासरी घरदुरूस्ती खर्च ३४४ रूपये इतका असल्याचे वरील तक्त्यावरून दिसते. घरदुरूस्ती खर्चाची एकूण खर्चाशी टक्केवारी १.४९ इतकी असून घरदुरूस्ती खर्च अत्यंत अल्प असल्याचे दिसते. ज्यांची घरे कौलारू आहेत ते फुटलेली कौले बदलणे इत्यादीवर खर्च करतात. गरीबीमुळे व घरे जंगलातील बांबू, झाडांचा पाला इत्यादी पासून तयार केली जात असल्याने घरदुरूस्ती खर्च कमी येतो. जंगलातील सागांच्या झाडांची पाने आणून आदिवासी त्यांचे घरावर आच्छादन करतात. त्याला आदिवासी घर शिवणे असे म्हणतात. तसेच ९९ टक्केपेक्षा अधिक गरीब आदिवासी घराला रंगरंगोटी करत नाहीत. आदिवासी राहतात त्याच्या आसपासच्या डोंगरात किंवा जंगलात विशिष्ट रंगाची माती उपलब्ध असते. ही माती पाण्यात कालवून घरातील भिंतींना आतून व बाहेरून लावतात. ही माती रंगीत असल्याने घराला रंग दिल्यासारखेच वाटते.

### ८) सण, जत्रा, जन्म, लग्न, मृत्यू

वरील तक्त्यावरून असे दिसते की, आदिवासी कुटुंबांचा प्रतिकुटुंब सण, जत्रा, जन्म, लग्न, मृत्यू इत्यादीवरील वार्षिक सरासरी उपभोग खर्च २५३ रूपये इतका असून त्याची एकूण खर्चाशी टक्केवारी १.१० इतकी आहे.

### ९) औषधावरील खर्च

वरील तक्त्यावरून असे दिसते की, आदिवासी कुटुंबांचा प्रतिकुटुंब औषधावरील वार्षिक सरासरी खर्च हा २३७ रूपये एवढा असून त्याची एकूण खर्चाशी टक्केवारी १.०३ एवढी आहे. आदिवासी भागात सरकारची कुटीर रूग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यरत आहेत. या ठिकाणी आदिवासींना मोफत औषधे दिली जातात. तरीसुद्धा आदिवासींना औषधावर खर्च करावा लागतो. त्याची काही कारणे अशी (१) आदिवासींना सरकारी दवाखान्यात चांगली वागणूक दिली जात नाही. त्यामुळे सरकारी दवाखान्यात जावे असे आदिवासींना वाटत नाही. त्यामुळे बहुसंख्य आदिवासी खाजगी दवाखान्यात जातात. (२) सरकारी दवाखान्यात पुरेशी औषधे उपलब्ध नसतात. जरी असली तरी ती आदिवासींना दिली जात नाहीत. आदिवासींना बाहेरून (खाजगी मेडिकल दुकानातून) औषधे विकत आणण्यास सांगितले जाते. त्यामुळे आदिवासींना औषधावर खर्च करावा लागातो. परंतु आदिवासींचे उत्पन्न अपुरे असल्याने औषधावर पुरेसा खर्च आदिवासींना करता येत नाही.

### १०) भगतावरील खर्च

शारीरीक आणि इतर आजार किंवा त्रास (भूत, करणी, जादूटोणा इत्यादी) वनस्पती, अंगारा व मंत्रतंत्र इत्यादींच्या साहाय्याने बरे करणाऱ्या आदिवासी व्यक्तीस भगत असे म्हणतात. बहुतेक सर्व आदिवासींचा भगतावर गाढ विश्वास आहे. आदिवासी कुटुंबांचा भगतावरील प्रतिकुटुंब वार्षिक सरासरी खर्च

२२८ रूपये इतका असून या खर्चाची एकूण खर्चाशी टक्केवारी ०.९९ इतकी असल्याचे दिसते. सरकारी व खाजगी दवाखाने जवळपास उपलब्ध असूनही आदिवासी उपचारासाठी भगताकडे जातात. त्यासाठी भगत आदिवासींकडून कोंबडी, नारळ, दारू, पैसे इत्यादी घेतात. आदिवासींना बोकडाचा बळी देण्यासही भगताकडून सांगितले जाते. त्यामुळे भगतावर आदिवासींना खर्च करावा लागतोच.

### ११) शिक्षण खर्च

आदिवासी कुटुंबांचा शिक्षणावरील प्रतिकुटुंब सरासरी खर्च १४ रूपये इतका असून शिक्षणावरील खर्चाची एकूण उपभोग खर्चाशी टक्केवारी ०.०६ इतकी आहे. आदिवासी कुटुंबांचा मुला बाळांच्या शिक्षणावरील खर्च अत्यंत कमी असल्याचे दिसून येते. आदिवासी कुटुंबांचा शिक्षणावरील खर्च अत्यंत कमी असण्याची काही कारणे अशी आहेत. (१) बहुसंख्य मुले व मुली शाळेत जात नाहीत. ती गुरे वळणे व इतर कामे करतात. त्यामुळे या कुटुंबांचा शिक्षण खर्च शून्य आहे. (२) आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळते. त्यामुळे खर्च करावा लागत नाही. (३) आश्रमशाळेतील व वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना कपडे, जेवण, पुस्तके व इतर सुविधा मोफत मिळतात. त्यामुळे पालकांना खर्च करावा लागत नाही. (४) मुला-मुलींच्या शिक्षणावर खर्च करण्याची आदिवासींची प्रवृत्ती नाही. बहुसंख्य आदिवासींना आपल्या मुला-बाळांनी फारसे शिक्षण घ्यावे असे वाटत नाही. मुलांना शाळेत घातल्याबद्दल सरकारनेच आपणाला पैसे द्यावेत असे आदिवासी पालकांना वाटते. (५) गरीबी हे सुद्धा प्रमुख कारण आहे. अशा प्रकारे या विविध कारणामुळे आदिवासींचा शिक्षणावरील खर्च कमी आहे.

सारांश, आदिवासींचा प्रतिकुटुंब सरासरी उपभोग खर्च २२९८० रूपये एवढा असून सर्वात जास्त खर्च अन्न बाबींवर झाला आहे (६१.३६ टक्के). तर सर्वात कमी खर्च शिक्षण बाबीवर झाला आहे (०.०६ टक्के). आदिवासींचा अन्न बाबीवरील खर्च एकूण खर्चाच्या निम्म्यापेक्षा जास्त असल्याने आदिवासींच्या मागासलेपणाची कल्पना येते.

### जमातीनुसार विविध बाबीवरील वार्षिक सरासरी उपभोग खर्च

तक्ता क्र. १८ मध्ये विविध आदिवासी जमातीतील कुटुंबांचा विविध बाबीवरील प्रतिकुटुंब वार्षिक सरासरी उपभोग खर्च दर्शविला आहे.

आदिवासी कुटुंबांचा प्रतिकुटुंब वार्षिक सरासरी उपभोग खर्च २२९८० रूपये असून सर्वात जास्त उपभोग खर्च कातकरी या जमातीचा आहे (२७९५८ रूपये). तर सर्वात कमी उपभोग खर्च ढोरकोळी या जमातीचा आहे (१९४२१ रूपये).

अन्नावरील सर्वात जास्त वार्षिक सरासरी खर्च कातकरी जमातीचा आहे (१६६२४ रूपये). तर सर्वात कमी खर्च क ठाकूर या जमातीचा आहे (१२०७७ रूपये).

वस्त्रावरील खर्चाचा विचार करता असे दिसते की, सर्वात जास्त प्रतिकुटुंब वार्षिक सरासरी वस्त्र खर्च महादेव कोळी या जमातीचा आहे (१०८० रूपये). तर सर्वात कमी वस्त्र खर्च ढोरकोळी या जमातीचा आहे (७४९ रूपये).

घर दुरूस्तीसाठीचा सर्वात जास्त प्रतिकुटुंब वार्षिक सरासरी खर्च महादेव कोळी या जमातीचा आहे (६१९ रूपये). तर सर्वात कमी प्रतिकुटुंब वार्षिक सरासरी खर्च कोकणा या जमातीचा आहे (१३९ रूपये).

तक्ता क्रमांक – १८

| अ.क्र. | खर्चाचे विविध घटक | जमातीनुसार विविध बाबीवरील वार्षिक सरासरी उपभोग खर्च (रूपये) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | महादेव कोळी | ढोर कोळी | कातकरी | वारली | कोकणा | म ठाकूर | क ठाकूर | सरासरी |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 1 | अन्न | 13201 | 12274 | 16624 | 14600 | 14593 | 15314 | 12077 | 14097 |
| 2 | वस्त्र | 1080 | 749 | 886 | 849 | 777 | 1012 | 758 | 873 |
| 3 | घर दुरूस्ती | 619 | 302 | 388 | 299 | 139 | 431 | 230 | 344 |
| 4 | औषधे | 287 | 228 | 311 | 227 | 178 | 272 | 153 | 237 |
| 5 | शिक्षण | 28 | 06 | 06 | 13 | 19 | 07 | 20 | 14 |
| 6 | भगतावरील खर्च | 281 | 177 | 363 | 209 | 139 | 255 | 169 | 228 |
| 7 | दारू, तंबाखू इत्यादी | 2532 | 2307 | 4573 | 3180 | 2957 | 2633 | 3369 | 3079 |
| 8 | प्रवास | 1113 | 932 | 1631 | 1219 | 1192 | 1116 | 1149 | 1193 |
| 9 | लाकूड, रॉकेल, वीज | 2399 | 1862 | 2391 | 2263 | 2327 | 2327 | 1904 | 2210 |
| 10 | सण, जत्रा, जन्म, मृत्यू, लग्न | 445 | 227 | 289 | 184 | 177 | 263 | 184 | 253 |
| 11 | इतर (भांडी, चपला, न्हावी, करमणूक) | 689 | 357 | 496 | 426 | 396 | 387 | 417 | 452 |
| | सरासरी खर्च | 22674 | 19421 | 27958 | 23489 | 23469 | 24017 | 20430 | 22980 |

औषधावरील खर्चाचा विचार करता असे दिसते की, सर्वात जास्त प्रतिकुटुंब वार्षिक सरासरी औषध खर्च कातकरी या जमातीचा आहे (३११ रूपये). तर सर्वात कमी खर्च क ठाकूर या जमातीचा आहे (१५३ रूपये).

शिक्षणावरील सर्वात जास्त वार्षिक सरासरी खर्च महादेव कोळी या जमातीचा आहे (२८ रूपये). तर सर्वात कमी ढोरकोळी आणि कातकरी या जमातीचा आहे (प्रत्येकी ६ रूपये).

आदिवासी कुटुंबांनी भगतावर केलेल्या खर्चाचा विचार करता असे दिसते की, सर्वात जास्त वार्षिक सरासरी खर्च कातकरी या जमातीचा आहे (३६३ रूपये). तर सर्वात कमी खर्च कोकणा या जमातीचा आहे (१३९ रूपये).

दारू, तंबाखू, बिडी इत्यादी वरील आदिवासी कुटुंबांचा प्रतिकुटुंब वार्षिक सरासरी उपभोग खर्च सर्वात जास्त कातकरी या जमातीचा आहे (४५७३ रूपये). तर सर्वात कमी खर्च ढोरकोळी या जमातीचा आहे (२३०७ रूपये).

प्रवास खर्चाचा विचार करता असे दिसते की, सर्वात जास्त प्रतिकुटुंब वार्षिक सरासरी प्रवास खर्च कातकरी या जमातीचा आहे (१६३१ रूपये). तर सर्वात कमी प्रवास खर्च ढोरकोळी या जमातीचा आहे (९३२ रूपये).

जळाऊ लाकूड, रॉकेल, वीज इत्यादी वरील आदिवासींचा सर्वात जास्त प्रतिकुटुंब वार्षिक सरासरी खर्च महादेव कोळी या जमातीचा आहे (२३९९ रूपये). तर सर्वात कमी उपभोग खर्च ढोरकोळी या जमातीचा आहे (१८६२ रूपये).

सण, जत्रा, जन्म, लग्न, मृत्यू इत्यादी बाबीवरील खर्चाचा विचार करता असे दिसते की, सर्वात जास्त वार्षिक सरासरी खर्च महादेव कोळी या जमातीचा आहे (४४५ रूपये). तर सर्वात कमी खर्च कोकणा या जमातीचा आहे (१७७ रूपये).

भांडी, चपला, न्हावी, करमणूक इत्यादी बाबीवरील खर्चाचा विचार करता असे दिसते की, आदिवासींचा या बाबीवरील सर्वात जास्त प्रतिकुटुंब वार्षिक सरासरी उपभोग खर्च हा महादेव कोळी या जमातीचा आहे (६८९ रूपये). तर सर्वात कमी खर्च ढोरकोळी या जमातीचा आहे (३५७ रूपये).

### जमातीनुसार अन्न व अन्नेतर खर्च

तक्ता क्र. १९ मध्ये विविध आदिवासी जमातीतील कुटुंबांचा अन्न बाबीवरील खर्च आणि अन्नेतर बाबीवरील खर्च यांची माहिती दिली आहे.

तक्ता क्रमांक - १९

| अ. क्र. | जमातीचे नाव | अन्न खर्च (%) | अन्नेतर खर्च (%) | एकूण खर्च (%) |
|---|---|---|---|---|
| 1 | महादेव कोळी | 58.22 | 41.78 | 100 |
| 2 | ढोर कोळी | 63.20 | 36.80 | 100 |
| 3 | कातकरी | 59.47 | 40.53 | 100 |
| 4 | वारली | 62.20 | 37.80 | 100 |
| 5 | कोकणा | 63.75 | 36.25 | 100 |
| 6 | म ठाकूर | 63.77 | 36.23 | 100 |
| 7 | क ठाकूर | 59.11 | 40.89 | 100 |
|  | सरासरी | 61.38 | 38.62 | 100 |

संदर्भः प्राथमिक सर्व्हेक्षण

आदिवासी कुटुंबांचा अन्नावरील वार्षिक सरासरी खर्च ६१.३८ टक्के असून अन्नेतर बाबीवरील खर्च ३८.५२ टक्के इतका आहे. अन्नेतर बाबीवरील खर्चापेक्षा अन्न बाबीवरील खर्च जास्त असल्याचे वरील तक्त्यावरून दिसून येते. अन्न बाबीवर जास्त खर्च असणे हे गरीबीचेच लक्षण मानले जाते. सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबांचा अन्नावरील प्रतिकुटुंब सरासरी खर्च हा ६१.३८ टक्के इतका मोठा असल्याने अभ्यासक्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील आदिवासींच्या गरीबीची कल्पना येते.

विविध जमातींचा तुलनात्मकदृष्ट्या विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की, म ठाकूर (६३.७७ टक्के), कोकणा (६३.७५ टक्के), ढोरकोळी (६३.२० टक्के) आणि वारली (६२.२० टक्के) इत्यादी जमातींचा अन्न बाबीवरील खर्च जास्त आहे. तर महादेव कोळी (५८.२२ टक्के), क ठाकूर (५९.११ टक्के), कातकरी (५९.४७ टक्के) इत्यादी जमातींचा अन्नावरील खर्च इतर जमतींच्या तुलनेने कमी आहे.

अन्नेतर बाबीवरील सर्वात जास्त खर्च महादेव कोळी या जमातीचा असून तो ४१.७८ टक्के एवढा आहे. क ठाकूर जमातीचा हा खर्च ४०.८९ टक्के आहे. अन्नेतर बाबीवरील सर्वात कमी खर्च म ठाकूर या जमातीचा असून तो ३६.२३ टक्के इतका आहे. कोकणा जमातीचा तो ३६.२५ टक्के आहे.

### उत्पन्नापेक्षा खर्च जास्त असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण

तक्ता क्र. २० मध्ये सर्व्हेक्षण केलेल्या विविध सात आदिवासी जमातीतील ४२० कुटुंबांपैकी किती कुटुंबांचा उपभोग खर्च उत्पन्नापेक्षा जास्त आहे, हे दर्शविले आहे.

सर्व्हेक्षण केलेल्या एकूण ४२० कुटुंबांपैकी ३५१ कुटुंबांचा वार्षिक उपभोग खर्च हा त्यांच्या वार्षिक उत्पन्नापेक्षा जास्त आहे. अशा प्रकारे उत्पन्नापेक्षा खर्च जास्त असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण

तक्ता क्रमांक – २०

| अ.क्र. | जमातीचे नाव | उत्पन्नापेक्षा खर्च जास्त असणाऱ्या कुटुंबांची संख्या व प्रमाण | सर्व्हेक्षण केलेल्या कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | महादेव कोळी | 46 (13.10) | 60 | 76.66 |
| 2 | ढोर कोळी | 54 (15.38) | 60 | 90.00 |
| 3 | कातकरी | 58 (16.52) | 60 | 96.66 |
| 4 | वारली | 53 (15.09) | 60 | 88.33 |
| 5 | कोकणा | 43 (12.25) | 60 | 71.66 |
| 6 | म ठाकूर | 48 (13.69) | 60 | 80.00 |
| 7 | क ठाकूर | 49 (13.96) | 60 | 81.66 |
| | एकूण | 351 (100) | 420 | 83.57 |

*१. संदर्भः प्राथमिक सर्व्हेक्षण*

*२. स्तंभ क्रमांक ३ मधील कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील उत्पन्नापेक्षा खर्च जास्त असणाऱ्या कुटुंबांचे विविध सात जमातीतील उत्पन्नापेक्षा खर्च जास्त असणाऱ्या एकूण ३५१ कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

*३. स्तंभ क्रमांक ५ मधील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील उत्पन्नापेक्षा खर्च जास्त असणाऱ्या कुटुंबांचे त्याच एका विशिष्ट जमातीतील सर्व्हेक्षण केलेल्या एकूण कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

८३.५७ टक्के एवढे मोठे आहे. यावरून अभ्यासक्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील आदिवासींच्या गरीबीची कल्पना येते.

विविध जमातींचा तुलनात्मकदृष्ट्या विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की, उत्पन्नापेक्षा खर्च जास्त असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण सर्वात जास्त कातकरी जमातीत असून ते १६.५२ टक्के आहे. तर सर्वात कमी प्रमाण कोकणा या जमातीत असून ते १२.२५ टक्के आहे.

एकेका जमातीचा स्वतंत्रपणे विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की, कातकरी जमातीतील केवळ ३.३४ टक्के कुटुंबांचा उपभोग खर्च उत्पन्नापेक्षा कमी आहे. तर ९६.६६ टक्के कुटुंबांचा उपभोग खर्च हा उत्पन्नापेक्षा जास्त आहे. ढोर कोळी जमातीतील ९०.०० टक्के कुटुंबांचा, वारली जमातीतील ८८.३३ टक्के कुटुंबांचा, क ठाकूर जमातीतील ८१.६६ टक्के कुटुंबांचा, म ठाकूर जमातीतील ८०.०० टक्के कुटुंबांचा, कोकणा जमातीतील ७१.६६ टक्के कुटुंबांचा तर महादेव कोळी जमातीतील ७६.६६ टक्के कुटुंबांचा उपभोग खर्च हा त्यांच्या उत्पन्नापेक्षा जास्त आहे. यावरून या जमातीतील आदिवासींच्या गरीबीची कल्पना येते. इतर जमातींच्या तुलनेत महादेव कोळी आणि कोकणा या जमातीत उत्पन्नापेक्षा खर्च जास्त असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण थोडे कमी असल्याने इतर जमातीपेक्षा या जमाती बऱ्या आर्थिक स्थितीतील वाटतात.

**वार्षिक आणि मासिक सरासरी खर्च**

तक्ता क्र. २१ मध्ये जमातीनुसार सर्व्हेक्षित आदिवासी कुटुंबांचा प्रतिकुटुंब वार्षिक सरासरी खर्च आणि मासिक सरासरी खर्च दर्शविला आहे. तसेच दरडोई सरासरी खर्च आणि दरडोई मासिक सरासरी खर्चही दर्शविला आहे.

मोखाडा तालुक्यातील अभ्यासक्षेत्रातील सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबांचा सन २००३-२००४ या वर्षातील प्रतिकुटुंब वार्षिक सरासरी खर्च २२९८० रूपये आहे. दरडोई वार्षिक सरासरी खर्च

तक्ता क्रमांक - २१

| अ.क्र. | जमातीचे नाव | सर्व्हेक्षित कुटुंबांची संख्या | जमातीची लोकसंख्या | प्रतिकुटुंब वार्षिक सरासरी खर्च | दरडोई वार्षिक सरासरी खर्च | प्रतिकुटुंब मासिक सरासरी खर्च | दरडोई मासिक सरासरी खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 6 | 7 | 6 | 7 |
| 1 | महादेव कोळी | 60 | 329 | 22674 | 4135 | 1890 | 345 |
| 2 | ढोर कोळी | 60 | 301 | 19421 | 3871 | 1618 | 323 |
| 3 | कातकरी | 60 | 344 | 27958 | 4876 | 2330 | 406 |
| 4 | वारली | 60 | 358 | 23469 | 3933 | 1956 | 328 |
| 5 | कोकणा | 60 | 375 | 22894 | 3663 | 1908 | 305 |
| 6 | म ठाकूर | 60 | 357 | 24017 | 4036 | 2001 | 336 |
| 7 | क ठाकूर | 60 | 261 | 20430 | 4697 | 1703 | 391 |
| | एकूण | 420 | 2325 | 22980 | 4173 | 1915 | 348 |

संदर्भः प्राथमिक सर्व्हेक्षण

४१७३ रूपये, प्रतिकुटुंब मासिक सरासरी खर्च १९१५ रूपये आणि दरडोई मासिक सरासरी खर्च ३४८ रूपये इतका आहे.

**प्रतिकुटुंब वार्षिक सरासरी उत्पन्न आणि उपभोग खर्च**

तक्ता क्र. २२ मध्ये विविध आदिवासी जमातीतील प्रतिकुटुंब वार्षिक सरासरी उत्पन्न आणि वार्षिक सरासरी उपभोग खर्च तसेच उत्पन्न व खर्चातील आधिक्य व तूट इत्यादी बाबी दर्शविल्या आहेत.

आदिवासी कुटुंबांचे प्रतिकुटुंब वार्षिक सरासरी उत्पन्न २४५१५ रूपये इतके आहे. तर वार्षिक सरासरी खर्च २२९८० रूपये आहे. वार्षिक सरासरी उत्पन्नापेक्षा वार्षिक सरासरी खर्च कमी असल्याने उत्पन्न व खर्चात १५३५ रूपये एवढे आधिक्य असल्याचे दिसून येते.

जमातीनुसार विचार करता असे दिसते की, महादेव कोळी, कोकणा, म ठाकूर आणि क ठाकूर या चार जमातींचा वार्षिक सरासरी उपभोग खर्च वार्षिक सरासरी उत्पन्नापेक्षा कमी आहे. त्यामुळे त्यांच्या उत्पन्न खर्चात आधिक्य दिसून येते. ढोरकोळी, कातकरी आणि वारली या तीन जमातींचा वार्षिक सरासरी उपभोग खर्च हा त्यांच्या उत्पन्नापेक्षा जास्त आहे. कातकरी, ढोर कोळी आणि वारली या तीन जमातींच्या उत्पन्न आणि खर्चात अनुक्रमे १६९०, ११३४ आणि ९४५ रूपयांची तूट असल्याने इतर जमातींच्या तुलनेत

तक्ता क्रमांक - २२

| अ.क्र. | जमातीचे नाव | वार्षिक सरासरी उत्पन्न (रू.) | वार्षिक सरासरी खर्च (रू.) | आधिक्य/ तूट (+/-) |
|---|---|---|---|---|
| 1 | महादेव कोळी | 27728 | 22674 | +5054 |
| 2 | ढोर कोळी | 18287 | 19421 | -1134 |
| 3 | कातकरी | 26268 | 27958 | -1690 |
| 4 | वारली | 22524 | 23469 | -945 |
| 5 | कोकणा | 23826 | 22894 | +932 |
| 6 | म ठाकूर | 25807 | 24017 | +1790 |
| 7 | क ठाकूर | 27162 | 20430 | +6732 |
| | सरासरी | 24515 | 22980 | +1535 |

संदर्भः प्राथमिक सर्व्हेक्षण

**(पृष्ठ क्र. ४४ वर पहा)**

# आदिवासींना भेडसावणारी उपासमार

## प्रास्ताविक

उपासमार ही आदिवासींना भेडसावणारी प्रमुख समस्या आहे. जगात सर्वात जास्त उपासमारग्रस्त लोकांची संख्या आपल्या भारतात आहे. जंगल आणि डोंगराळ भागात राहणाऱ्या आदिवासींना आणि इतर वननिवासींना या समस्येला अनेक वर्षांपासून तोंड द्यावे लागत आहे.

या शोधनिबंधात महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील आदिवासींना भेडसावणाऱ्या उपासमारीचा प्रश्न भेडसावणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण, उपासमारग्रस्त भूमीधारी आणि भूमीहीन कुटुंबांचे प्रमाण, उपासमारग्रस्त भूमिधारी आदिवासींच्या शेतजमिनीचा प्रतिकुटुंब सरासरी आकार, उपासमार न उद्‌भवलेल्या भूमिधारी आदिवासींच्या शेतजमिनीचा प्रतिकुटुंब सरासरी आकार, उपासमारीच्या काळातील आदिवासींचा आहार, उपासमारीस कारणीभूत असणारे घटक, उपासमारीचे परिणाम इत्यादी घटकांची चर्चा केली आहे. तसेच आदिवासी समाजातील लोकांची उपासमार उद्‌भवू नये यासाठी काही शिफारशीही सुचविल्या आहेत.

उदा. सीमांत शेतकरी, शेतमजूर इत्यादींना वर्षभर विशिष्ट प्रमाणात किंवा गरजेइतके मोफत अन्नधान्य पुरविणे, यापूर्वी सरकारने राबविलेली मएक रूपयात झुणका भाकरफही योजना सुरू करणे इत्यादी.

या शोधनिबंधात महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील आदिवासींना भेडसावणाऱ्या उपासमारीच्या प्रश्नाचा अभ्यास केला आहे.

**प्रस्तुत संशोधन विषयाची प्रमुख उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.**

१) आदिवासींना भेडसावणाऱ्या उपासमारीच्या कारणांचा अभ्यास करणे.

२) उपासमारीच्या काळातील आदिवासींच्या आहाराचा अभ्यास करणे.

३) उपासमारीचे परिणाम अभ्यासणे.

४) आदिवासींची उपासमार रोखण्यासाठी उपाय सुचविणे.

## संशोधन समस्येशी संबंधित साहित्याचा आढावा

प्रस्तुत शोधनिबंधात ज्या संशोधकांच्या लिखाणात आदिवासींना भेडसावणाऱ्या उपासमारीच्या प्रश्नावर माहिती आली आहे त्या संशोधकांच्या लिखाणाचा थोडक्यात आढावा घेतला आहे.

सिमिंग्टन [१] या इंग्रज अधिकाऱ्याने सन १९३८ साली भिल्ल आदिवासींचा अभ्यास केला होता. त्यांनी आपल्या अभ्यासात लिहून ठेवले आहे की, मभिल्लांना वर्षातून दोन ते तीन महिनेच काम मिळते. त्यानंतर ते मासे पकडतात व मध गोळा करतात. उरलेल्या वेळात त्यांच्यावर भीक मागण्याची पाळी येते. अगर अंबाडी खावी लागते अथवा उपाशी रहावे लागते. थोडक्यात, भिल्ल स्वतःला जिवंत ठेऊ शकतो हा चमत्कारच म्हटला पाहिजे.

गोदावरी परूळेकर [२] यांनी खूप वर्षे ठाणे जिल्ह्यातील आदिवासी समाजात काम करून आदिवासींच्या जीवनावर लेखन केले आहे. त्यांनी

आपल्या पुस्तकात असे म्हटले आहे की, मवारली आदिवासींकडे असलेली जमीन आकाराने खूप कमी असून त्यातून अत्यंत थोडे उत्तन्न मिळते. त्यातले बरेचसे उत्पन्न सावकाराला द्यावे लागते. उरलेले भात वारली कुटुंबाला केवळ चार ते पाच महिनेच पुरतात. तांदूळ शिजल्यावर मिठाच्या खड्याबरोबर व पाण्याच्या घोटाबरोबर खातात. कडकीच्या काळात अंबाडी, चिंचेचा पाला, कच्चे आंबे, करवंदे, मोहाची फुले, आळूचे कांदे, कडू कांदे यावर आदिवासी आपली उपजीविका करतात.फ

नारगोळकर वसंत आणि नारगोळकर कुसुम[३] यांनीही अनेक वर्षे आदिवासी लोकांत काम केले आहे. त्यांनीही आदिवासींच्या जीवनावर मजंगलचे राजेफ हे पुस्तक लिहिले आहे. त्यात ते म्हणतात, मवारली, कातकरी इतके गरीब आहेत की, त्यांच्यापैकी ७० ते ८० टक्के कुटुंबांना वर्षातील काही महिने अर्धपोटी काढावे लागतात. इतकेच नव्हे तर कित्येकावर लागोपाठ दोन-तीन दिवस उपवास काढण्याचेही प्रसंग येतात. अन्न टंचाईच्या काळात नाचणी, वरी इत्यादी धान्ये दळून या पिठापासून आंबवून तयार केलेली कांजीसारखी मआंबीलफ हा त्यांचा मुख्य आहार असतो. शेवग्याचा किंवा चिंचेचा कोवळा पाला, शिंदीची फळे, करवंदे इत्यादी जे सापडेल ते खाऊन ते कसेतरी दिवस काढतात. डोंगरात बटाट्यासारखे दिसणारे परंतु कडू जहरी कंद सापडतात. ते घरी आणून उकडून आदिवासी खातात. रात्री राखेत घालून ठेवून सकाळी उकडल्यानंतर त्यांचा कडूपणा बराच कमी होतो. हे कंद सतत लागोपाठ सात-आठ दिवस खाल्ले तर सुस्ती येते आणि पायाच्या पोटऱ्या व मांड्या दुखतात.फ

अनुताई वाघ[४] यांनीही आदिवासी समाजात अनेक वर्षे वास्तव्य करून त्यांचा अभ्यास केला आहे. त्यांना अभ्यासात असे दिसून आले की, खायला अन्न नसले की, आदिवासी गवताची मुळे खणून काढतात व ती खातात. या मुळ्यांना मगुदांड्याफ असे म्हणतात. फेब्रुवारी ते जून पर्यंत आदिवासी रानोमाळ भटकून आपले खाद्य शोधतात. करवंदे, सीताफळे, बोरी, कैऱ्या, जांभळे, आवळे, चिंचा, खजुऱ्या आणि इतर रानटी फळे कच्ची खाल्ली जातात. आदिवासी मुले पक्षी मारून तेथेच गवत गोळा करून भाजून खातात. खाद्यासाठी वणवण भटकूनही पोटभर खायला मिळत नाही. आदिवासी स्वाभिमानी आहेत. ते एकवेळ उपाशी राहतील. पण भीक मागणार नाहीत. उपाशी राहिले तरी ते आनंदी दिसतात.

जेकब जॉन कटकयम [५] यांनी केलेल्या अभ्यासानुसार उरली जमातीचे आदिवासी जंगलाच्या विविध भागात सापडणारे कंद आणि मुळ्या गोळा करतात. जेव्हा उरली आदिवासींना अन्नधान्याचा तुटवडा पडतो तेंव्हा ते वरील विविध प्रकारचे कंद गोळा करतात आणि अन्न म्हणून त्याचा उपयोग करतात. हे कंद जमिनीतून खणून काढावे लागतात. परंतु उन्हाळ्यात जमीन खूप कडक झालेली असते आणि पावसाळ्यात चिखलयुक्त व चिकट झालेली असते. त्यामुळे डिसेंबर ते एप्रिल हा काळ कंद खणण्यासाठी योग्य असतो.

गोविंद गारे [६] यांनी महाराष्ट्रातील माडिया गोंड जमातीचा अभ्यास केला आहे. त्यांना अभ्यासात असे आढळले की, माडिया गोंड आदिवासींची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यामुळे पुरेसा आणि पोषक आहार आदिवासींना मिळत नाही. वर्षातील अनेक दिवस आदिवासींना अर्धपोटीच रहावे लागते. माडिया गोंड आदिवासींचे मुख्य अन्न धान (भात) हे आहे.

आहारात डाळींचा वापर क्वचितच केला जातो. बऱ्यापैकी स्थिती असलेल्या कुटुंबांच्या आहारातच रोज भात असतो. फक्त सणाच्या वेळीच त्यांच्या आहारात मटण, मासे, भात, भाज्या आणि फळे असतात. कंद आणि मुळे हा त्यांचा पूरक आहार आहे. आहारात दूध अत्यंत दुर्मिळ असते. गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना विशेष आहार मिळत नाही.

पी.सी. महापात्रा[७] यांनी ओरिसा राज्यातील आदिवासींचा अभ्यास केला आहे. त्यांच्या अभ्यासानुसार ओरिसातील आदिवासींना अन्न टंचाईला तोंड द्यावे लागते. अन्न टंचाईच्या काळात या आदिवासींना जंगलातून कंद, जंगली फळे आणि काही प्राणी यावर अवलंबून रहावे लागते. या बाबींचा अन्न म्हणून त्यांना वापर करावा लागतो.

आदिवासी संशोधन संस्था, पुणे[८] यांनी नंदुरबार जिल्ह्यातील मावची आदिवासींचा अभ्यास केला आहे. त्यांच्या अभ्यासानुसार ५४ टक्के मावची कुटुंबे भूमिहीन आहेत. तर ६७ टक्के मावची कुटुंबांना त्यांनी उत्पादन केलेले अन्नधान्य आठ महिनेच पुरते.

जे.एस.इंगळे[९] यांनी एम.फिल. साठी प्रबंधिका तयार करण्यासाठी सन १९९५-९६ साली ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील आदिवासींचे सर्व्हेक्षण केले होते. त्यांना अभ्यासात असे आढळले की, तालुक्यातील सर्व्हेक्षित कुटुंबांपैकी ९४ टक्के आदिवासी कुटुंबांना वर्षातील काही दिवस उपाशी व अर्धपोटी रहावे लागते. काही आदिवासींना (३२.६४ टक्के) एप्रिल ते सप्टेंबर या काळात तर काही आदिवासींना (६७.३६ टक्के) जुलै ते सप्टेंबर या काळात उपासमार सहन करावी लागते. या काळात काही आदिवासींची सलग दोन दिवस उपासमार होते. भूक लागू नये म्हणून आदिवासी हालचाल न करता एका जागी पडून राहतात. उपासमारीच्या काळात आदिवासी जमिनीतील कडू कंदाचे गड्डे, वेलींची मुळे, वनस्पतींचा पाला, उंदीर, पक्षी इत्यादी खाऊन उपजीविका करतात. उपासमारीच्या काळात झाडपाला व इतर रानटी वनस्पती खाल्ल्याने डोकेदुखी, पोटदुखी इत्यादी विकार उद्‌भवतात.

महाराष्ट्र असोसिएशन ऑफ ॲन्थ्रॉपॉलाजिकल सायन्सेस, पुणे[१०] यांनी ठाणे जिल्ह्यातील जव्हार तालुक्यातील आदिवासींच्या अन्न प्रश्नाचा अभ्यास केला आहे. सर्व्हेक्षण केलेल्या पाच गावातील कुठल्याही आदिवासी कुटुंबांची उपासमार होत नसल्याचे संस्थेला आढळले. मात्र ७.३ टक्के कुटुंबांना मार्च ते जून या काळात अन्नधान्याचा तुटवडा जाणवतो व त्यामुळे त्यांना दिवसातून एक वेळा जेवण कमी करावे लागते. कमी जमीन, अपुरे धान्य उत्पादन व रोजगाराच्या संधींची अनुपलब्धता यामुळे अन्नधान्याचा तुटवडा जाणवतो. अन्नधान्याचा सर्वात जास्त तुटवडा वारली जमातीला जाणवतो.

**उपासमारीचा प्रश्न भेडसावणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण**

उपासमारीला आदिवासी त्यांच्या भाषेत 'कडकी' असे म्हणतात. भाद्रपद या मराठी महिन्याच्या दिवसात आदिवासींची मोठ्या प्रमाणावर उपासमार होते. म्हणून आदिवासी त्यास 'भादव्याची कडकी' असे म्हणतात. तक्ता क्र. १ मध्ये उपासमारीचा प्रश्न भेडसावणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण दर्शविले आहे.

सर्व्हेक्षण केलेल्या अभ्यासक्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील उपासमारग्रस्त कुटुंबांचे किंवा अन्नाची

तक्ता क्रमांक – १

| अ.क्र. | जमातीचे नाव | उपासमारग्रस्त कुटुंबांची संख्या | सर्व्हेक्षण केलेल्या कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | महादेव कोळी | 35 (11.07) | 60 | 58.34 |
| 2 | ढोर कोळी | 49 (15.50) | 60 | 81.67 |
| 3 | कातकरी | 57 (18.03) | 60 | 95.00 |
| 4 | वारली | 52 (16.45) | 60 | 86.67 |
| 5 | कोकणा | 32 (10.12) | 60 | 53.34 |
| 6 | म ठाकूर | 42 (13.29) | 60 | 70.00 |
| 7 | क ठाकूर | 49 (15.50) | 60 | 81.67 |
|  | **एकूण** | 316 (100) | **420** | **75.24** |

१. *संदर्भ:–प्राथमिक सर्व्हेक्षण*

२. *स्तंभ क्रमांक ३ मधील कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील उपासमारग्रस्त कुटुंबांचे सर्व्हेक्षित विविध सात जमातीतील एकूण ३१६ उपासमारग्रस्त कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

३. *स्तंभ क्रमांक ५ मधील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील उपासमारग्रस्त कुटुंबांचे त्याच एका विशिष्ट जमातीतील सर्व्हेक्षण केलेल्या एकूण (प्रत्येकी ६०) कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

टंचाई भेडसावणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ७५.२४ टक्के एवढे मोठे आहे. केवळ २४.७६ टक्के कुटुंबांना उपासमारीच्या प्रश्नाला तोंड द्यावे लागत नाही.

विविध सात जमातींचा तुलनात्मक दृष्ट्या विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की, उपासमारग्रस्त कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण कातकरी या जमातीत असून तो १८.०३ टक्के एवढे आहे. त्याखालोखाल हे प्रमाण वारली जमातीत असून ते १६.४५ टक्के इतके आहे.

एकेका जमातीचा स्वतंत्रपणे विचार करता असे दिसते की, कातकरी जमातीतील सर्व्हेक्षण केलेल्या ६० कुटुंबांपैकी ९५.०० टक्के कुटुंबांना अन्नटंचाईच्या प्रश्नाला तोंड द्यावे लागते. या जमातीतील केवळ ५.०० टक्के कुटुंबांची उपासमार होत नाही. वारली जमातीतील ८६.६७ टक्के कुटुंबांना उपासमारीचा प्रश्न भेडसावतो. या जमातीतील १३.३३ टक्के कुटुंबांना वर्षभर पोटभर अन्न मिळते. त्यामुळे त्यांची उपासमार होत नाही. वरील तक्त्यावरून असे दिसते की, ढोरकोळी आणि क ठाकूर या जमातीतील प्रत्येकी ८१.६७ टक्के कुटुंबांची आणि म ठाकूर जमातीतील ७०.०० टक्के कुटुंबांची वर्षातील काही महिने अन्नाअभावी उपासमार होते. वरील पाच जमातींच्या तुलनेत कोकणा (५३.३४ टक्के) आणि महादेव कोळी (५८.३४ टक्के) जमातीत उपासमारीचा प्रश्न भेडसावणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण कमी आहे.

## उपासमारग्रस्त भूमिहीन कुटुंबांचे एकूण भूमिहीन कुटुंबांशी प्रमाण

तक्ता क्र. २ मध्ये एकूण भूमिहीन आदिवासी कुटुंबापैकी किती भूमिहीन कुटुंबांना उपासमारीच्या प्रश्नाला तोंड द्यावे लागते याची माहिती दिली आहे.

तक्ता क्रमांक - २

| अ. क्र. | जमातीचे नाव | सर्व्हेक्षित कुटुंबांची संख्या | उपासमारग्रस्त कुटुंबांची संख्या | उपासमारग्रस्त भूमिहीन कुटुंबांची संख्या | सर्व्हेक्षित कुटुंबांपैकी भूमिहीन कुटुंबांची संख्या | उपासमारग्रस्त भूमिहीन कुटुंबांचे एकूण भूमिहीन कुटुंबांशी प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | म.कोळी | 60 | 35 | 13 (7.10) | 16 | 81.25 |
| 2 | ढोर कोळी | 60 | 49 | 47 (25.68) | 54 | 87.03 |
| 3 | कातकरी | 60 | 57 | 46 (25.13) | 48 | 95.83 |
| 4 | वारली | 60 | 52 | 28 (15.30) | 31 | 90.32 |
| 5 | कोकणा | 60 | 32 | 07 (3.82) | 09 | 77.77 |
| 6 | म ठाकूर | 60 | 42 | 08 (4.37) | 09 | 88.88 |
| 7 | क ठाकूर | 60 | 49 | 34 (18.57) | 34 | 100.00 |
| | **एकूण** | **420** | **316** | **183 (100)** | **201** | **91.04** |

१. *संदर्भ : प्राथमिक सर्व्हेक्षण*

२. *स्तंभ क्रमांक ५ मधील कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका विशिष्ट जमातीतील उपासमारग्रस्त भूमिहीन कुटुंबांचे विविध सात जमातीतील एकूण १८३ उपासमारग्रस्त भूमिहीन कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

३. *स्तंभ क्रमांक ७ मधील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका विशिष्ट जमातीतील उपासमारग्रस्त भूमिहीन कुटुंबांचे* त्याच एका विशिष्ट जमातीतील एकूण भूमिहीन कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

एकूण २०१ भूमिहीन आदिवासी कुटुंबापैकी १८३ कुटुंबांना (९१.०४ टक्के) भुकेचा किंवा उपासमारीचा प्रश्न भेडसावतो. अशा प्रकारे भूमिहीन आदिवासीमध्ये उपासमारीचा प्रश्न भेडसावणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण खूप मोठे असल्याचे दिसते.

एकेका जमातीचा स्वतंत्रपणे विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की, क ठाकूर या जमातीतील सर्व (१०० टक्के) भूमिहीन कुटुंबांची उपासमार होते. या जमातीतील उपासमारग्रस्त भूमिहीन कुटुंबांची संख्या ३४ इतकी आहे. तर या जमातीतील एकूण भूमिहीन कुटुंबांची संख्याही ३४ इतकी आहे. कातकरी जमातीचा विचार करता असे दिसते की, या जमातीतील उपासमारग्रस्त भूमिहीन कुटुंबांचे प्रमाण ९५.८३ टक्के इतके आहे. या जमातीतील केवळ ४.१७ टक्के भूमिहीन कुटुंबांची उपासमार होत नाही. वरील तक्त्यावरून असे दिसते की कोकणा जमात वगळता (७७.७७ टक्के) सर्वच जमातीत उपासमारग्रस्त भूमिहीन कुटुंबांचे प्रमाण ८०.०० टक्के पेक्षा जास्त आहे. वारली जमातीतील ९०.३२ टक्के, म ठाकूर जमातीतील ८८.८८ टक्के, ढोर कोळी जमातीतील ८७.०३ टक्के आणि महादेव कोळी या जमातीतील ८१.२५ टक्के भूमिहीन कुटुंबांना भुकेचा किंवा अन्नतुटवड्याचा प्रश्न भेडसावतो.

विविध सात जमातींचा तुलनात्मक दृष्ट्या विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की, एकूण १८३ उपासमारग्रस्त भूमिहीन आदिवासी कुटुंबामध्ये उपासमारीचा प्रश्न भेडसावणाऱ्या कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण ढोरकोळी या जमातीत असून ते २५.६८ टक्के एवढे आहे. त्याखालोखाल हे प्रमाण

कातकरी या जमातीत असून ते २५.१३ टक्के एवढे आहे. क ठाकूर या जमातीत भुकेचा प्रश्न भेडसावणाऱ्या भूमिहीन कुटुंबांचे सर्व जमातीतील एकूण १८३ उपासमारग्रस्त भूमिहीन कुटुंबांशी शेकडा प्रमाण १८.५७ इतके आहे. कोकणा या जमातीत भुकेचा प्रश्न भेडसावणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ३.८२ टक्के आहे. तर म ठाकूर या जमातीत हे प्रमाण ४.३७ टक्के आहे.

## उपासमारग्रस्त भूमिधारी कुटुंबांचे एकूण भूमिधारी कुटुंबाशी प्रमाण

तक्ता क्र. ३ मध्ये एकूण भूमिधारी आदिवासी कुटुंबापैकी किती भूमिधारी कुटुंबांना उपासमारीच्या प्रश्नाला तोंड द्यावे लागते याची माहिती दिली आहे.

तक्ता क्रमांक – ३

| अ. क्र. | जमातीचे नाव | सर्व्हेक्षित कुटुंबांची संख्या | उपासमारग्रस्त कुटुंबांची संख्या | उपासमारग्रस्त भूमिधारी कुटुंबांची संख्या | सर्व्हेक्षित कुटुंबांपैकी भूमिधारी कुटुंबांची संख्या | उपासमारग्रस्त भूमिधारी कुटुंबांचे एकूण भूमिधारी कुटुंबांशी प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | म.कोळी | 60 | 35 | 22 (16.54) | 44 | 50.00 |
| 2 | ढोर कोळी | 60 | 49 | 02 (1.50) | 06 | 33.33 |
| 3 | कातकरी | 60 | 57 | 11 (8.27) | 12 | 91.66 |
| 4 | वारली | 60 | 52 | 24 (18.04) | 29 | 82.75 |
| 5 | कोकणा | 60 | 32 | 25 (18.79) | 51 | 49.01 |
| 6 | म ठाकूर | 60 | 42 | 34 (25.26) | 51 | 66.66 |
| 7 | क ठाकूर | 60 | 49 | 15 (11.27) | 26 | 57.69 |
| | **एकूण** | **420** | **316** | **133 (100)** | **219** | **60.73** |

१. *संदर्भः– प्राथमिक सर्व्हेक्षण*

२. *स्तंभ क्रमांक ५ मधील कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील उपासमारग्रस्त भूमिधारी कुटुंबांचे विविध सात जमातीतील एकूण १३३ उपासमारग्रस्त भूमिधारी आदिवासी कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

३. *स्तंभ क्रमांक ७ मधील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका विशिष्ट जमातीतील उपासमारग्रस्त भूमिधारी कुटुंबांचे* त्याच एका विशिष्ट जमातीतील एकूण भूमिधारी कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

वरील तक्त्यावरून असे दिसते की, एकूण २१९ भूमिधारी आदिवासी कुटुंबांपैकी १३३ कुटुंबांना (६०.३३ टक्के) भुकेचा प्रश्न भेडसावतो. अशा प्रकारे भूमिधारी आदिवासीमध्ये उपासमारीचा प्रश्न भेडसावणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण खूप मोठे असल्याचे दिसून येते.

एकेका जमातीचा स्वतंत्रपणे विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की, कातकरी या जमातीतील एकूण १२ भूमिधारी कुटुंबांपैकी ९१.६६ टक्के कुटुंबांची उपासमार होते. याचा अर्थ या जमातीतील एकूण भूमिधारी कुटुंबांपैकी केवळ ८.३४ टक्के कुटुंबांना भुकेचा प्रश्न भेडसावत नाही. वारली जमातीचा विचार करता असे दिसते की, या जमातीतील एकूण २९ भूमिधारी आदिवासी कुटुंबांपैकी ८२.७५

टक्के कुटुंबांची उपासमार होते. या जमातीतील १७.२५ टक्के कुटुंबांना उपासमारीचा प्रश्न भेडसावत नाही.

विविध सात जमातींचा तुलनात्मकदृष्ट्या विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की, एकूण १३३ उपासमार ग्रस्त भूमिधारी आदिवासी कुटुंबांमध्ये उपासमारीचा प्रश्न भेडसावणाऱ्या कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण म ठाकूर या जमातीत असून ते २५.५६ टक्के एवढे आहे. त्याखालोखाल हे प्रमाण कोकणा (१८.७९ टक्के), वारली (१८.०४ टक्के) आणि महादेव कोळी (१६.५४ टक्के) या जमातीत आहे.

**उपासमारग्रस्त भूमिधारी आणि भूमिहीन आदिवासी कुटुंबांचे एकूण उपासमारग्रस्त कुटुंबांशी प्रमाण**

तक्ता क्र. ४ मध्ये उपासमारग्रस्त भूमिधारी आणि भूमिहीन आदिवासी कुटुंबांचे एकूण उपासमारग्रस्त कुटुंबांशी असलेले प्रमाण दर्शविले आहे.

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, सर्व्हेक्षण केलेल्या एकूण ४२० आदिवासी कुटुंबांपैकी भुकेचा प्रश्न भेडसावणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या ३१६ इतकी असून त्यामध्ये भूमिधारी कुटुंबांचे प्रमाण

तक्ता क्रमांक – ४

| अ.क्र. | जमातीचे नाव | उपासमारग्रस्त भूमिधारी कुटुंबांची संख्या | उपासमारग्रस्त भूमिहीन कुटुंबांची संख्या | एकूण उपासमारग्रस्त कुटुंबांची संख्या व प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | **म.कोळी** | 22 (62.86) | 13 (37.14) | 35 (100) |
| 2 | **ढोर कोळी** | 02 (4.08) | 47 (95.92) | 49 (100) |
| 3 | **कातकरी** | 11 (19.29) | 46 (80.71) | 57 (100) |
| 4 | **वारली** | 24 (46.15) | 28 (53.85) | 52 (100) |
| 5 | **कोकणा** | 25 (78.12) | 07 (21.88) | 32 (100) |
| 6 | **मठाकूर** | 34 (80.95) | 08 (19.05) | 42 (100) |
| 7 | **क ठाकूर** | 15 (30.61) | 34 (69.39) | 49 (100) |
| | **एकूण** | **133 (42.08)** | **183 (57.92)** | **316 (100)** |

१. *संदर्भ:– प्राथमिक सर्व्हेक्षण*

२. *स्तंभ क्रमांक ३ मधील कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील उपासमारग्रस्त भूमिधारी कुटुंबांचे त्याच एका विशिष्ट जमातीतील एकूण उपासमारग्रस्त कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

३. *स्तंभ क्रमांक ४ मधील कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील उपासमारग्रस्त भूमिहीन कुटुंबांचे त्याच एका विशिष्ट जमातीतील एकूण उपासमारग्रस्त कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

४२.०८ टक्के इतके अहे. तर भूमिहीन कुटुंबांचे प्रमाण ५७.९२ टक्के इतके आहे. अशा प्रकारे एकूण उपासमारग्रस्त कुटुंबामध्ये भूमिधारी कुटुंबापेक्षा भूमिहीन कुटुंबांचे प्रमाण अधिक असल्याचे वरील तक्त्यावरून स्पष्ट होते. म ठाकूर या जमातीत उपासमारग्रस्त भूमिधारी कुटुंबांचे प्रमाण ८०.९५ टक्के आहे. तर उपासमारग्रस्त भूमिहीन कुटुंबांचे प्रमाण १९.०५ टक्के आहे. ढोरकोळी या जमातीत उपासमारग्रस्त भूमिधारी कुटुंबांचे प्रमाण ४.०८ टक्के आहे. तर याच जमातील उपासमारग्रस्त भूमिहीन कुटुंबांचे प्रमाण ९५.९२ टक्के एवढे आहे.

## उपासमारग्रस्त भूमिधारी आदिवासींच्या शेतजमिनीचा प्रतिकुटुंब सरासरी आकार

खालील तक्त्यात (क्र. ५) उपासमारीचा प्रश्न भेडसावणाऱ्या भूमिधारी कुटुंबांकडे असलेल्या शेतजमिनीच्या सरासरी आकारमानाची माहिती दिली आहे.

उपासमारीचा प्रश्न भेडसावणाऱ्या १३३ भूमिधारी आदिवासी कुटुंबांच्या मालकीची ३२८ एकर इतकी जमीन असून प्रतिकुटुंब सरासरी जमिनीचा आकार २.४६ एकर इतका लहान आहे. वरील तक्त्यात जमिनीचे प्रतिकुटुंब सरासरी धारण क्षेत्र २.४६ एकर एवढे दिसत असले तरी प्रत्यक्षात कसण्यालायक किंवा पिकाऊ जमीन खूपच कमी असल्याचे आदिवासी भागातील काही वर्षांच्या वास्तव्यात आणि अभ्यासात दिसून आले. प्रत्येक कुटुंबाकडे एकूण जमिनीच्या सरासरी २० टक्क्यापेक्षा अधिक जमीन पडीक किंवा निरूपयोगी असते. त्यामुळे प्रतिकुटुंब सरासरी जमिनीचा आकार दोन एकरापेक्षा सुद्धा कमी भरतो.

विविध सात जमातींचा तुलनात्मकदृष्ट्या विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की, ढोरकोळी या जमातीतील उपासमार भेडसावणाऱ्या भूमिधारी कुटुंबांची संख्या ०२ इतकी आहे. तर प्रतिकुटुंब सरासरी धारण क्षेत्र ३.०० एकर एवढे आहे. क ठाकूर या जमातीतील उपासमारग्रस्त भूमिधारी कुटुंबांची संख्या १५ इतकी असून प्रतिकुटुंब सरासरी धारण क्षेत्र १.८० एकर आहे.

तक्ता क्रमांक - ५

| अ.क्र. | जमातीचे नाव | उपासमार भेडसावणाऱ्या भूमिधारी आदिवासी कुटुंबांची संख्या | एकूण शेत जमीन (एकर) | प्रतिकुटुंब सरासरी जमीन (एकर) |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | म.कोळी | 22 | 56 एकर | 2.54 एकर |
| 2 | ढोर कोळी | 02 | 06 एकर | 3.00 एकर |
| 3 | कातकरी | 11 | 38 एकर | 3.45 एकर |
| 4 | वारली | 24 | 62 एकर | 2.58 एकर |
| 5 | कोकणा | 25 | 57 एकर | 2.28 एकर |
| 6 | म ठाकूर | 34 | 82 एकर | 2.41 एकर |
| 7 | क ठाकूर | 15 | 27 एकर | 1.80 एकर |
| | **एकूण** | **133** | **328 एकर** | **2.46 एकर** |

संदर्भः- प्राथमिक सर्व्हेक्षण

तक्त्यावरून आणि स्पष्टीकरणावरून असा निष्कर्ष निघतो की, प्रतिकुटुंब सरासरी धारण क्षेत्र अत्यंत लहान किंवा अनार्थिक असल्याने शेतजमीन असूनही बहुसंख्य भूमिधारी आदिवासी कुटुंबांना वर्षातील काही महिने भुकेच्या किंवा अन्न तुटवड्याच्या प्रश्नाला तोंड द्यावे लागते.

## उपासमार न उद्‌भवलेल्या भूमिधारी आदिवासींच्या शेतजमिनीचा प्रतिकुटुंब सरासरी आकार

तक्ता क्र. ६ मध्ये उपासमार न उद्‌भवलेल्या

किंवा उपासमारीच्या प्रश्नास तोंड द्यावे न लागणाऱ्या/लागलेल्या आदिवासींच्या शेतजमिनीचा प्रतिकुटुंब सरासरी आकार दर्शविला आहे.

वरील तक्त्यावरून असे दिसते की, उपासमारीचा प्रश्न न भेडसावणाऱ्या ८६ भूमिधारी आदिवासी कुटुंबांच्या मालकीची एकूण ८८१ एकर इतकी जमीन असून प्रतिकुटुंब सरासरी जमिनीचा आकार १०.२४ एकर इतका मोठा आहे.

विविध सात जमातींचा तुलनात्मकदृष्ट्या विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की, क ठाकूर या जमातीत प्रतिकुटुंब सरासरी जमीन धारण क्षेत्र १३.५४ एकर एवढे मोठे आहे. तर वारली जमातीचे प्रतिकुटुंब सरासरी जमीन धारण क्षेत्र ५.८० एकर एवढे आहे.

वरील तक्त्यावरून असा निष्कर्ष निघतो की, प्रतिकुटुंब सरासरी जमीन धारण क्षेत्राचा आकार पुरेसा किंवा मोठा असेल तर भुकेच्या प्रश्नाशी आदिवासींना सामना करावा लागत नाही.

तक्ता क्रमांक - ६

| अ.क्र. | जमातीचे नाव | उपासमार न उद्‌भवलेल्या भूमिधारी आदिवासी कुटुंबांची संख्या | एकूण शेत जमीन | प्रतिकुटुंब सरासरी जमीन |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | म.कोळी | 22 | 257 एकर | 11.68 एकर |
| 2 | ढोर कोळी | 02 | 50 एकर | 12.50 एकर |
| 3 | कातकरी | 01 | 09 एकर | 9.00 एकर |
| 4 | वारली | 05 | 29 एकर | 5.80 एकर |
| 5 | कोकणा | 26 | 216 एकर | 8.30 एकर |
| 6 | म ठाकूर | 17 | 171 एकर | 10.05 एकर |
| 7 | क ठाकूर | 11 | 149 एकर | 13.54 एकर |
| | **एकूण** | **86** | **881 एकर** | **10.24 एकर** |

संदर्भः- प्राथमिक सर्व्हेक्षण

**उपासमार उद्‌भवलेल्या आणि न उद्‌भवलेल्या भूमिधारी आदिवासींच्या शेतजमिनीच्या प्रतिकुटुंब सरासरी आकार**

**तुलनात्मक माहिती**

तक्ता क्र. ७ मध्ये उपासमारीचा प्रश्न भेडसावणाऱ्या भूमिधारी आदिवासींच्या आणि उपासमार न भेडसावणाऱ्या भूमिधारी कुटुंबांच्या मालकीच्या सरासरी जमिनीच्या आकाराची माहिती आहे.

उपासमारीचा प्रश्न भेडसावणाऱ्या भूमिधारी आदिवासींच्या शेतजमिनीचा प्रतिकुटुंब सरासरी आकार खूपच कमी आहे.(२.४६ एकर) आणि उपासमार न होणाऱ्या भूमिधारी आदिवासींच्या शेतजमिनीचा प्रतिकुटुंब सरासरी आकार तुलनेने चार पटीपेक्षा मोठा आहे. (१०.१२ एकर). याचा अर्थ आदिवासी कुटुंबाकडे पुरेशी शेतजमीन असेल तर त्या कुटुंबाची उपासमार होत नाही किंवा त्या कुटुंबाला अन्न टंचाईच्या प्रश्नाला तोंड द्यावे लागत नाही.

तक्ता क्रमांक – ७

| अ.क्र. | जमातीचे नाव | उपासमार होणाऱ्या भूमिधारी आदिवासींच्या शेतजमिनीचा प्रतिकुटुंब सरासरी आकार | उपासमार न होणाऱ्या भूमिधारी आदिवासींच्या शेतजमिनीचा प्रतिकुटुंब सरासरी आकार |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | महादेव कोळी | 2.54 एकर | 11.68 एकर |
| 2 | ढोर कोळी | 3.00 एकर | 12.50 एकर |
| 3 | कातकरी | 3.45 एकर | 9.00 एकर |
| 4 | वारली | 2.58 एकर | 5.80 एकर |
| 5 | कोकणा | 2.28 एकर | 8.30 एकर |
| 6 | म ठाकूर | 2.41 एकर | 10.05 एकर |
| 7 | क ठाकूर | 1.80 एकर | 13.54 एकर |
| | **एकूण** | **2.46 एकर** | **10.24 एकर** |

संदर्भः– प्राथमिक सर्व्हेक्षण

### १८ भूमिहीन आदिवासी कुटुंबांना उपासमारीचा प्रश्न न भेडसावण्याची कारणे

तक्ता क्रमांक ८ वरून असे दिसते की, एकूण २०१ भूमिहीन कुटुंबांपैकी १८३ कुटुंबांना (९१.०४ टक्के) उपासमारीच्या प्रश्नाला तोंड द्यावे लागते. तर १८ भूमिहीन कुटुंबांना (८.९६ टक्के) उपासमार सहन करावी लागत नाही. भूमिहीन असूनही या १८ कुटुंबांना उपासमारीस का तोंड द्यावे लागत नाही याची माहिती संबंधित कुटुंबांच्या मुलाखती घेऊन मिळविली. ही माहिती तक्ता क्र. ८ मध्ये दर्शविली आहे.

उपासमारीचा प्रश्न न भेडसावणाऱ्या १८ आदिवासी कुटुंबांपैकी ०५ कुटुंबांतील प्रत्येकी एक व्यक्ती शासकीय व निमशासकीय सेवेत आहे. अशा प्रकारे एकूण १८ भूमिहीन कुटुंबांपैकी २७.७७ टक्के कुटुंबांतील प्रत्येकी एक सदस्य नोकरीत असल्याने त्या कुटुंबांची उपासमार होत नाही. यावरून असा निष्कर्ष निघतो की, भूमिहीन कुटुंबांना नोकरीत प्राधान्य दिले तर गरीब भूमिहीन कुटुंबांना भुकेच्या प्रश्नास तोंड द्यावे लागत नाही.

कुटुंबाचा आकार मोठा असेल तर उपासमार भेडसावत नाही असे वरील तक्त्यावरून दिसून येते. म्हणजे मोठ्या आकाराच्या कुटुंबांत मजुरी करणाऱ्यांची संख्या जास्त असेल तर उपासमार भेडसावत नाही. किराणा दुकान, लोहार काम, भगतगिरी अशासारखे व्यवसाय बऱ्यापैकी चालत असतील तर अशा कुटुंबांना अन्न तुटवड्याच्या किंवा उपासमारीच्या प्रश्नाला तोंड द्यावे लागत नाही. हे वरील तक्त्यावरून स्पष्ट होते.

### उपासमारीच्या काळातील आदिवासींचा आहार

उपासमारीच्या काळात आदिवासींना रोज दहा टक्के सुद्धा भाकरी, भात इत्यादी अन्न खायला मिळत नाही. उपासमारीचा कालावधी एक महिन्यापासून तीन ते चार महिने एवढा मोठा असतो. थोडी शेतजमीन असणाऱ्यांना एक ते दोन महिने तर भूमिहीन कुटुंबांना तीन ते चार महिने उपासमार सहन करावी लागते. अतिपावसाच्या काळात कामासाठी बाहेर पडता येत नाही. त्यावेळी आदिवासींचे पोटापाण्याचे खूपच हाल होतात. जमिनीतील कंद, बांबूचे कोंब, विविध पक्षी

तक्ता क्रमांक – ८

| अ.क्र. | घटक | जमातीचे नाव व कुटुंबांची संख्या | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | महादेव कोळी | ढोर कोळी | कातकरी | वारली | कोकणा | म ठाकूर | क ठाकूर | एकूण कुटुंबे | शेकडा प्रमाण |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 1 | नोकरी | 02 | 01 | 0 | 01 | 0 | 01 | 0 | 05 | 27.77 |
| 2 | नोकरी व किराणा व दुकान | 0 | 0 | 0 | 01 | 0 | 0 | 0 | 01 | 5.55 |
| 3 | किराणा दुकान | 01 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 01 | 5.55 |
| 4 | कुटुंबात मजुरी करणारे जास्त | 0 | 01 | 02 | 0 | 01 | 0 | 0 | 04 | 22.22 |
| 5 | भगतगिरी | 0 | 01 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 01 | 5.55 |
| 6 | हॉटेल कामगार, लोहार काम | 0 | 02 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 02 | 11.11 |
| 7 | कुटुंबाचा लहान आकार | 0 | 02 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 02 | 11.11 |
| 8 | खंडाची,फॉरेस्टची शेती व मजुरी | 0 | 0 | 0 | 01 | 0 | 0 | 0 | 01 | 5.55 |
| 9 | खंडाची शेती व मजुरी | 0 | 0 | 0 | 0 | 01 | 0 | 0 | 01 | 5.55 |
| | **एकूण** | **03** (16.66) | **07** (38.88) | **02** (11.11) | **03** (16.66) | **02** (11.11) | **01** (5.55) | **0** | **18** (100) | **100** |

*१. संदर्भः– प्राथमिक सर्व्हेक्षण २. कंसातील आकडे टक्केवारी दर्शविते.*

इत्यादी खाऊन आदिवासी कशीबशी उपजीविका करतात. काही वेळा कडू कंद किंवा अन्य वनस्पती सुद्धा पुरेशा प्रमाणात मिळत नाहीत. त्यामुळे सलग एक ते दोन दिवस उपाशी रहावे लागते. उपासमारीच्या काळात भूक भागवण्यासाठी भात, भाकरीबरोबर अन्य कोणत्या वनस्पती आणि पशुपक्षी खाऊन आदिवासी जगतात याची माहिती तक्ता क्र. ९ मध्ये दिली आहे.

वरील तक्त्यावरून असे दिसते की, ६६.४५ टक्के आदिवासी कुटुंबे उपासमारीच्या काळात जमिनीतील कंद, रानभाज्या, बांबूचे कोवळे कोंब, करवंदे, आंबे इत्यादी जंगली फळे, इतर वनस्पती आणि काही जिवंत पक्षी व प्राणी खाऊन जगतात. तर ३३.५५ टक्के आदिवासी कुटुंबे वरील घटकाबरोबरच मेलेली जनावरे खाऊन उपजीविका करतात. आदिवासी भागातील काही वर्षांच्या वास्तव्यात असे आढळून आले की, आदिवासी विविध साधनांच्या साहाय्याने हवेत उडणारे किंवा झाडावरील पक्षी मारतात आणि तेथेच किंवा घरी नेऊन भाजून खातात. तसेच शिजवूनही खातात. आदिवासी विशिष्ट वनस्पतीपासून डिंकासारखा जो चिकट पदार्थ असतो तो काटक्यांना लाऊन झाडाला बांधून ठेवतात. या चिकट काटकीवर पक्षी बसले की त्यांना उडता येत नाही. असे पक्षी पकडून आदिवासी त्यावर गुजराण करतात. उपासमारीच्या काळाशिवाय इतर काळात

तक्ता क्रमांक - ९

| अ.क्र. | जमातीचे नाव | जमिनीतील कंद, रानभाज्या, बाबूंचे कोंब, करवंदे, आंबे इ. जंगली फळे व इतर वनस्पती आणि काही जिवंत पक्षी व प्राणी खाणाऱ्या कुटुंबांची संख्या | स्तंभ क्र. ३ मधील घटक आणि मेलेले पशुपक्षी खाऊन जगणाऱ्या कुटुंबांची संख्या | एकूण कुटुंबांची संख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | म.कोळी | 35 | 00 | 35 |
| 2 | ढोर कोळी | 00 | 49 | 49 |
| 3 | कातकरी | 00 | 57 | 57 |
| 4 | वारली | 52 | 00 | 52 |
| 5 | कोकणा | 32 | 00 | 32 |
| 6 | म ठाकूर | 42 | 00 | 42 |
| 7 | क ठाकूर | 49 | 00 | 49 |
| | **एकूण** | **210 (66.45)** | **106 (33.55)** | **316 (100)** |

*१. संदर्भ:- प्राथमिक सर्व्हेक्षण २. कंसातील आकडे टक्केवारी दर्शविते.*

सुद्धा आदिवासी अशा प्रकारे पक्षांची शिकार करून त्यांचे मांस शिजवून खातात.

वरील तक्त्यावरून असे दिसते की, कातकरी आणि ढोरकोळी या जमातीतील आदिवासी मेलेली जनावरेसुद्धा खातात. परंतु महादेव कोळी, वारली, कोकणा, म ठाकूर आणि क ठाकूर या जमातीतील आदिवासी मात्र मृत जनावरे खात नाहीत.

**उपासमारीस कारणीभूत असणारे घटक**

भूमिहीनता हे उपासमारीचे प्रमुख कारण आहे. तसेच बहुसंख्य भूमिधारी आदिवासींनाही उपासमारीचा प्रश्न भेडसावतो. कारण त्यांच्याकडील शेती तुटपुंजी व निकृष्ट आहे. आदिवासी भागात पूरक व्यवसायांना फारसा वाव नसणे हे सुद्धा उपासमारीचे मुख्य कारण आहे. सर्व्हेक्षणाच्या वेळी एका लहानशा आदिवासी पाड्यावर दोन पिठाच्या गिरण्या आढळून आल्या. या दोन्हीही गिरण्या दिवसातून जेमतेम दोन तासच चालू राहत होत्या. कोणाचेच पोट भरत नव्हते. अशा प्रकारे पूरक व्यवसाय किंवा जोडधंदे किफायतशीरपणे चालत नसल्याने आदिवासींना उपाशी व अर्धपोटी रहावे लागते. अतिपावसाच्या काळात आदिवासींना कामासाठी घराबाहेर पडता येत नाही. वर्षातील १५ ते २० दिवस घरात बसून काढावे लागतात. त्यामुळे उपासमार उद्‌भवते. आदिवासींना त्यांच्या भागात शेती क्षेत्रात २५ ते ३० रूपये प्रतिदिन एवढी तुटपुंजी मजुरी मिळत असल्याने पुढील वर्षासाठी बचत करून ठेवता येत नाही.

त्यामुळे भुकेच्या प्रश्नास तोंड द्यावे लागते. गरीबाऐवजी सधन आदिवासींना नोकऱ्यात संधी हे सुद्धा बहुसंख्य आदिवासींच्या उपासमारीचे कारण असल्याचे आढळून आले. ज्यांच्याकडे पूर्वीपासूनच भरपूर शेती आणि गुरे ढोरे होती त्यांनाच नोकरीत संधी दिल्याचे आढळले. अशांचे प्रमाण ९५.०० टक्केपेक्षा अधिक असल्याचे सर्व्हेक्षणात दिसून आले.

वरील घटकाव्यतिरिक्त खर्चिक विवाह पद्धती, सरकारकडे तक्रार न करण्याची आदिवासींची वृत्ती, जंगलातील झाडींचे कमी होत चाललेले प्रमाण हे

घटकसुद्धा आदिवासींच्या उपासमारीस जबाबदार असल्याचे अभ्यासात दिसून आले.

### उपासमारीचे परिणाम

उपासमारीच्या काळात आदिवासींना दोन-तीन महिने विविध प्रकारच्या वनस्पती शिजवून खाव्या लागतात. आहारात अन्नाचे प्रमाण कमी असते. वनस्पतींचे प्रमाण जास्त असते. कडू कंद, विविध झुडपांचा व वेलींचा पाला आणि झुडपांचे खोड इत्यादी खाल्यामुळे उलट्या, जुलाब, पोटदुखी, डोकेदुखी इत्यादी आजार उद्भवतात. अपुरे अन्न खावयास मिळाल्याने आदिवासी कुपोषित होतात. आदिवासी पुरूष, मुले यांच्याबरोबरच गरोदर स्त्रियासुद्धा कुपोषित राहून कुपोषित बालकास किंवा मृत बालकास जन्म देतात. उपासमारीमुळे आदिवासी अशक्त बनतात.

दगड फोडण्यासारखी कठीण कामे बहुसंख्य आदिवासी करू शकत नाहीत. त्यामुळे ठेकेदार परराज्यातून मजूर आणून कामे करवून घेतात. त्यामुळे कामे उपलब्ध असूनही काही आदिवासी कष्टाची कामे करू शकत नाहीत. कष्टाची कामे निभत नसल्याने त्यांना भुकेच्या प्रश्नास तोंड द्यावे लागते. अशा प्रकारे उपासमारीमुळे अशक्तपणा येऊन कष्टाची कामे निभत नाहीत किंवा करता येत नाहीत. त्यामुळे उपासमार उद्भवते. म्हणजेच उपासमारीतून उपासमारीचा प्रश्न उद्भवतो. अशा प्रकारे उपासमार हे उपासमारीचे कारण आणि परिणामसुद्धा आहे.

### उपासमार रोखण्यासाठी शिफारशी

आदिवासींना वर्षानुवर्षे भेडसावणारा उपासमारीचा प्रश्न संपुष्टात यावा यासाठी प्रस्तुत अभ्यासकाला काही शिफारशी सुचवाव्याशा वाटतात. त्या शिफारशी खालीलप्रमाणे दिल्या आहेत.

(१) शेतीतील रोजगार संपल्यानंतर आदिवासी भागात त्वरित रोजगाराची व्यवस्था उपलब्ध करून देणे.

(२) आदिवासींच्या विकासाच्या योजना किंवा सवलतींचा फायदा गरीब व गरजू आदिवासींपर्यंत पोहचला पाहिजे.

(३) भूकग्रस्त आदिवासींना स्वस्त धान्य दुकानातून वर्षभर अन्नधान्य, डाळी, तेल यांचा मोफत पुरवठा करणे.

(४) सीमांत शेतकरी, शेतमजूर इत्यादींना वर्षभर विशिष्ट प्रमाणात किंवा गरजेइतके मोफत धान्य पुरवणे.

(५) आदिवासी भागात एक रूपयात झुणका भाकर ही योजना सुरू करणे.

(६) भूमिहीन आदिवासींना जमिनीचे वाटप करणे.

(७) कुटुंबाचा आकार लहान ठेवण्यास आदिवासींना उद्युक्त करणे.

(८) शासकीय व निमशासकीय नोकऱ्यांत गरीब, भूमिहीन व अतिमागास (आदिम) जमातींना प्राधान्य देणे.

(९) दारिद्र्य निर्मूलनाचे कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबविणे.

(१०) लोकप्रतिनिधींनी भूकग्रस्तांना शासकीय मदत मिळवून देण्याचा प्रयत्न करणे.

(११) भूकग्रस्त कुटुंबांना बिनव्याजी खावटी कर्ज पुरवावे.

### समारोप

सीमांत आणि अल्पभूधारक शेतकरी, भूमिहीन आदिवासी यांना दरवर्षी उपासमारीच्या प्रश्नाला तोंड

द्यावे लागते. उपासमारीचा प्रश्न भेडसावणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण ७५.०० टक्के पेक्षा जास्त आहे. यावरून आदिवासींच्या दारिद्र्याची तर कल्पना येतेच. शिवाय अद्याप सरकारला आदिवासींच्या अन्नासारखी मूलभूत गरज सुद्धा पूर्ण करता आली नसल्याचे दिसून येते. अन्न टंचाईच्या काळात आदिवासींना झाडपाला, वेलींची पाने, जमिनीतील वनस्पतींचे कडू कंद खाऊन उपजीविका करावी लागते. आदिवासींच्या उपासमारीचा प्रश्न कायमचा संपुष्टात आणणे आवश्यक आहे. यासाठी शासन, लोकप्रतिनिधी, सेवाभावी संस्था, सामाजिक कार्यकर्ते यांनी महत्त्वाची भूमिका बजावली पाहिजे.

## संदर्भ


१) *जोग सुधीर व सोनक सुषमा 'सिमिंग्टन अहवालः शिफारशी व निष्कर्ष' आदिवासी संशोधन पत्रिका खंड-८, अंक- २ आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्च १९९६, पृ.क्र. ३४,३५*

२) *परूळेकर गोदावरी 'जेंव्हा माणूस जागा होतो', मौज प्रकाशन, ऑगस्ट १९७०, मुंबई-४ (महाराष्ट्र), पृ.क्र. ३०,३६*

३) *नारगोळकर वसंत आणि नारगोळकर कुसुम 'जंगलचे राजे' श्री मौनी विद्यापीठ, गारगोटी, कोल्हापूर, १९५५, पृ.क्र. ३४,३५*

४) *वाघ अनुताई, 'कोसबाडच्या टेकडीवरून', ऋचा प्रकाशन, ठाणे (महाराष्ट्र), १९९२, पृ.क्र. १०९*

५) *जेकब जॉन कटकय्यम, 'सोशल स्ट्रक्चर अॅन्ड चेंज अमांग द ट्रायबल्स'*

६) *गायकवाड जॉन (प्रमुख संपादक), 'सोशिओ-कल्चरल डायनामिक्स ऑफ ट्रायबल डेव्हलपमेंट', ट्रायबल रिसर्च अॅन्ड ट्रेनिंग इन्स्टिट्युट, पुणे, पृ.क्र. १२*

७) *मिश्रा रविनारायण (प्रमुख संपादक), 'ट्रायबल डेव्हलपमेंट-पोस्ट ग्लोबलायझेशन', डिस्कव्हरी पब्लिशिंग् हाऊस, न्यू दिल्ली, पृ. १८.*

८) *आदिवासी संशोधन संस्था, 'द मावचीस ऑफ नंदूरबारः ए लेसर नोन ट्राईब' आदिवासी संशोधन प्रशिक्षण संस्था, पुणे.*

९) *इंगळे जे.एस., 'ए स्टडी ऑफ द इकनॉमिक स्टेटस ऑफ ट्राईब्ज वुईथ स्पेशल रेफरन्स टू मोखाडा तालुका ऑफ ठाणे डिस्ट्रिक्ट', एम.फिल. डिझर्टेशन, सबमिटेड टू सायबर, कोल्हापूर, १९९८, पृ. क्र. १११ ते १२२*

१०) *मुटाटकर रामचंद्र (संपादक), 'हाकारा', महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, जुलै- डिसेंबर १९९८, पृ. क्र. ३१*

**इतर संदर्भ (प्रबंध व संशोधन ग्रंथ)**

१) *इंगळे जयवंत शंकरराव, 'महाराष्ट्र राज्यातील ठाणे जिल्ह्यातील आदिवासींचा आर्थिक व सामाजिक अभ्यास', पीएच.डी. प्रबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, मे २००८*

२) *इंगळे जयवंत शंकरराव, 'आदिवासींची आर्थिक व सामाजिक स्थिती', लीला-शंकर प्रकाशन, इस्लामपूर (सांगली), जुलै २००९*

३) *इंगळे जयवंत शंकरराव, 'आदिवासी समाजातील बालमृत्यूची समस्या', लीला-शंकर प्रकाशन, इस्लामपूर (सांगली), जून २०१०*


● ● ●

---

**(पृष्ठ क्र. ३० वरून)**

या जमाती आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या असल्याचे दिसून येते.

### ६. समारोप

बहुसंख्य आदिवासी आर्थिकदृष्ट्या दुर्बल आहेत. कारण वार्षिक ३०,००० रूपयांपर्यंत उत्पन्न असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण ८१.९० टक्के एवढे मोठे आहे. शेती आणि मजुरी ही आदिवासींच्या उत्पन्नाची प्रमुख दोन साधने आहेत. सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबांना वर्षभरात मिळालेल्या एकूण उत्पन्नात मजुरी पासून मिळालेल्या उत्पन्नाचा वाटा ६०.०१ टक्के इतका आहे. आदिवासींचे दरडोई वार्षिक सरासरी उत्पन्न ४४२८ रूपये इतके आहे. आदिवासींचा अन्नेतर बाबीवरील खर्च कमी असून अन्नावरील खर्चाचे प्रमाण जास्त आहे. अन्नावरील खर्चाचे एकूण खर्चाशी प्रमाण ६१.३६ टक्के आहे. यावरून आदिवासींच्या गरीबीची कल्पना येते. सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबांमध्ये उत्पन्नापेक्षा खर्च जास्त असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ८३.५७ टक्के एवढे मोठे आहे. यावरून आदिवासी आर्थिकदृष्ट्या किती दुर्बल आहेत याची कल्पना येते.

● ● ●

# आदिवासींचे स्थलांतर

प्रस्तुत शोध निबंधात ठाणे जिल्ह्यातील ज्या मोखाडा तालुक्यातील आदिवासींच्या स्थलांतराच्या समस्येचा अभ्यास केला आहे त्या मोखाडा तालुक्यातील आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण ९३.४६ टक्के इतके आहे. मोखाडा तालुक्यात महादेव कोळी, ढोर कोळी, कातकरी, वारली, कोकणा, म ठाकूर आणि क ठाकूर अशा विविध सात आदिवासी जमातींचे वास्तव्य आहे. उदरनिर्वाहासाठी बहुसंख्य आदिवासींना दरवर्षी दूरवर दाहीदिशा भटकावे लागत असल्याचे आणि परगावी स्थलांतराच्या ठिकाणी त्यांचे मोठे शोषण होत असल्याचे आदिवासी भागात फिरत असताना प्रस्तुत अभ्यासकाला समजून आले. या शोधनिबंधात स्थलांतराच्या कारणाबरोबरच स्थलांतरामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांचाही अभ्यास केला आहे. तसेच स्थलांतर करावे लागू नये यासाठी काही शिफारशीही सुचवल्या आहेत.

प्रस्तुत संशोधन विषयाची प्रमुख उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

१) दरवर्षी परगावी स्थलांतर कराव्या लागणाऱ्या आदिवासींच्या स्थलांतरामागची कारणे अभ्यासणे.

२) आदिवासींच्या स्थलांतराची वैशिष्ट्ये अभ्यासणे.

३) आदिवासींना परगावी किती दिवस काम मिळते आणि किती मजुरी मिळते ते पाहणे.

४) स्थलांतराचे परिणाम अभ्यासणे.

५) स्थलांतर करणाऱ्या आदिवासींच्या हाल-अपेष्टा कमी व्हाव्यात यासाठी उपाय सुचविणे.

मोखाडा तालुक्यातील आदिवासींच्या बाबतीत स्थलांतर म्हणजे उदरनिर्वाहासाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वर्षातील काही दिवस वास्तव्य करणे होय. तालुक्यातील आदिवासींना त्यांच्या मूळ भागात पुरेसा आणि खात्रीचा रोजगार मिळत नाही. त्यामुळे त्यांना दरवर्षी काही काळापुरते परगावी स्थलांतर करावे लागते. या भागात स्थलांतराची वैशिष्ट्ये, स्थलांतराची कारणे, परिणाम इत्यादी बाबींची माहिती खालीलप्रमाणे दिली आहे.

### स्थलांतर केलेल्या कुटुंबांचे प्रमाण

खालील तक्त्यात सन २००३-२००४ या वर्षात मोखाडा तालुक्यातील किती आदिवासी कुटुंबांनी परगावी स्थलांतर केले होते याची माहिती दिली आहे.

तक्ता क्रमांक - १

| अ.क्र. | जमातीचे नाव | स्थलांतर केलेल्या कुटुंबांची संख्या व प्रमाण | सर्व्हेक्षण केलेल्या कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | महादेव कोळी | 26 (9.62) | 60 | 43.33 |
| 2 | ढोर कोळी | 35 (12.96) | 60 | 58.33 |
| 3 | कातकरी | 57 (21.11) | 60 | 95.00 |
| 4 | वारली | 46 (17.03) | 60 | 76.66 |
| 5 | कोकणा | 31 (11.48) | 60 - | 51.66 |
| 6 | म ठाकूर | 34 (12.59) | 60 | 56.67 |
| 7 | क ठाकूर | 41 (15.18) | 60 | 68.34 |
| | एकूण | **270 (100)** | **420** | **64.28** |

१. *संदर्भ:- प्राथमिक सर्व्हेक्षण*

२. *स्तंभ क्रमांक ३ मधील कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील स्थलांतर केलेल्या कुटुंबांचे विविध सात जमातीतील स्थलांतर केलेल्या एकूण २७० कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

३. *स्तंभ क्रमांक ५ मधील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका विशिष्ट जमातीतील स्थलांतर केलेल्या कुटुंबांचे त्याच विशिष्ट जमातीतील सर्व्हेक्षण केलेल्या एकूण (प्रत्येक जमातीतील ६० कुटुंबे) कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सर्वेक्षण केलेल्या ४२० आदिवासी कुटुंबांपैकी २७० कुटुंबांना (६४.२८ टक्के) दरवर्षी स्थलांतर करावे लागते. स्थलांतर कराव्या लागणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण खूप मोठे असल्याचे दिसून येते. यावरून आदिवासींच्या दारिद्र्याचीसुद्धा कल्पना येते.

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सर्व्हेक्षित ४२० कुटुंबांपैकी ३५.७२ टक्के कुटुंबांनी किंवा त्यांच्या कुटुंबांतील कोणीही सदस्याने स्थलांतर केलेले नाही. यापैकी काही कुटुंबांची अर्थिक स्थिती दुर्बल असूनही त्यांनी स्थलांतर न करण्याची काही करण्याची काही कारणे आढळून आली. ती म्हणजे कुटुंबात लहान मुले असल्याने परगावी कामासाठी जाता न येणे, शारीरिक अपंगत्व, कष्टाची कामे न निभणे इत्यादी. या कारणामुळे काही आदिवासी कुटुंबांनी गरीबी असूनही कामासाठी परगावी स्थलांतर केले नाही.

विविध सात जमातींचा तुलनात्मकदृष्ट्या विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की, स्थलांतर केलेल्या कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण कातकरी या जमातीत असून ते २१.११ टक्के आहे. तर सर्वात कमी प्रमाण महादेव कोळी या जमातीत असून ते ९.६२ टक्के आहे.

एकेका जमातीचा स्वतंत्रपणे विचार करता असे दिसते की, कातकरी जमातीतील स्थलांतर केलेल्या कुटुंबांचे प्रमाण ९५.०० टक्के एवढे मोठे आहे. या जमातीतील केवळ ५.०० टक्के कुटुंबांनी स्थलांतर केलेले नाही. वारली जमातीतील ७६.६६ टक्के कुटुंबांनी स्थलांतर केले असून या जमातीतील २३.३४ टक्के कुटुंबांनी स्थलांतर केलेले नाही. महादेव कोळी जमातीतील ४३.३३ टक्के कुटुंबांनी स्थलांतर केल्याचे वरील तक्त्यावरून दिसून येते. या जमातीतील ५६.६७ टक्के कुटुंबांनी स्थलांतर केलेले नाही.

## कुटुंबांतील सर्व सदस्यासहित (संपूर्ण कुटुंबासहित) परगावी स्थलांतर केलेल्या कुटुंबांचे प्रमाण

तक्ता क्र. २ मध्ये सन २००३-२००४ या वर्षात किती आदिवासी कुटुंबांनी आपल्या कुटुंबातील सर्व सदस्यासहित (संपूर्ण कुटुंबासहित) स्थलांतर केले होते याची माहिती दिली आहे.

अभ्यासक्षेत्रातील ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील स्थलांतर केलेल्या २७० कुटुंबापैकी ४१ कुटुंबांनी (१५.१८ टक्के) कुटुंबांतील सर्व सदस्यासाहित स्थलांतर केले होते.

विविध सात जमातींचा तुलनात्मकदृष्ट्या विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की, कुटुंबांतील सर्व सदस्यासहित परगावी स्थलांतर केलेल्या कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण कातकरी या जमातीत असून ते ४६.३४ टक्के आहे. त्याखालोखाल हे प्रमाण म ठाकूर या जमातीत असून ते २४.४० टक्के आहे. कोकणा जमातीत हे प्रमाण शून्य आहे.

तक्ता क्रमांक - २

| अ.क्र. | जमातीचे नाव | सर्व सदस्यासहित स्थलांतर केलेल्या कुटुंबांची संख्या व प्रमाण | स्थलांतर केलेल्या कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | म.कोळी | 01 (2.43) | 26 | 3.85 |
| 2 | ढोर कोळी | 02 (2.87) | 35 | 5.71 |
| 3 | कातकरी | 19 (46.34) | 57 | 33.33 |
| 4 | वारली | 05 (12.20) | 46 | 10.86 |
| 5 | कोकणा | 0 | 31 | 0 |
| 6 | म ठाकूर | 10 (24.40) | 34 | 29.41 |
| 7 | क ठाकूर | 04 (9.76) | 41 | 9.75 |
| | **एकूण** | **41 (100)** | **270** | **15.18** |

*१. संदर्भ:- प्राथमिक सर्व्हेक्षण*

*२. स्तंभ क्रमांक ३ मधील कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका किंवा विशिष्ट जमातीतील सर्व सदस्यासहित स्थलांतर केलेल्या कुटुंबांचे विविध सात जमातीतील सर्व सदस्यासहित स्थलांतर केलेल्या ४१ कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

*३. स्तंभ क्रमांक ५ मधील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका विशिष्ट जमातीतील सर्व सदस्यासहित स्थलांतर केलेल्या कुटुंबांचे त्याच एका विशिष्ट जमातीतील स्थलांतर केलेल्या एकूण कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

विविध सात जमातींचा तुलनात्मकदृष्ट्या विचार करता आणि एकेका जमातीचा स्वतंत्रपणे विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की, सर्वच जमातीत कुटुंबांतील सर्व सदस्यासहित परगावी स्थलांतर केलेल्या कुटुंबांचे प्रमाण खूपच कमी आहे. हे प्रमाण का कमी आहे ते आदिवासींशी चर्चा करून जाणून घेतले. बहुसंख्य आदिवासींना आपल्या कुटुंबांतील स्त्रियांना, मुलींना परगावी कामास घेऊन जाणे सुरक्षित वाटत नाही. परगावी काही स्त्रिया नवऱ्यांना सोडून पळून जातात. तसेच काही स्त्रियांना पळवून नेले जाते. त्यामुळे आदिवासी तरूण आपल्या बायकांना गावीच ठेवून परगावी स्थलांतर करतात. तसेच परगावी राहण्याची चांगली सोय नसणे, काही कष्टाची कामे स्त्रियांना न निभणे, गावाकडील घर सांभाळणे, लहान मुले सांभाळणे, मुलांचे शिक्षण, जनावरे सांभाळणे इत्यादी कारणामुळे बहुसंख्य आदिवासी आपल्या कुटुंबांतील स्त्रियांना परगावी कामाच्या ठिकाणी घेऊन जाण्याचे टाळतात.

**स्थलांतराच्या ठिकाणी काम केलेल्या आदिवासी व्यक्तींचे प्रमाण**

सन २००३-२००४ या वर्षी ४१ कुटुंबांनी आपल्या कुटुंबातील सर्व सदस्यासहित स्थलांतर केले होते. तर २२९ कुटुंबांतील केवळ प्रौढ व्यक्तींनींच स्थलांतर केले होते. कुटुंबांतील सर्व सदस्यासहित जरी काही कुटुंबे स्थलांतर करत असले तरी लहान मुले व वृद्ध व्यक्ती तेथे काम करू शकत नाहीत. म्हणून उत्पन्नाच्या दृष्टीने स्थलांतराच्या ठिकाणी किती व्यक्ती काम करतात हे पाहणे महत्वाचे आहे. तक्ता क्र. ३ मध्ये स्थलांतर केलेल्या २७० कुटुंबांतील किती व्यक्तींनी स्थलांतराच्या ठिकाणी काम केले याची माहिती दिली आहे.

तक्ता क्रमांक - ३

| अ.क्र. | जमातीचे नाव | स्थलांतराच्या ठिकाणी काम केलेल्या पुरूषांची संख्या व प्रमाण | स्थलांतराच्या ठिकाणी काम केलेल्या स्त्रियांची संख्या व प्रमाण | एकूण व्यक्ती व शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | म.कोळी | 30 (90.90) (8.77) | 03 (9.10) (2.36) | 33 (100) (7.03) |
| 2 | ढोरकोळी | 37 (75.52) (10.82) | 12 (24.48) (9.45) | 49 (100) (10.45) |
| 3 | कातकरी | 81 (59.56) (23.68) | 55 (40.44) (43.30) | 136 (100) (29.00) |
| 4 | वारली | 60 (83.34) (17.55) | 12 (16.66) (9.45) | 72 (100) (15.35) |
| 5 | कोकणा | 45 (76.28) (13.15) | 14 (23.72) (11.02) | 59 (100) (12.51) |
| 6 | म ठाकूर | 46 (76.67) (13.46) | 14 (23.33) (11.02) | 60 (100) (12.80) |
| 7 | क ठाकूर | 43 (71.67) (12.57) | 17 (28.33) (13.40) | 60 (100) (12.80) |
|  | एकूण | 342 (72.93) (100) | 127 (27.07) (100) | 469 (100) (100) |

१. *संदर्भ:- प्राथमिक सर्व्हेक्षण:*

२. *स्तंभ क्रमांक ३ मधील वरच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका विशिष्ट जमातीतील स्थलांतराच्या ठिकाणी काम केलेल्या पुरूषांचे त्याच विशिष्ट जमातीतील स्थलांतर केलेल्या एकूण व्यक्तींशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

३. *स्तंभ क्रमांक ४ मधील वरच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका विशिष्ट जमातीतील स्थलांतराच्या ठिकाणी काम केलेल्या स्त्रियांचे त्याच विशिष्ट जमातीतील स्थलांतर केलेल्या एकूण व्यक्तींशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

४. *स्तंभ क्रमांक ३ मधील खालच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी स्थलांतराच्या ठिकाणी काम केलेल्या एका विशिष्ट जमातीतील पुरूषांचे स्थलांतराच्या ठिकाणी काम केलेल्या विविध सात जमातीतील एकूण ३४२ पुरूषांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

५. *स्तंभ क्रमांक ४ मधील खालच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी स्थलांतराच्या ठिकाणी काम केलेल्या एका विशिष्ट जमातीतील स्त्रियांचे स्थलातंराच्या ठिकाणी काम केलेल्या विविध सात जमातीतील एकूण १२७ स्त्रियांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

६. *स्तंभ क्रमांक ५ मधील खालच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी स्थलांतराच्या ठिकाणी काम केलेल्या एका विशिष्ट जमातीतील व्यक्तींचे सर्व सात जमातीतील स्थलांतराच्या ठिकाणी काम केलेल्या एकूण ४६९ पुरूष व स्त्री व्यक्तीशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

७. *स्तंभ क्रमांक ५ मधील वरच्या कंसातील आकडे टक्केवारी किंवा शेकडा प्रमाण आहे.*

मागील तक्त्यावरून असे दिसते की, स्थलांतर केलेल्या २७० कुटुंबांतील ४६९ व्यक्तींनी परगावी स्थलांतराच्या ठिकाणी काम केले असून त्यामध्ये पुरूषांचे प्रमाण मोठे आहे (७२.९३ टक्के). तर स्त्रियांचे प्रमाण अत्यंत कमी असून ते २७.०७ टक्के आहे.

विविध सात जमातींचा तुलनात्मकदृष्ट्या विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की, स्थलांतराच्या ठिकाणी काम केलेल्या सर्व जमातीतील एकूण ३४२ पुरुषांमध्ये सर्वात जास्त पुरूष व्यक्तींचे प्रमाण कातकरी जमातीत असून ते २३.६८ टक्के आहे. त्याखालोखाल हे प्रमाण वारली या जमातीत असून ते १७.५५ टक्के आहे. स्थलांतराच्या ठिकाणी काम केलेल्या एकूण पुरूषांमध्ये सर्वात कमी प्रमाण महादेव कोळी या जमातीत असून ते ८.७७ टक्के आहे.

स्थलांतराच्या ठिकाणी काम केलेल्या सर्व जमातीतील एकूण १२७ स्त्रियामध्ये सर्वात जास्त स्त्रियांचे प्रमाण कातकरी या जमातीत असून ते ४३.३० टक्के आहे. तर सर्वात कमी प्रमाण महादेव कोळी या जमातीत असून ते २.३६ टक्के एवढे आहे.

पुरूष आणि स्त्रिया यांचा एकत्रित विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की, स्थलांतराच्या ठिकाणी म्हणजे परगावी काम केलेल्या एकूण ४६९ व्यक्तीमध्ये सर्वात जास्त प्रमाण कातकरी जमातीत असून ते २९.०० टक्के आहे. त्याखालोखाल हे प्रमाण वारली या जमातीत असून ते १५.३५ टक्के आहे. तर सर्वात कमी प्रमाण महादेव कोळी या जमातीत असून ते ७.०३ टक्के आहे.

एकेका जमातीचा स्वतंत्रपणे विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की, महादेव कोळी जमातीतील ९०.९० टक्के पुरूषांनी परगावी काम केले आहे. तर या जमातीतील केवळ ९.१० टक्के स्त्रियांनी परगावी काम केले आहे. कातकरी जमातीतील एकूण १३६ व्यक्तीपैकी ५९.५६ टक्के पुरुषांनी परगावी काम केले आहे. तर ४०.४४ टक्के स्त्रियांनी परगावी काम केले आहे.

**प्रतिकुटुंब स्थलांतरित मजुरांची सरासरी संख्या**

तक्ता क्र. ४ मध्ये प्रतिकुटुंब स्थलांतरित मजुरांची सरासरी संख्या दर्शविली आहे.

तक्ता क्रमांक – ४

| अ.क्र. | जमातीचे नाव | स्थलांतर केलेल्या कुटुंबांची संख्या | स्थलांतरित कुटुंबातील मजुरांची संख्या | स्थलांतरित मजुरांची प्रतिकुटुंब सरासरी संख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | म.कोळी | 26 | 33 | 1.26 |
| 2 | ढोरकोळी | 35 | 49 | 1.40 |
| 3 | कातकरी | 57 | 136 | 2.38 |
| 4 | वारली | 46 | 72 | 1.56 |
| 5 | कोकणा | 31 | 59 | 1.90 |
| 6 | म ठाकूर | 34 | 60 | 1.76 |
| 7 | क ठाकूर | 41 | 60 | 1.46 |
| | एकूण | 270 | 469 | 1.73 |

संदर्भः प्राथमिक सर्व्हेक्षण

मागील तक्त्यावरून असे दिसते की, विविध सात आदिवासी जमातीत प्रतिकुटुंब स्थलांतरित मजुरांची संख्या १.७३ इतकी आहे. प्रतिकुटुंब स्थलांतरित मजुरांची सरासरी संख्या सर्वात जास्त कातकरी या जमातीत असून ती २.३८ एवढी आहे. तर सर्वात कमी महादेव कोळी या जमातीत असून ती १.२६ एवढी आहे.

## स्थलांतराच्या ठिकाणी आदिवासी मजुरांनी केलेल्या कामाचे दिवस

तक्ता क्र. ५ मध्ये स्थलांतराच्या ठिकाणी परगावी वर्षभरात आदिवासी मजुरांनी केलेल्या कामाचे एकूण दिवस, प्रतिकुटुंब सरासरी कामाचे दिवस आणि प्रतिमजूर सरासरी कामाचे दिवस यांची माहिती दिली आहे.

तक्ता क्रमांक – ५

| अ.क्र. | जमातीचे नाव | स्थलांतर केलेल्या कुटुंबांची संख्या | स्थलांतराच्या याठिकाणी काम केलेल्या मजुरांची संख्या | वर्षातील कामाचे एकूण दिवस | प्रतिकुटुंब सरासरी कामाचे दिवस | प्रतिमजूर सरासरी कामाचे दिवस |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | म.कोळी | 26 | 33 | 1870 | 71.92 | 56.66 |
| 2 | ढोरकोळी | 35 | 49 | 3470 | 99.14 | 70.81 |
| 3 | कातकरी | 57 | 136 | 6005 | 105.35 | 44.15 |
| 4 | वारली | 46 | 72 | 3600 | 78.26 | 50.00 |
| 5 | कोकणा | 31 | 59 | 1740 | 56.12 | 29.49 |
| 6 | म ठाकूर | 34 | 60 | 2535 | 74.55 | 42.25 |
| 7 | क ठाकूर | 41 | 60 | 2810 | 68.53 | 46.83 |
| | एकूण | 270 | 469 | 22030 | 81.59 | 46.97 |

१. संदर्भः प्राथमिक सर्व्हेक्षण

वरील तक्त्यावरून असे दिसते की, स्थलांतर केलेल्या २७० कुटुंबांतील ४६९ मजुरांनी परगावी सन २००३-२००४ या वर्षात २२०३० दिवस काम केले. या २७० कुटुंबांच्या संदर्भात प्रतिकुटुंब वार्षिक सरासरी कामाचे दिवस ८१.५९ इतके असून वार्षिक प्रतिमजूर सरासरी कामाचे दिवस ४६.९७ एवढे आहेत.

जमातीनुसार वर्षातील कामाचे एकूण दिवस, प्रतिकुटुंब सरासरी कामाचे दिवस आणि प्रतिमजूर सरासरी कामाचे दिवस इत्यादींची माहिती खालीलप्रमाणे दिली आहे.

## वर्षातील कामाचे एकूण दिवस

सन २००३-२००४ या वर्षात कातकरी या जमातीतील आदिवासींनी इतर जमातींच्या तुलनेत परगावी सर्वात जास्त दिवस काम केले आहे. या जमातीतील १३६ मजुरांचे एका वर्षातील कामाचे एकूण दिवस ६००५ इतके आहेत. कोकणा या आदिवासी जमातीतील मजुरांचे कामाचे दिवस सर्वात कमी असल्याने वरील तक्त्यावरून दिसते. या जमातीतील ५९ मजुरांचे वर्षातील कामाचे एकूण दिवस १७४० इतके आहेत. कातकरी आदिवासींची आपला भू-भाग सोडून परगावी जास्तीत जास्त काळ थांबण्याची क्षमता व वृत्ती असते. गरीबीमुळे व भूमिहीनतेमुळे परगावी जास्तीत जास्त दिवस कामास राहण्याची गरज त्यांना असते.

## प्रतिकुटुंब सरासरी कामाचे दिवस

प्रतिकुटुंब सरासरी कामाचे दिवस सर्वात जास्त

कातकरी आदिवासींचे आहेत (१०५.३५ दिवस). तर सर्वात कमी कोकणा या जमातीतील आदिवासींचे आहेत. (५६.१२ दिवस).

### प्रतिमजूर सरासरी कामाचे दिवस

प्रतिमजूर सरासरी कामाचे दिवस सर्वात जास्त ढोरकोळी या जमातीतील आदिवासींचे आहेत (७०.८१ दिवस). तर सर्वात कमी कोकणा या जमातीतील आदिवासींचे आहेत (२९.४९ दिवस).

### स्थलांतरित मजुरांना परगावी मिळालेले उत्पन्न

तक्ता क्र. ६ मध्ये स्थलांतरीत मजुरांना परगावी मिळालेल्या उत्पन्नाची माहिती जमातीनुसार दिली आहे.

तक्ता क्रमांक – ६

| अ.क्र. | जमातीचे नाव | स्थलांतराच्या ठिकाणी काम केलेल्या कुटुंबांची संख्या | स्थलांतराच्या ठिकाणी काम केलेल्या मजुरांची संख्या | परगावी मिळालेले एकूण उत्पन्न (रु.) | प्रतिकुटुंब सरासरी उत्पन्न (रु.) | प्रतिमजूर सरासरी उत्पन्न (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | म.कोळी | 26 | 33 | 143300 | 5512 | 4342 |
| 2 | ढोर कोळी | 35 | 49 | 283800 | 8109 | 5792 |
| 3 | कातकरी | 57 | 136 | 861600 | 15116 | 6335 |
| 4 | वारली | 46 | 72 | 330600 | 7187 | 4592 |
| 5 | कोकणा | 31 | 59 | 201700 | 6506 | 3419 |
| 6 | म ठाकूर | 34 | 60 | 263700 | 7756 | 4395 |
| 7 | क ठाकूर | 41 | 60 | 249000 | 6073 | 4150 |
| | एकूण | 270 | 469 | 2333700 | 8643 | 4976 |

१.संदर्भः प्राथमिक सर्व्हेक्षण

स्थलांतराच्या ठिकाणी काम केलेल्या २७० कुटुंबातील ४६९ मजुरांना सन २००३-२००४ या वर्षात परगावी मिळालेले एकूण उत्पन्न २३३३७०० रूपये एवढे आहे. स्थलांतरीत २७० कुटुंबांच्या संदर्भात वार्षिक प्रतिकुटुंब सरासरी उत्पन्न ८६४३ रूपये आहे. तर वार्षिक प्रतिमजूर सरासरी उत्पन्न ४९७६ रूपये एवढे अल्प आहे.

### परगावी मिळालेले वर्षाचे एकूण उत्पन्न

सन २००३-२००४ या वर्षात स्थलांतराच्या ठिकाणी सर्वात जास्त उत्पन्न कातकरी या जमातीतील मजुरांना प्राप्त झाले आहे. या जमातीतील ५७ कुटुंबातील १३६ मजुरांना ८६१६०० रूपये एवढे उत्पन्न प्राप्त झाले आहे. स्थलांतराच्या ठिकाणी काम केलेल्या सात जमातींना वर्षभरात मिळालेल्या एकूण उत्पन्नात कातकरी जमातीचा ३६.९१ टक्के एवढा मोठा हिस्सा आहे.

स्थलांतराच्या ठिकाणी सर्वात कमी उत्पन्न महादेव कोळी या जमातीतील मजुरांना मिळाल्याचे वरील तक्त्यावरून दिसून येते. या जमातीतील २६ कुटुंबातील ३३ मजुरांना १४३३०० रूपये एवढे उत्पन्न मिळाले आहे. स्थलांतरापासून सर्व जमातींना मिळालेल्या एकूण उत्पन्नात महादेव कोळी जमातीचा शेकडा हिस्सा ६.१४ एवढा आहे.

**प्रतिकुटुंब सरासरी उत्पन्न**

सन २००३-२००४ या वर्षात प्रतिकुटुंब सरासरी उत्पन्न सर्वात जास्त कातकरी या जमातीचे आहे (१५११६ रूपये). तर सर्वात कमी उत्पन्न महादेव कोळी या जमातीचे असून ते ५५१२ रूपये एवढे आहे.

**प्रतिमजूर सरासरी उत्पन्न**

सन २००३-२००४ या वर्षात प्रतिमजूर सरासरी उत्पन्न सर्वात जास्त कातकरी या जमातीचे असून ते ६३३५ रूपये एवढे आहे. तर सर्वात कमी वार्षिक प्रतिमजूर सरासरी उत्पन्न कोकणा या जमातीचे असून ते ३४१९ रूपये एवढे आहे.

**आदिवासींच्या स्थलांतराची वैशिष्ट्ये**

अभ्यासक्षेत्रातील ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील आदिवासींच्या स्थलांतराची आढळून आलेली काही वैशिष्ट्ये थोडक्यात खालीलप्रमाणे दिली आहेत.

आदिवासी स्वतःहून कामासाठी परगावी जातात. ते कोणाच्या दबावाने स्थलांतर करत नाहीत. बहुसंख्य आदिवासी दरवर्षी (अनेक वर्षापासून) स्थलांतर करतात. उन्हाळा, पावसाळा, हिवाळा अशा सर्व ऋतूत आदिवासी स्थलांतर करतात. अतिपावसाच्या दिवसात स्थलांतराचे प्रमाण कमी असते. सर्व आदिवासींचा परगावी राहण्याचा कालावधी सारखा नसतो. काही आदिवासी १० ते १२ दिवस तर काही आदिवासी १ ते २ महिने परगावी राहतात व गावी येतात. गावी काही दिवस मुक्काम करून परत परगावी कामासाठी जातात. अशा प्रकारे त्यांच्या गावाकडे वर्षातून आठ ते दहा चकरा होतात. कातकरी जमातीतील आदिवासी ज्यास्त काळ परगावी मुक्काम करतात. त्यांच्या स्थलांतराचा काळ २ महिने ते ८ महिने असतो. या जमातीतील लोक वर्षातून तीन ते चार वेळा गावाकडे येतात. आदिवासींना त्यांच्या भागात जेवढी मजुरी मिळते त्यापेक्षा दीडपट ते दुप्पट मजुरी स्थलांतर केलेल्या ठिकाणी मिळते. परगावी आदिवासींना विविध मार्गांनी कामे मिळतात. काही आदिवासी स्वतःहून काम शोधण्यासाठी परगावी जातात. तर परगावचे ठेकेदार, मोठे शेतकरी आदिवासी भागात येऊन आदिवासींना कामासाठी घेऊन जातात. परगावी आदिवासींना उन्हाळी व पावसाळी भाताची लागवड, कापणी, मळणी, दगड फोडणे, फाटे फोडणे, गवत कापणे, वीटभट्टीवर काम करणे, खाडीतून वाळू उपसणे अशा प्रकारची शेतीची व बिगरशेतीची कामे करावी लागतात. आदिवासींच्या स्थलांतराचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे आदिवासी जरी दरवर्षी स्थलांतर करत असले तरी दरवर्षी ते एकाच मालकाकडे किंवा एकाच गावी जात नाहीत. हजारात एखादा मालक चांगला असतो. त्यांच्याकडे आदिवासी पुन्हा म्हणजे पुढच्या वर्षी कामाला जातात. बहुसंख्य आदिवासींना मालकाचे नाव माहित नसते. मालकांना ते शेठ असे म्हणतात.

**आदिवासींच्या स्थलांतराची कारणे**

अभ्यासक्षेत्रातील आदिवासींच्या स्थलांतरास कारणीभूत असणाऱ्या काही घटकांचे थोडक्यात स्पष्टीकरण खालीलप्रमाणे दिले आहे.

मोखाडा तालुक्यातील शेती संपूर्णपणे कोरडवाहू असल्याने शेतीत जेमतेम एक ते दोन महिनेच रोजगार मिळतो. त्यामुळे आदिवासींना परगावी स्थलांतर करावे लागते. भूमिहीन आदिवासींमध्ये स्थलांतराचे प्रमाण खूप मोठे आहे. कारण स्वतःची शेती नसल्यामुळे आपल्या भागातील शेतीची कामे आटोपली की

उदरनिर्वाहासाठी त्यांना स्थलांतर करावे लागते. दारिद्र्य व बेरोजगारी निर्मूलनासाठी सरकार आदिवासी भागात विविध रोजगार योजना राबवत असले तरी या योजनेत काही दोष आहेत. उदाहरणार्थ कामे लवकर संपणे, एक काम संपले की दुसरे काम सुरू होण्यास आठ ते दहा दिवसापेक्षा जास्त विलंब लागणे इ. यामुळे आदिवासी परगावी कामास जाणे पसंत करतात.

बहुसंख्य आदिवासी कुटुंबांचा आकार मोठा असल्याने स्थानिक भागात उपलब्ध असलेल्या उदरनिर्वाहाच्या साधनावर सर्वांची उपजीविका होत नाही. त्यामुळे परगावी कामासाठी जावे लागते. आदिवासी शेतकऱ्यामध्ये लहान आणि सीमांत शेतकऱ्यांचे प्रमाण खूप मोठे असून शेतीतील उत्पादन त्यांना दोन ते चार महिने सुद्धा पुरत नाही. त्यामुळे त्यांना स्थलांतर करावे लागते. आदिवासींना त्यांच्या स्थानिक भागात जेवढी मजुरी मिळते त्यापेक्षा अधिक मजुरी परगावी मिळते. त्यामुळे सुद्धा आदिवासी स्थलांतर करतात. अन्न टंचाईच्या काळात गरीब आदिवासींना सधन आदिवासींकडून धान्य व पैसे कर्जाऊ मिळतात. परंतु त्याची परतफेड सव्वापट ते दीडपट करावी लागते. अशा प्रकारे चढ्या व्याजाने कर्ज घेण्यापेक्षा काही दिवस परगावी कामाला जाऊन राहण्याचा पर्याय काही आदिवासी निवडतात.

**स्थलांतराचे परिणाम**

स्थलांतरामुळे आदिवासींना काही फायदे होतात. तसेच स्थलांतरामुळे काही समस्याही निर्माण होतात असे अभ्यासात आढळून आले. त्याचे थोडक्यात स्पष्टीकरण खालीलप्रमाणे दिले आहे.

**स्थलांतराचे अनुकूल परिणाम**

आदिवासी परगावी जेवढे दिवस स्थलांतर करतात तेवढे दिवस उपासमारीचा काळ कमी होतो. आदिवासींना त्यांच्या स्थानिक भागात जेवढी मजुरी मिळते त्यापेक्षा अधिक मजुरी त्यांना परगावी मिळते. परगावी कामासाठी स्थलांतर केल्याने काही दिवस पोटापाण्याची सोय होते. त्यामुळे उपभोगाचे कर्ज फारसे घ्यावे लागत नाही. अन्नाबरोबरच काही आदिवासींची कपड्यांचीही गरज भागते. परगावी जे जादा उत्पन्न मिळते त्यातून थोडे फार कपडे विकत घेता येतात, असे आदिवासींनी मुलाखतीत सांगितले.

**स्थलांतराचे दुष्परिणाम/समस्या/वाईट अनुभव**

परगावी पोटापाण्यासाठी स्थलांतर करणाऱ्या आदिवासींना अनेक वाईट अनुभव येतात. विविध समस्यांना त्यांना तोंड द्यावे लागते. जे आदिवासी कोणाच्याही मदतीशिवाय परगावी कामासाठी स्थलांतर करतात त्यांना ताबडतोब काम मिळत नाही. त्यामुळे काम मिळेपर्यंत परगावी त्यांची उपासमार होते. बिगरशेतीची कामे करणाऱ्या बहुसंख्य आदिवासींना रस्त्याच्या कडेला, जंगलात, मोरीत, स्मशानभूमीत, झाडाखाली रहावे लागते. अवेळी किंवा वळवाचा पाऊस पडला की आदिवासींचे खूप हाल होतात. शेतीची कामे करणाऱ्या आदिवासी मजुरांना त्यांच्या शेतमालकाकडून दिवसातून तीन वेळा शिजवलेले अन्न दिले जाते. परंतु हे जेवण अपुरे व निकृष्ट दर्जाचे असते.

परगावी पिण्याचे स्वच्छ पाणी मिळत नाही. त्यामुळे हगवण, थंडी-ताप इ. आजार उद्भवतात. बिगरशेतीची कामे करणाऱ्या आदिवासींना चार ते आठ दिवसातून एकदाच आंघोळीसाठी पाणी मिळते. तेही अपुरे असते. त्यामुळे आरोग्यविषयक समस्या निर्माण होतात. परगावी बहुसंख्य आदिवासींची त्यांच्या मालकाकडून फसवणूक होते. ठरलेल्या मजुरीपेक्षा कमी मजुरी आदिवासींना दिली जाते. बहुसंख्य मालक

अपशब्द वापरून किंवा शिवीगाळ करून आदिवासींची सतत मानहानी करतात. परगावी काही आदिवासींच्या वाट्याला गुलामीचे जिणे येते. काम निभत नसेल किंवा सण, लग्न इ. साठी गावी जायचे असेल तर काही मालक परवानगी देत नाहीत. तसेच झालेल्या कामाचे पैसेही देत नाहीत.

जे आदिवासी बिगरशेतीची कामे करतात त्यांची कामे शेतमजुरांच्या तुलनेत कष्टाची व मेहनतीची असतात. खाणीत दगड फोडणे, समुद्राच्या खाडीत बुडी मारून रेती काढणे इत्यादी कामे कष्टाची व मेहनतीची असतात. परगावी स्थलांतर करणाऱ्या आदिवासींना त्यांच्या मालकाकडून कोणत्याही आरोग्यविषयक सुविधा पुरविल्या जात नाहीत. किरकोळ आजाराचा खर्चसुद्धा मालक करत नाही. स्थलांतर करणाऱ्या कुटुंबप्रमुखांचे मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष होते. तसेच मुले १६ ते १७ वर्षांची झाली की त्यांचे शिक्षण बंद करून त्यांना परगावी कामासाठी नेले जाते. त्यामुळे गळतीचा प्रश्न निर्माण होतो. जे आदिवासी दरवर्षी आपल्या संपूर्ण कुटुंबासहित स्थलांतर करतात त्यांच्या मुला-बाळांना शाळेचे तोंडही पहायला मिळत नाही. परगावी हातभट्टीची किंवा गावठी दारू सहज उपलब्ध होत असल्याने व्यसनाधिन आदिवासी अधिकच व्यसनाधिन बनतात. तसेच जे आदिवासी आपल्या संपूर्ण कुटुंबासहित परगावी स्थलांतर करतात त्यांना गावाकडे शासन राबवत असलेल्या काही सोयी सुविधांपासून वंचित रहावे लागते.

**आदिवासींच्या स्थलांतरासंदर्भात शिफारशी**

स्थलांतरामुळे आदिवासींना काही फायदे मिळत असले तरी परगावी अनेक समस्यांना त्यांना तोंड द्यावे लागते. म्हणून आदिवासींचे स्थलांतर रोखले पाहिजे. त्यांना त्यांच्या भागातच अधिक चांगले जीवन जगता आले पाहिजे. आदिवासींचे स्थलांतर रोखण्यासाठी आणि स्थलांतराच्या ठिकाणी आदिवासींना भोगाव्या लागणाऱ्या हाल अपेष्टा कमी व्हाव्यात यासाठी काही शिफारशी खालीलप्रमाणे सुचविल्या आहेत.

**१. दारिद्र्याचे उच्चाटन:**

दारिद्र्यामुळेच आदिवासींना आपले घर-दार सोडून परगावी कामाच्या शोधात फिरावे लागते. म्हणून स्थलांतर रोखण्यासाठी सरकारने दारिद्र्याचे उच्चाटन केले पाहिजे.

**२. स्थानिक भागात रोजगार संधी उपलब्ध करून देणे**

सरकारने आदिवासींना त्यांच्या परिसरात पुरेसा रोजगार उपलब्ध करून दिल्यास त्यांच्यावर स्थलांतराची पाळी येणार नाही.

**३. निवारा केंद्रांची स्थापना**

परगावी आदिवासींना गलिच्छ आणि वाईट वातावरणात रहावे लागते. त्यांना अशा प्रकारचे जीवन जगावे लागू नये यासाठी शासनाने ठिकठिकाणी धर्मशाळा किंवा निवारा केंद्रे उभी करावीत. तसेच आदिवासींना कामास ठेवणाऱ्या ठेकेदार, मोठे शेतकरी यांच्यावरही आदिवासीसाठी चांगली निवारा केंद्रे किंवा निवासाची व्यवस्था करण्याची सक्ती करण्यात यावी.

**४. अंगणवाड्यांची स्थापना**

जेथे आदिवासी स्थलांतर करतात तेथे सरकारने तात्पुरत्या अंगणवाड्यांची स्थापना करावी. अशा अंगणवाड्या सेवाभावी कार्यकर्ते, संस्था यांनाही उभ्या करण्यास प्रोत्साहन देण्यात यावे. त्यांना सरकारने परवानगी व मदत द्यावी. स्थलांतराच्या ठिकाणी

**(पृष्ठ क्र. ६८ वर पहा)**

# आदिवासी समाजातील साक्षरता

**प्रास्ताविक**

व्यक्ती ज्या प्रदेशात राहते त्या प्रादेशिक भाषेत तिला लिहिता-वाचता येत असेल तर त्या व्यक्तीस साक्षर व्यक्ती असे म्हणतात. स्वातंत्र्य मिळून ६३ वर्षांचा कालावधी लोटला तरी आपल्या देशासमोरील निरक्षरतेची समस्या अद्याप संपलेली नाही. प्रत्येक जनगणनेत भारतातील साक्षर लोकसंख्येचे प्रमाण वाढत असले तरी हे प्रमाण समाधानकारक नाही. सन २००४-२००५ च्या आकडेवारीनुसार भारतातील साक्षर जनतेचे प्रमाण ६१.०० टक्के इतके असून ३९.०० टक्के लोक निरक्षर आहेत. भारतातील केरळ, मिझोराम इत्यादी राज्यात साक्षरतेचे प्रमाण १०० टक्के असून या राज्यांना साक्षर राज्ये असा दर्जा मिळाला आहे. राजस्थान, बिहार इत्यादी राज्यात मात्र साक्षरता खूपच कमी असून तेथे निरक्षरतेचा प्रश्न अत्यंत गंभीर स्वरूपाचा आहे. या लेखात साक्षरतेचे महत्त्व, आदिवासी समाजातील साक्षरतेचे प्रमाण यांची माहिती दिली आहे. तसेच साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी काही उपायही सुचविले आहेत.

**साक्षरतेचे महत्त्व**

साक्षरतेचे प्रमुख फायदे खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत.

**१) दारिद्र्याच्या प्रमाणात घट**

साक्षरतेमुळे देशातील दारिद्र्य किंवा गरीबीचे प्रमाण कमी होते. साक्षरांना मजुरीच्या तसेच इतर रूपाने अधिक उत्पन्न मिळते. भारतात केरळ सारख्या काही राज्यातील नागरिकांचे दरडोई उत्पन्न जास्त आहे. त्याची जी काही प्रमुख कारणे आहेत त्यामध्ये संपूर्ण साक्षरता हे एक प्रमुख कारण आहे. साक्षरतेमुळे उत्पन्नात वाढ होऊन गरीबी हटण्यास काही प्रमाणात का होईना मदत होते. म्हणूनच देशातील निरक्षरतेचे उच्चाटन होणे आवश्यक आहे.

**२) लोकसंख्या वाढीस आळा**

साक्षरतेचे प्रमाण जर जास्त असेल तर देशातील एकूण लोकसंख्येचे प्रमाणही कमी राहते. कारण साक्षरतेमुळे लोकांना मोठ्या आकाराच्या कुटुंबाचे दुष्परिणाम समजून येतात. साक्षर लोक आपल्या कुटुंबाचा आकार लहान असावा यासाठी प्रयत्न करतात. शासनाच्या कुटुंब नियोजनाच्या व कुटुंब कल्याणाच्या योजनांना संपूर्ण सहकार्य देतात. साक्षरतेमुळे किंवा शिक्षणाच्या सुविधामुळे लोकसंख्या वाढीच्या वेगावर नियंत्रण ठेवता येते हे सिद्ध झाले आहे. उदाहरणार्थ, केरळमध्ये साक्षरतेचे प्रमाण १०० टक्के इतके आहे. त्यामुळे त्या राज्याची लोकसंख्याही पर्याप्त आहे. साक्षरतेचा प्रसार आणि प्रचार सर्वत्र झाला असल्यामुळे केरळमधील लोकसंख्या वाढीचा वेगही खूपच कमी राहिला आहे. १९९१ च्या जनगणनेनुसार भारताचा प्रतिवर्षी लोकसंख्या वाढीचा वेग २.२५ टक्के इतका आहे. केरळ राज्याचा विचार करता केरळमध्ये हा वेग फक्त १.३९ टक्के इतका आहे. नागालॅण्ड या राज्याचा विचार करता असे दिसते की, आज त्या राज्यात ६० टक्क्यापेक्षा जास्त लोक निरक्षर आहेत. त्यामुळे १९८१ ते १९९१ या दशकात तेथील लोकसंख्येत ५६ टक्के एवढी मोठी वाढ झाली आहे.

### ३) स्त्री भृणहत्येच्या प्रमाणात घट

आपल्या देशाच्या एकूण लोकसंख्येत पुरूषापेक्षा स्त्रियांचे प्रमाण कमी आहे. त्यास जे विविध घटक जबाबदार आहेत त्यामध्ये निरक्षरता हा एक महत्त्वाचा घटक आहे. साक्षरतेमुळे स्त्री-भृणहत्या किंवा गर्भपात यांचे प्रमाण कमी होऊन एकूण लोकसंख्येतील स्त्रियांचे प्रमाण वाढू शकेल. अशिक्षित सुईणीकडून बाळंतपण केल्यामुळे बाळंतपणात स्त्रियांचा मृत्यू उद्भवू शकतो. हे साक्षरतेमुळे थांबू शकेल. साक्षरतेमुळेच बालविवाहाच्या घटना सुद्धा टाळता येणे शक्य आहे.

### ४) महासत्ता बनणे शक्य

इंग्लंड, अमेरिका या देशांचा संपूर्ण विकास घडून आला आहे याचे प्रमुख कारण म्हणजे या देशांनी निरक्षरतेचे संपूर्ण उच्चाटन करून साक्षरतेचे १०० टक्के उद्दिष्ट गाठले होते. आज ह्या देशात साक्षरतेचे प्रमाण १०० टक्के असून ही राष्ट्रे प्रगतीच्या शिखरावर पोहचली आहेत. म्हणून भारताला विकसित राष्ट्रांच्या बरोबरीने महासत्ता बनून उदयास यायचे असेल तर संपूर्ण साक्षरतेशिवाय पर्याय नाही.

### ५) रोगराईच्या प्रमाणात घट

साक्षरतेमुळे रोगराईचे प्रमाण कमी होते. स्वच्छतेचे महत्त्व लोकांना समजते. घराची व गावाची स्वच्छता ठेवण्यास लोक प्रवृत्त होतात. आपणहून स्वच्छता मोहीमा हाती घेतात. आजारी पडल्यानंतर भगत, बाबा, देवऋषी यांच्याकडे न जाता दवाखान्यात किंवा डॉक्टरकडेच गेले पाहिजे हे लोकांना पटते. त्यामुळे बालमृत्यू, मोठ्या माणसांचे मृत्यू, कुपोषण आणि आजाराने अंथरूणाला खिळून राहण्याचे प्रमाण कमी होते. एडस् सारख्या भयानक रोगाचे दुष्परिणाम साक्षरतेशिवाय कळूच शकत नाहीत. त्यासाठीच साक्षरतेचे प्रमाण वाढवणे आवश्यक बनले आहे.

### ६) इतर फायदे

साक्षरतेमुळे केवळ कुटुंबाचा नव्हे तर संपूर्ण गावाचाही विकास घडून येतो. साक्षरतेमुळे ग्रामस्वच्छता अभियानासारख्या शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजना यशस्वी होऊन गावाचा कायापालट घडून येतो हे सिद्ध झाले आहे. साक्षरतेमुळे व्यक्तीची फसवणूक, नाडवणूक आणि शोषण थांबते. कोणाकडून आपली फसवणूक होते हे साक्षरतेमुळेच व्यक्तींना समजते. साक्षरता हा व्यसनाधिनतेवरचा उत्तम उतारा आहे. साक्षरतेमुळे व्यसनांचे दुष्परिणाम ताबडतोब समजू शकतात. साक्षरतेमुळे प्रदुषणाचे दुष्परिणाम समजतात. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होते. साक्षरतेमुळे शिक्षणाचे महत्त्व पटून कुटुंबातील मुला-मुलींना शिक्षण मिळते. शाळेतील गळतीचे प्रमाण कमी होते. मुलांना शाळेत घातल्यामुळे बालमजूरीच्या प्रथेचे उच्चाटन होण्यास मदत होते. तसेच बालकांचे शोषणही त्यामुळे थांबण्यास मदत होते. अंधश्रद्धा किंवा वेडगळ समजुती साक्षरतेमुळे नष्ट होतात. देवदासी, सती जाणे यासारख्या अनिष्ट प्रथांचे प्रमाण कमी होते. देशाला व माणूसकीला काळीमा फासणाऱ्या स्त्रियांच्या खरेदी-विक्रीसारख्या भयंकर घटना टाळता येतात. साक्षरतेमुळे योग्य राजकीय पक्षाला निवडणुकीत निवडता येऊन लोकशाही अधिक भक्कम बनते. साक्षरतेमुळे देशाचा आर्थिक व सामाजिक मागासलेपणा दूर होऊन देश वैभवाच्या, प्रगतीच्या शिखरावर जाण्यास मदत होते. म्हणून संपूर्ण साक्षरतेशिवाय व्यक्तीला व देशाला भवितव्य नाही.

## आदिवासी समाजातील साक्षरतेचे प्रमाण

भारतात सुमारे ४०० इतक्या तर महाराष्ट्रात ४७ आदिवासी जमाती आहेत. २००१ च्या जनगणनेनुसार भारतातील आदिवासींची लोकसंख्या ८.४३ कोटी इतकी असून देशाच्या एकूण लोकसंख्येत आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण ८.२० टक्के इतके आहे. महाराष्ट्रातील आदिवासींची लोकसंख्या ८५.७७ इतकी असून महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येत आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण ८.८५ टक्के इतके आहे. भारतातील व महाराष्ट्र राज्यातील आदिवासी समाजातील साक्षरतेची माहिती थोडक्यात खालीलप्रमाणे दिली आहे.

## भारतातील आदिवासी समाजातील लिंगभेदानुसार साक्षरतेचे प्रमाण

सन २००१ च्या जनगणनेनुसार भारतातील आदिवासी समाजातील साक्षरतेचे प्रमाण ४७.१० टक्के इतके आहे. खालील तक्त्यात भारतातील विविध राज्यातील आणि केंद्रशासित प्रदेशातील आदिवासी साक्षरतेचे प्रमाण दर्शविले आहे.

तक्ता क्रमांक - १

| अ.क्र. | राज्य/केंद्रशासित प्रदेश | आदिवासी साक्षरतेचे प्रमाण (टक्के) | | |
|---|---|---|---|---|
| | | पुरूष | स्त्रिया | एकत्रित |
| 1 | आंध्रप्रदेश | 47.66 | 26.11 | 37.04 |
| 2 | अरूणाचल प्रदेश | 58.77 | 40.56 | 49.62 |
| 3 | आसाम | 72.34 | 52.44 | 62.52 |
| 4 | बिहार | 39.76 | 15.54 | 28.17 |
| 5 | छत्तीसगढ | 65.04 | 39.35 | 52.09 |
| 6 | गोवा | 63.49 | 47.32 | 55.88 |
| 7 | गुजराथ | 59.18 | 36.02 | 47.74 |
| 8 | हरियाना | NST | NST | NST |
| 9 | हिमाचल प्रदेश | 77.71 | 53.32 | 65.50 |
| 10 | जम्मू आणि काश्मिर | 48.16 | 25.51 | 37.16 |
| 11 | झारखंड | 53.98 | 27.21 | 40.67 |
| 12 | कर्नाटक | 59.66 | 36.57 | 48.27 |
| 13 | केरळ | 70.78 | 58.11 | 64.35 |
| 14 | मध्य प्रदेश | 53.55 | 28.44 | 41.16 |
| 15 | महाराष्ट्र | 67.02 | 43.08 | 55.31 |
| 16 | मणिपूर | 73.16 | 78.42 | 65.85 |
| 17 | मेघालय | 63.49 | 59.20 | 61.34 |
| 18 | मिझोराम | 91.71 | 86.95 | 89.34 |
| 19 | नागालॅण्ड | 70.26 | 61.35 | 65.95 |
| 20 | ओरिसा | 51.48 | 23.27 | 37.37 |

| अ.क्र. | राज्य/केंद्रशासित प्रदेश | आदिवासी साक्षरतेचे प्रमाण (टक्के) | | |
|---|---|---|---|---|
| | | पुरूष | स्त्रिया | एकत्रित |
| 21 | पंजाब | NST | NST | NST |
| 22 | राजस्थान | 62.10 | 26.16 | 44.56 |
| 23 | सिक्किम | 73.81 | 60.16 | 67.14 |
| 24 | तामिळनाडू | 50.15 | 32.78 | 41.53 |
| 25 | त्रिपुरा | 67.97 | 44.60 | 56.48 |
| 26 | उत्तर प्रदेश | 48.45 | 20.70 | 35.13 |
| 27 | उत्तराखंड | 76.39 | 39.37 | 63.23 |
| 28 | पश्चिम बंगाल | 57.38 | 29.15 | 43.40 |
| 29 | अंदमान व निकोबार | 73.61 | 59.58 | 66.79 |
| 30 | चंदिगढ | NST | NST | NST |
| 31 | दादरा व नगर हवेली | 55.97 | 26.99 | 41.24 |
| 32 | दमन आणि दिव | 74.23 | 51.93 | 63.42 |
| 33 | दिल्ली | NST | NST | NST |
| 34 | लक्षद्वीप | 92.16 | 80.18 | 86.14 |
| 35 | पांडेचरी | NST | NST | NST |
| 36 | भारत | 59.17 | 34.76 | 47.10 |

संदर्भः- ट्रायबल रिसर्च बुलेटिन, खंड- ३४, अंक- ख, मार्च २०१०

वरील तक्त्यावरून असे दिसते की, भारतातील सर्वच राज्यातील आणि केंद्रशासित प्रदेशातील आदिवासी समाजातील पुरूष साक्षरतेपेक्षा आदिवासी समाजातील स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण खूपच कमी आहे.

आसाम, हिमाचल प्रदेश, केरळ, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालॅण्ड, सिक्किम, उत्तराखंड, अंदमान व निकोबार, दमन आणि दिव, लक्षद्वीप या राज्यातील व केंद्रशासित प्रदेशातील आदिवासी लोकांच्या साक्षरतेचे प्रमाण ६०.०० टक्केपेक्षा जास्त आहे. तर अन्य राज्यातील आदिवासी साक्षरतेचे प्रमाण कमी आहे. देशात आदिवासी साक्षरतेचे सर्वात कमी प्रमाण बिहार राज्यात असून ते २८.१७ टक्के इतके आहे. बिहार खालोखाल उत्तरप्रदेश (३५.१३ टक्के), आंध्र प्रदेश (३७.०४ टक्के), जम्मू आणि काश्मिर (३७.१६ टक्के), ओरिसा (३७.३७ टक्के) या राज्यातही आदिवासी साक्षरतेचे प्रमाण कमी आहे.

**भारतातील विविध राज्यातील ग्रामीण आणि शहरी आदिवासी साक्षरता प्रमाण**

तक्ता क्र. २ मध्ये भारतातील विविध राज्यातील आणि केंद्रशासित प्रदेशातील ग्रामीण व शहरी आदिवासी साक्षरतेचे प्रमाण दर्शविले आहे.

उत्तर प्रदेश वगळता भारततील सर्वच राज्यातील आणि केंद्रशासित प्रदेशातील ग्रामीण भागातील आदिवासी लोकांच्या साक्षरतेपेक्षा शहरी भागातील आदिवासींच्या साक्षरतेचे प्रमाण जास्त आहे.

तक्ता क्रमांक – २

| अ.क्र. | राज्य/केंद्रशासित प्रदेश | आदिवासी साक्षरतेचे प्रमाण (टक्के) | | |
|---|---|---|---|---|
| | | पुरूष | स्त्रिया | एकत्रित |
| 1 | आंध्रप्रदेश | 35.43 | 56.39 | 37.04 |
| 2 | अरूणाचल प्रदेश | 45.04 | 77.39 | 49.62 |
| 3 | आसाम | 61.29 | 86.75 | 62.52 |
| 4 | बिहार | 25.91 | 65.67 | 28.17 |
| 5 | छत्तीसगढ | 50.95 | 71.71 | 52.09 |
| 6 | गोवा | 44.59 | 61.44 | 55.88 |
| 7 | गुजराथ | 46.45 | 61.76 | 47.74 |
| 8 | हरियाना | NST | NST | NST |
| 9 | हिमाचल प्रदेश | 64.78 | 87.19 | 65.50 |
| 10 | जम्मू आणि काश्मिर | 35.74 | 70.37 | 37.16 |
| 11 | झारखंड | 38.08 | 67.80 | 40.67 |
| 12 | कर्नाटक | 45.26 | 64.57 | 48.27 |
| 13 | केरळ | 63.65 | 81.21 | 64.35 |
| 14 | मध्य प्रदेश | 40.01 | 57.23 | 41.16 |
| 15 | महाराष्ट्र | 52.31 | 74.18 | 55.31 |
| 16 | मणिपूर | 65.09 | 80.94 | 65.85 |
| 17 | मेघालय | 56.36 | 86.67 | 61.34 |
| 18 | मिझोराम | 82.00 | 96.77 | 89.34 |
| 19 | नागालॅण्ड | 62.55 | 88.70 | 65.95 |
| 20 | ओरिसा | 36.13 | 58.12 | 37.37 |
| 21 | पंजाब | NST | NST | NST |
| 22 | राजस्थान | 43.70 | 60.79 | 44.56 |
| 23 | सिक्किम | 65.37 | 84.89 | 67.14 |
| 24 | तामिळनाडू | 38.41 | 58.60 | 41.53 |
| 25 | त्रिपुरा | 55.46 | 91.97 | 56.48 |
| 26 | उत्तर प्रदेश | 82.99 | 51.10 | 35.13 |
| 27 | उत्तराखंड | 61.65 | 85.19 | 63.23 |
| 28 | पश्चिम बंगाल | 42.35 | 58.67 | 43.40 |
| 29 | अंदमान व निकोबार | 65.82 | 93.71 | 66.79 |
| 30 | चंदिगढ | NST | NST | NST |
| 31 | दादरा व नगर हवेली | 38.94 | 69.18 | 41.24 |
| 32 | दमन आणि दिव | 62.83 | 65.72 | 63.42 |
| 33 | दिल्ली | NST | NST | NST |
| 34 | लक्षद्वीप | 84.71 | 87.90 | 86.14 |
| 35 | पांडेचरी | NST | NST | NST |
| 36 | भारत | 45.02 | 69.09 | 47.10 |

*संदर्भ:– ट्रायबल रिसर्च बुलेटिन, खंड– ३४, अंक–१, मार्च २०१०*

भारतात ग्रामीण भागातील आदिवासी साक्षरतेचे सर्वात जास्त प्रमाण लक्षद्वीप या केंद्रशासित प्रदेशात असून ते ८६.१४ टक्के इतके आहे. त्या खालोखाल हे प्रमाण उत्तर प्रदेश या राज्यात असून ते ८२.९९ टक्के इतके आहे. भारतात ग्रामीण भागातील आदिवासी साक्षरतेचे सर्वात कमी प्रमाण बिहार या राज्यात असून ते २५.११ टक्के इतके आहे.

भारतात शहरी भागातील आदिवासी साक्षरतेचे सर्वात जास्त प्रमाण त्रिपुरा या राज्यात असून ते ९१.९७ टक्के इतके आहे. तर शहरी भागातील साक्षरतेचे सर्वात कमी प्रमाण उत्तर प्रदेश या राज्यात असून ते ५१.१० टक्के इतके आहे.

**महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील सर्वसाधारण आणि आदिवासी लोकसंख्येतील साक्षरतेचे प्रमाण**

तक्ता क्र. ३ मध्ये सन २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील सर्वसाधारण आणि आदिवासी लोकसंख्येतील साक्षरतेचे प्रमाण दर्शविले आहे.

तक्ता क्रमांक – ३

| अ.क्र. | जिल्हा | सर्वसाधारण लोकसंख्येतील साक्षरतेचे प्रमाण (टक्के) | आदिवासी लोकसंख्येतील साक्षरतेचे प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| 1 | मुंबई उपनगर | 86.9 | 76.8 |
| 2 | मुंबई | 86.4 | 80.8 |
| 3 | रायगड | 77.0 | 45.0 |
| 4 | ठाणे | 80.7 | 46.9 |
| 5 | रत्नागिरी | 75.0 | 51.3 |
| 6 | सिंधुदुर्ग | 80.3 | 73.9 |
| 7 | नाशिक | 74.4 | 50.7 |
| 8 | नंदुरबार | 55.8 | 42.3 |
| 9 | धुळे | 71.6 | 45.9 |
| 10 | जळगाव | 75.4 | 52.2 |
| 11 | अहमदनगर | 75.3 | 53.9 |
| 12 | पुणे | 80.5 | 62.2 |
| 13 | सातारा | 78.2 | 65.0 |
| 14 | सांगली | 76.6 | 73.9 |
| 15 | सोलापूर | 71.2 | 63.8 |
| 16 | कोल्हापूर | 76.9 | 75.1 |
| 17 | औरंगाबाद | 72.9 | 54.2 |
| 18 | जालना | 64.4 | 55.6 |
| 19 | परभणी | 66.1 | 58.8 |
| 20 | हिंगोली | 66.3 | 56.6 |

| अ.क्र. | जिल्हा | सर्वसाधारण लोकसंख्येतील साक्षरतेचे प्रमाण (टक्के) | आदिवासी लोकसंख्येतील साक्षरतेचे प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| 21 | बीड | 68.0 | 60.1 |
| 22 | नांदेड | 67.8 | 59.9 |
| 23 | उस्मानाबाद | 69.0 | 58.3 |
| 24 | लातूर | 71.5 | 65.3 |
| 25 | बुलढाणा | 75.8 | 57.4 |
| 26 | अकोला | 81.4 | 70.5 |
| 27 | वाशिम | 73.4 | 60.1 |
| 28 | अमरावती | 82.5 | 64.1 |
| 29 | यवतमाळ | 73.6 | 62.2 |
| 30 | वर्धा | 80.1 | 69.2 |
| 31 | नागपूर | 84.0 | 76.0 |
| 32 | भंडारा | 78.5 | 73.2 |
| 33 | गोंदिया | 78.5 | 69.8 |
| 34 | गडचिरोली | 60.1 | 49.0 |
| 35 | चंद्रपूर | 73.2 | 64.4 |
| 36 | महाराष्ट्र | 76.9 | 52.2 |

*संदर्भः- ॲन्युअल ट्रायबल सब प्लॅन, २००८-२००९, गव्हर्मेंट ऑफ महाराष्ट्र, ट्रायबल डेव्हलपमेंट डिपार्टमेंट, पृ.क्र. ४६५*

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सन २००१ च्या जनगणनेनुसार सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यातील सर्वसाधारण व्यक्तींच्या साक्षरतेच्या प्रमाणाइतके (जवळ जवळ) आदिवासींच्या साक्षरतेचे प्रमाण आहे. मुंबई उपनगर, मुंबई, सिंधुदुर्ग, नागपूर, भंडारा या जिल्ह्यातील सर्वसाधारण व्यक्तीमधील साक्षरतेपेक्षा त्या जिल्ह्यातील आदिवासींच्या साक्षरतेचे प्रमाण कमी असले तरी ते खूप कमी नाही. तुलनेने इतर जिल्ह्यातील सर्वसाधारण व्यक्तींच्या साक्षरतेपेक्षा त्या जिल्ह्यातील आदिवासींच्या साक्षरतेचे प्रमाण खूपच कमी आहे. उदाहरणार्थ, रायगड जिल्ह्यातील सर्वसाधारण व्यक्तींच्या साक्षरतेचे प्रमाण ७७.०० टक्के आहे. तर त्याच जिल्ह्यातील आदिवासींच्या साक्षरतेचे प्रमाण मात्र ४५.०० टक्के इतके अल्प आहे.

## महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील लिंगभेदानुसार आदिवासी समाजातील साक्षरतेचे प्रमाण

सन २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील आदिवासी समाजातील साक्षरतेचे प्रमाण ५५.३१ टक्के इतके आहे. पुढील तक्ता क्र. ४ मध्ये महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील आदिवासी साक्षरतेचे प्रमाण दर्शविले आहे.

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सन २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात पुरूष आणि स्त्रिया मिळून एकत्रित साक्षरतेचे प्रमाण सर्वात जास्त मुंबई या जिल्ह्याचे असून ते ८०.८० टक्के इतके आहे तर एकत्रित आदिवासी साक्षरतेचे सर्वात कमी प्रमाण नंदुरबार या जिल्ह्याचे असून ते ४२.३० टक्के इतके आहे.

तक्ता क्रमांक - ४

| अ.क्र. | जिल्हा | आदिवासी साक्षरतेचे प्रमाण (टक्के) | | |
|---|---|---|---|---|
| | | पुरूष | स्त्रिया | एकत्रित |
| 1 | मुंबई उपनगर | 85.7 | 66.7 | 76.8 |
| 2 | मुंबई | 86.8 | 73.6 | 80.8 |
| 3 | रायगड | 55.5 | 34.4 | 45.0 |
| 4 | ठाणे | 59.3 | 34.5 | 46.9 |
| 5 | रत्नागिरी | 62.7 | 39.0 | 51.3 |
| 6 | सिंधुदुर्ग | 82.5 | 65.2 | 73.9 |
| 7 | नाशिक | 62.5 | 38.6 | 50.7 |
| 8 | नंदुरबार | 52.7 | 32.2 | 42.3 |
| 9 | धुळे | 56.5 | 35.0 | 45.9 |
| 10 | जळगाव | 65.1 | 38.6 | 52.2 |
| 11 | अहमदनगर | 67.2 | 40.2 | 53.9 |
| 12 | पुणे | 74.6 | 49.2 | 62.2 |
| 13 | सातारा | 74.5 | 55.2 | 65.0 |
| 14 | सांगली | 84.5 | 62.7 | 73.9 |
| 15 | सोलापूर | 76.7 | 49.9 | 63.8 |
| 16 | कोल्हापूर | 85.8 | 64.0 | 75.1 |
| 17 | औरंगाबाद | 67.6 | 40.3 | 54.2 |
| 18 | जालना | 69.4 | 41.3 | 55.6 |
| 19 | परभणी | 74.2 | 43.1 | 58.8 |
| 20 | हिंगोली | 72.3 | 40.1 | 56.6 |
| 21 | बीड | 72.3 | 46.9 | 60.1 |
| 22 | नांदेड | 73.9 | 45.3 | 59.9 |
| 23 | उस्मानाबाद | 71.2 | 44.5 | 58.3 |
| 24 | लातूर | 78.1 | 51.6 | 65.3 |
| 25 | बुलढाणा | 71.3 | 42.7 | 57.4 |
| 26 | अकोला | 81.5 | 58.8 | 70.5 |
| 27 | वाशिम | 74.7 | 44.8 | 60.1 |
| 28 | अमरावती | 75.3 | 52.4 | 64.1 |
| 29 | यवतमाळ | 74.3 | 49.5 | 62.2 |
| 30 | वर्धा | 78.4 | 59.3 | 69.2 |
| 31 | नागपूर | 84.5 | 66.9 | 76.0 |
| 32 | भंडारा | 85.9 | 60.5 | 73.2 |
| 33 | गोंदिया | 83.8 | 56.1 | 69.8 |
| 34 | गडचिरोली | 60.7 | 37.1 | 49.0 |

| अ.क्र. | जिल्हा | आदिवासी साक्षरतेचे प्रमाण (टक्के) | | |
|---|---|---|---|---|
| | | पुरूष | स्त्रिया | एकत्रित |
| 35 | चंद्रपूर | 76.0 | 52.4 | 64.4 |
| 36 | महाराष्ट्र | 67.0 | 43.1 | 52.2 |

*संदर्भ:- ॲन्युअल ट्रायबल सब प्लॅन, २००८-२००९, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र, ट्रायबल डेव्हलपमेंट डिपार्टमेंट, पृ.क्र. ४६५*

महाराष्ट्रात आदिवासी पुरूषामधील साक्षरतेचे सर्वात जास्त प्रमाण मुंबई या जिल्ह्याचे असून ते ८६.८० टक्के इतके आहे. तर आदिवासी पुरूषामधील साक्षरतेचे सर्वात कमी प्रमाण नंदुरबार या जिल्ह्याचे असून ते ५२.७० टक्के इतके आहे.

महाराष्ट्रात आदिवासी स्त्रियामधील साक्षरतेचे सर्वात जास्त प्रमाण मुंबई या जिल्ह्याचे असून ते ७३.६० टक्के इतके आहे. तर आदिवासी स्त्रियामधील साक्षरतेचे सर्वात कमी प्रमाण नंदुरबार या जिल्ह्याचे सर्वात कमी प्रमाण नंदुरबार या जिल्ह्याचे असून ते ३२.२० टक्के इतके आहे.

## महाराष्ट्रातील सर्वसाधारण लोकसंख्येतील आणि आदिवासी लोकसंख्येतील साक्षरतेचे प्रमाण

तक्ता क्र. ५ मध्ये महाराष्ट्रातील सर्वसाधारण लोकसंख्येतील आणि आदिवासी लोकसंख्येतील साक्षरतेचे प्रमाण दर्शविले आहे.

तक्ता क्रमांक - ५

| अ.क्र. | जनगणना वर्ष | सर्वसाधारण लोकसंख्येतील साक्षरतेचे प्रमाण (टक्के) | आदिवासी लोकसंख्येतील साक्षरतेचे प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| 1 | 1961 | 29.82 | 7.21 |
| 2 | 1971 | 39.13 | 11.74 |
| 3 | 1981 | 47.02 | 22.29 |
| 4 | 1991 | 64.87 | 36.77 |
| 5 | 2001 | 76.90 | 52.20 |

संदर्भः पॉप्युलेशन सेन्सस

महाराष्ट्रातील सर्वसाधारण व्यक्तींच्या साक्षरता प्रमाणापेक्षा आदिवासींमधील साक्षरतेचे प्रमाण अत्यंत कमी आहे. उदाहरणार्थ सन १९६१ च्या जनगणनेनुसार सर्वसाधारण लोकसंख्येच्या साक्षरतेचे प्रमाण २९.८२ टक्के एवढे होते. तर आदिवासी लोकांमधील साक्षरतेचे प्रमाण अवघे ७.२१ टक्के होते. सन २००१ च्या जनगणनेनुसार सर्वसाधारण लोकसंख्येतील साक्षरतेचे प्रमाण ७६.९० टक्के आहे. तर आदिवासी लोकसंख्येतील साक्षरतेचे प्रमाण ५२.२० टक्के आहे.

वरील तक्त्यावरून प्रत्येक जनगणनेत महाराष्ट्रातील सर्वसाधारण आणि आदिवासी लोकसंख्येतील साक्षरतेच्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते. तथापि सर्वसाधारण लोकसंख्येपेक्षा आदिवासी लोकांमध्ये साक्षरतेचे प्रमाण खूपच कमी असल्याचे दिसते.

**महाराष्ट्रातील सर्वसाधारण पुरूष व्यक्तीमधील आणि आदिवासी पुरूष व्यक्तीमधील साक्षरतेचे प्रमाण**

तक्ता क्र. ५.१ मध्ये महाराष्ट्रातील सर्वसाधरण पुरूष व्यक्तीमधील आणि आदिवासी पुरूष व्यक्तीमधील साक्षरतेचे प्रमाण दर्शविले आहे.

तक्ता क्रमांक – ५.१

| अ.क्र. | जनगणना वर्ष | सर्वसाधारण पुरूष व्यक्तीमधील साक्षरतेचे प्रमाण (टक्के) | आदिवासी पुरूष व्यक्तीमधील साक्षरतेचे प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| 1 | 1961 | 42.04 | 12.55 |
| 2 | 1971 | 51.04 | 19.06 |
| 3 | 1981 | 58.65 | 32.38 |
| 4 | 1991 | 76.56 | 49.08 |
| 5 | 2001 | 86.60 | 67.00 |

*संदर्भ: पॉप्युलेशन सेन्सस*

महाराष्ट्रातील सर्वसाधारण पुरूष व्यक्तीमधील साक्षरता प्रमाणापेक्षा आदिवासी (Tribal) पुरूष व्यक्तीमधील साक्षरतेचे प्रमाण कमी आहे. उदाहरणार्थ सन १९६१ च्या जनगणनेनुसार सर्वसाधारण पुरूष व्यक्तीमधील साक्षरतेचे प्रमाण ४२.०४ टक्के एवढे होते. तर आदिवासी पुरूष व्यक्तीमधील साक्षरतेचे प्रमाण अवघे १२.५५ टक्के होते. सन २००१ च्या जनगणनेनुसार सर्वसाधारण पुरूष व्यक्तीमधील साक्षरतेचे प्रमाण ८६.६० टक्के आहे. तर आदिवासी पुरूष व्यक्तीमधील साक्षरतेचे प्रमाण ६७.०० टक्के इतके आहे.

वरील तक्त्यावरून प्रत्येक जनगणनेत महाराष्ट्रातील सर्वसाधारण आणि आदिवासी पुरुष व्यक्तीमधील साक्षरतेच्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते. परंतु सर्वसाधारण पुरूष व्यक्तीमधील साक्षरतेपेक्षा आदिवासी पुरूषामधील साक्षरतेचे प्रमाण खूपच कमी आहे.

**महाराष्ट्रातील सर्वसाधारण स्त्री आणि आदिवासी स्त्री व्यक्तीमधील साक्षरतेचे प्रमाण**

तक्ता क्र. ५.२ मध्ये महाराष्ट्रातील सर्वसाधारण स्त्री व्यक्तीमधील आणि आदिवासी स्त्री व्यक्तीमधील साक्षरतेचे प्रमाण दर्शविले आहे.

तक्ता क्रमांक – ५.२

| अ.क्र. | जनगणना वर्ष | सर्वसाधारण स्त्रियामधील साक्षरतेचे प्रमाण (टक्के) | आदिवासी स्त्रियामधील साक्षरतेचे प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| 1 | 1961 | 16.76 | 1.75 |
| 2 | 1971 | 26.43 | 4.21 |
| 3 | 1981 | 34.63 | 11.94 |
| 4 | 1991 | 52.30 | 24.03 |
| 5 | 2001 | 67.00 | 43.10 |

*संदर्भ:– पॉप्युलेशन सेन्सस*

महाराष्ट्रातील सर्वसाधारण स्त्रियामधील साक्षरता प्रमाणापेक्षा आदिवासी स्त्रियामधील साक्षरतेचे प्रमाण कमी आहे. उदाहरणार्थ सन १९६१ च्या जनगणनेनुसार सर्वसाधारण स्त्रियामधील साक्षरतेचे प्रमाण १६.७६ टक्के होते. तर आदिवासी स्त्रियांमधील साक्षरतेचे प्रमाण अवघे १.७५ टक्के होते. सन २००१ च्या जनगणनेनुसार सर्वसाधारण स्त्रियामधील साक्षरतेचे प्रमाण ६७.०० टक्के आहे. तर आदिवासी स्त्रियांमधील साक्षरतेचे प्रमाण ४३.१० टक्के आहे.

वरील तक्त्यावरून प्रत्येक जनगणनेत महाराष्ट्रातील सर्वसाधारण आणि आदिवासी

साक्षरतेच्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते. परंतु सर्वसाधारण स्त्रियांमधील साक्षरतेपेक्षा आदिवासी स्त्रियांमधील साक्षरतेचे प्रमाण खूपच कमी आहे.

### महाराष्ट्रातील आदिवासी पुरूष आणि आदिवासी स्त्रियांमधील साक्षरतेचे प्रमाण

खालील तक्त्यात महाराष्ट्रातील आदिवासी पुरूष आणि आदिवासी स्त्रियांमधील साक्षरतेचे प्रमाण दर्शविले आहे.

तक्ता क्रमांक - ५.३

| अ.क्र. | जनगणना वर्ष | आदिवासी पुरूषांमधील साक्षरतेचे प्रमाण (टक्के) | आदिवासी स्त्रियांमधील साक्षरतेचे प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| 1 | 1961 | 12.55 | 1.75 |
| 2 | 1971 | 19.06 | 4.21 |
| 3 | 1981 | 32.38 | 11.94 |
| 4 | 1991 | 49.08 | 24.03 |
| 5 | 2001 | 67.00 | 43.10 |

*संदर्भ:- पॉप्युलेशन सेन्सस*

महाराष्ट्रातील आदिवासी पुरूषामधील साक्षरतेपेक्षा आदिवासी स्त्रियामधील साक्षरतेचे प्रमाण खूपच कमी आहे. उदहरणार्थ, सन १९६१ च्या जनगणनेनुसार आदिवासी पुरूषामधील साक्षरतेचे प्रमाण १२.५५ टक्के होते. तर आदिवासी स्त्रियामधील साक्षरतेचे प्रमाण अवघे १.७५ टक्के होते. सन २००१ च्या जनगणनेनुसार राज्यातील आदिवासी पुरूषामधील साक्षरतेचे प्रमाण ६७.०० टक्के आहे. तर आदिवासी स्त्रियामधील साक्षरतेचे प्रमाण ४३.१० टक्के आहे.

वरील तक्त्यावरून प्रत्येक जनगणनेत महाराष्ट्रातील आदिवासी पुरूषामधील आणि आदिवासी स्त्रियामधील साक्षरतेच्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते. परंतु आदिवासी पुरूषामधील साक्षरतेपेक्षा आदिवासी स्त्रियामधील साक्षरतेचे प्रमाण खूपच कमी आहे.

### भारतातील व महाराष्ट्रातील आदिवासी समाजातील ग्रामीण व शहरी साक्षरतेचे प्रमाण

खालील तक्त्यात सन २००१ च्या जनगणनेनुसार भारतातील व महाराष्ट्रातील आदिवासी समाजातील ग्रामीण व शहरी साक्षरतेचे प्रमाण दर्शविले आहे.

तक्ता क्रमांक - ६

| अ.क्र. | घटक | आदिवासी साक्षरतेचे प्रमाण (टक्के) | |
|---|---|---|---|
| | | भारत | महाराष्ट्र |
| 1 | ग्रामीण | 45.02 | 52.31 |
| 2 | शहरी | 69.09 | 74.18 |
| 3 | एकत्रित | 47.10 | 55.31 |

*संदर्भ: ट्रायबल रिसर्च बुलेटीन, खंड -३४, अंक -१, मार्च २०१०, पृ.क्र. ९ व १०*

सन २००१ च्या जनगणनेनुसार भारतातील ग्रामीण आणि शहरी असे एकत्रित आदिवासी साक्षरतेचे प्रमाण ४७.१० टक्के एवढे आहे. तर महाराष्ट्रातील एकत्रित आदिवासी साक्षरतेचे प्रमाण ५५.३१ टक्के इतके म्हणजे भारतातील एकत्रित आदिवासी साक्षरतेच्या प्रमाणापेक्षा जास्त आहे.

भारतातील ग्रामीण आदिवासी साक्षरता प्रमाणापेक्षा (४५.०२ टक्के) शहरी आदिवासी साक्षरतेचे प्रमाण जास्त आहे (६९.०९ टक्के). महाराष्ट्रातील ग्रामीण आदिवासी साक्षरता प्रमाणापेक्षा (५२.३१ टक्के) शहरी आदिवासी साक्षरतेचे प्रमाण जास्त आहे (७४.१८ टक्के).

भारत आणि महाराष्ट्र अशी तुलना करता वरील तक्त्यावरून असे दिसते की, भारतातील ग्रामीण आणि शहरी आदिवासी साक्षरतेपेक्षा महाराष्ट्रातील ग्रामीण आणि शहरी आदिवासी साक्षरतेचे प्रमाण जास्त आहे.

**लिंगभेदानुसार आदिवासी ग्रामीण साक्षरतेचे प्रमाण**

खालील तक्त्यात सन २००१ च्या जनगणनेनुसार लिंगभेदानुसार ग्रामीण भागातील (बिगर शहरी भागातील) आदिवासी समाजातील साक्षरतेचे प्रमाण दर्शविले आहे.

तक्ता क्रमांक - ६.१

| अ.क्र. | घटक | आदिवासी ग्रामीण साक्षरतेचे प्रमाण (टक्के) | |
|---|---|---|---|
| | | भारत | महाराष्ट्र |
| 1 | पुरूष | 57.39 | 64.52 |
| 2 | स्त्री | 32.44 | 39.88 |
| 3 | एकत्रित | 45.02 | 52.31 |

सन २००१ च्या जनगणनेनुसार भारतातील आणि महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील आदिवासी समाजातील पुरूषामधील साक्षरतेपेक्षा स्त्रियामधील साक्षरतेचे प्रमाण खूपच कमी आहे. उदाहरणार्थ, भारतातील ग्रामीण भागातील आदिवासी पुरूषामधील साक्षरतेचे प्रमाण ५७.३९ टक्के आहे. तर ग्रामीण भागातील आदिवासी स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण ३२.४४ टक्के आहे. महाराष्ट्रातील आदिवासी पुरूष ग्रामीण साक्षरतेचे प्रमाण ६४.५२ टक्के आहे. तर ग्रामीण भागातील आदिवासी स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण ३९.८८ टक्के आहे.

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सन २००१ च्या जनगणनेनुसार भारतातील ग्रामीण भागातील आदिवासी पुरूष आणि स्त्रियामधील साक्षरतेपेक्षा महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील आदिवासी पुरूष आणि स्त्रियामधील साक्षरतेचे प्रमाण जास्त आहे.

**लिंगभेदानुसार शहरी भागातील आदिवासींच्या साक्षरतेचे प्रमाण**

खालील तक्त्यात सन २००१ च्या जनगणनेनुसार भारतातील व महाराष्ट्रातील शहरी भागातील आदिवासी लोकांच्या साक्षरतेचे प्रमाण दर्शविले आहे.

तक्ता क्रमांक - ६.२

| अ.क्र. | घटक | शहरी भागातील आदिवासींच्या साक्षरतेचे प्रमाण (टक्के) | |
|---|---|---|---|
| | | भारत | महाराष्ट्र |
| 1 | पुरूष | 77.77 | 82.98 |
| 2 | स्त्री | 59.87 | 64.70 |
| 3 | एकत्रित | 69.09 | 74.18 |

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सन २००१ च्या जनगणनेनुसार भारतातील आणि महाराष्ट्रातील शहरी भागातील आदिवासी समाजातील पुरूषामधील साक्षरतेपेक्षा आदिवासी स्त्रियामधील साक्षरतेचे प्रमाण कमी आहे. उदाहरणार्थ, भारतातील शहरी भागातील आदिवासी पुरूषामधील साक्षरतेचे प्रमाण ७७.७७ टक्के आहे. तर आदिवासी स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण ५९.८७ टक्के आहे. महाराष्ट्रातील शहरी भागातील आदिवासी पुरूषामधील साक्षरतेचे प्रमाण ८२.९८ टक्के आहे. तर शहरी भागातील आदिवासी स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण ७४.१८ टक्के आहे.

सन २००१ च्या जनगणनेनुसार भारतातील शहरी भागातील आदिवासी पुरूष आणि स्त्रियामधील साक्षरतेपेक्षा महाराष्ट्रातील शहरी भागातील आदिवासी पुरूष आणि स्त्रियामधील साक्षरतेचे प्रमाण जास्त आहे.

**लिंगभेदानुसार आदिवासी ग्रामीण व शहरी एकत्रित साक्षरतेचे प्रमाण**

खालील तक्त्यात सन २००१ च्या जनगणनेनुसार भारतातील व महाराष्ट्रातील आदिवासी ग्रामीण व शहरी एकत्रित साक्षरतेचे प्रमण दर्शविले आहे.

तक्ता क्रमांक - ६.३

| अ.क्र. | घटक | आदिवासी ग्रामीण व शहरी एकत्रित साक्षरतेचे प्रमाण (टक्के) | |
|---|---|---|---|
| | | भारत | महाराष्ट्र |
| 1 | पुरूष | 59.17 | 67.02 |
| 2 | स्त्री | 34.76 | 43.08 |
| 3 | एकत्रित | 47.10 | 55.31 |

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सन २००१ च्या जनगणनेनुसार भारतातील ग्रामीण व शहरी एकत्रित आदिवासी पुरूषामधील साक्षरतेपेक्षा (५९.१७ टक्के) महाराष्ट्रातील ग्रामीण व शहरी एकत्रित आदिवासी पुरूषामधील साक्षरतेचे प्रमाण जास्त आहे (६७.०२ टक्के). तसेच भारतातील ग्रामीण व शहरी एकत्रित आदिवासी स्त्रियामधील साक्षरतेपेक्षा (३४.७६ टक्के) महाराष्ट्रातील ग्रामीण व शहरी एकत्रित आदिवासी स्त्रियामधील साक्षरतेचे प्रमाण जास्त आहे (४३.०८ टक्के).

**समारोप**

आपल्या देशातील आणि राज्यातील सर्वसाधारण लोकसंख्येतील साक्षरता प्रमाणापेक्षा आदिवासी समाजातील साक्षरतेचे प्रमाण खूपच कमी आहे. आदिवासी समाजात आजही निरक्षरतेचे प्रमाण मोठे आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे बहुसंख्य आदिवासी पालक निरक्षर आहेत. त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटलेले नाही. त्यामुळे त्यांना आपल्या मुला-बाळांना शिक्षण द्यावेसे वाटत नाही. गरीबी हा सुद्धा आदिवासींच्या निरक्षरतेस कारणीभूत असणारा महत्त्वाचा घटक आहे. बहुसंख्य गरीब आदिवासींना वर्षातील आठ ते दहा महिने परगावी आपल्या गावापासून दूर कामाला जावे लागते. त्यामुळे त्यांच्या मुला-बाळांना शाळेचे तोंडही पाहण्याचे भाग्य लाभत नाही. त्यामुळे आदिवासी भागात शिक्षणाची सुविधा उपलब्ध असूनही गरीब आदिवासींना त्या सुविधेचा लाभ घेता येत नाही. गरीबीमुळे काही आदिवासी मुलांना व मुलींना जनावरे सांभाळणे, घराची राखण करणे, लहान भावंडे सांभाळणे, घरकाम करणे इत्यादी कामे करावी लागतात.

त्यामुळे पाड्यावर शाळा असूनही शिक्षणापासून वंचित रहावे लागते. ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील आदिवासी समाजात प्रस्तुत अभ्यासकाने काही वर्षे वास्तव्य केले आहे. या वास्तव्यात प्रस्तुत अभ्यासकाला असे आढळले की, आदिवासी जेथे राहतात तेथील वातावरण चांगले नाही. काही पाड्यावर व आसपास दारूचे गुत्ते आहेत. परिसरातील लोक दिवसभर दारू पिण्यास पाड्यावर येतात. काहीजण दारू पिऊन बेहोष होऊन शाळेसमोरच पडलेले असतात. बहुसंख्य आदिवासी पालकही दारू पिऊन घरात आणि रस्त्यावर पडलेले असतात. अशा वातावरणामुळे मुलांना शिक्षण घ्यावेसे वाटत नाही आणि व्यसनाधिन पालकही आपली मुले शाळेत जातात की नाही हे पाहत नाहीत. अशा प्रकारे आदिवासी समाजात साक्षरतेचे प्रमाण कमी असण्यास आर्थिक आणि सामाजिक घटक कारणीभूत आहेत.

दारिद्रय, वेठबिगारी, अंधश्रद्धा, शोषण व फसवणूक या आदिवासींना भेडसावणाऱ्या प्रमुख

समस्या असून या समस्यांची तीव्रता कमी होण्यासाठी आदिवासी समाजातील साक्षरतेचे प्रमाण वाढणे अत्यंत आवश्यक आहे. आदिवासी समाजात जे शिकलेले आहेत त्या सर्वांना त्यांच्या पात्रतेप्रमाणे नोकऱ्या दिल्या पाहिजेत. तरच आदिवासींना आपल्या मुलाबाळांना शिकवावेसे वाटेल. शालेय, महाविद्यालयीन शिक्षण घेऊनही कित्येक आदिवासी तरूण, तरूणी बेरोजगार आहेत. शिक्षण घेऊनही नोकऱ्या मिळत नसल्याने आदिवासीं आपल्या मुला-मुलींना शाळेत घालण्यास तयार होत नाहीत. म्हणून आदिवासी समाजातील साक्षरतेचे प्रमाण वाढण्यासाठी आदिवासी समाजातील बेकारी संपविणे आवश्यक आहे. आदिवासी समाजातील साक्षरतेचे प्रमाण वाढावे यासाठी आदिवासी भागात जास्तीत जास्त शाळा उघडणे, शाळांचा गुणात्मक दर्जा उंचावणे, शिक्षणासंदर्भात आदिवासींमध्ये असणाऱ्या अंधश्रद्धा व गैरसमजुती नष्ट करणे इत्यादी उपाय प्रस्तुत अभ्यासकाला सुचवावेसे वाटतात.

● ● ●

---

(पृष्ठ क्र. ५४ वरुन)

अंगणवाड्या स्थापन केल्यास आदिवासींच्या बालकांना पूरक आहार, लसीकरण व इतर सुविधा मोफत मिळून त्यांच्यातील कुपोषणाचे प्रमाण कमी होऊ शकेल.

**५. आरोग्य शिबीरांचे आयोजन**

आदिवासी परगावी जेथे काम करतात त्या परिसरात शासन आणि सेवाभावी संस्था यांनी महिन्यातून एकदा आरोग्य शिबीर भरविणे आवश्यक आहे. या शिबीरात तपासणी व मोफत औषधे या सुविधा आदिवासींना उपलब्ध करून दिल्यास आदिवासी मजुरांचे आरोग्य चांगले राहील. त्यांच्यातील आजारी पडण्याचे तसेच कुपोषणाचे व मृत्यूचे प्रमाण कमी होईल.

**६. सुशिक्षित बेरोजगारांना नोकऱ्या**

दहावी, बारावी शिक्षण झालेले व असे शिक्षण चालू असलेले आदिवासी युवकसुद्धा रोजगारासाठी परगावी स्थलांतर करतात. अशा युवकांना शासनाने शिपाई, क्लार्क इत्यादी पदावर कायम स्वरूपी नोकऱ्या द्याव्यात. म्हणजे सुशिक्षित बेकार युवकांना स्थलांतर करावे लागणार नाही.

**समारोप**

उपजीविकेसाठी वर्षातील काही दिवस परगावी स्थलांतर करणाऱ्या आदिवासींचे प्रमाण मोठे असून या आदिवासींना दरवर्षी स्थलांतर करावे लागते. शेतीत आणि सरकारच्या रोजगार योजनेत मिळणाऱ्या मजुरीपेक्षा परगावी स्थलांतराच्या ठिकाणी आदिवासींना अधिक मजुरी मिळते. स्थानिक भागापेक्षा आदिवासींना अधिक मजुरी मिळत असली तरी काही समस्यांनाही त्यांना तोंड द्यावे लागते. म्हणून स्थलांतर रोखणे आवश्यक आहे. आदिवासी भागातील कृषीक्षेत्रात रोजगार वाढीस सद्यातरी वाव नाही. तेथील शेती ही पूर्णपणे पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. म्हणून स्थलांतर रोखण्यासाठी सरकारने आदिवासी भागात रोजगाराची कामे मोठ्या प्रमाणात काढली पाहिजेत.

● ● ●

# आदिवासींच्या राहणीमानाचा अभ्यास

## प्रास्ताविक

सकस आहार, चांगले घर, करमणुकीच्या चांगल्या सोयी, स्वतःची वाहतुक साधने, पाण्याची उपलब्धता, भांडी, कपडे व वीजेची उपलब्धता किंवा सुविधा, फ्रीज, गॅस, मिक्सर, वॉशिंग मशिन, प्रेशर कुकर, लोखंडी तिजोरी इत्यादींची उपलब्धता, पुरेशी बचत व गुंतवणूक आणि चांगले उत्पन्न इत्यादी घटक राहणीमानाचा चांगला दर्जा दर्शवितात. या बाबी ज्या व्यक्तींना किंवा कुटुंबांना चांगल्या प्रकारे व पुरेशा प्रमाणात उपभोगावयास मिळतात त्या व्यक्तींचा किंवा कुटुंबांचा राहणीमानाचा दर्जा चांगला असतो.

शोधनिबंधाच्या या भागात अभ्यास क्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबापैकी किती कुटुंबांच्या राहणीमानाचा दर्जा चांगला आहे ते राहणीमानाच्या विविध निकषांच्या आधारे स्पष्ट केले आहे. तसेच राहणीमानाच्या सर्व १२ निकषांचा एकत्रित विचार करून चांगले राहणीमान असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण त्यांच्या जमातीनुसार दर्शविले आहे.

## राहणीमानाचे विविध निकष

राहणीमानाचे विविध १२ निकष आणि त्या निकषानुसार चांगले राहणीमान असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण खालील विविध तक्त्यांच्या साहाय्याने स्पष्ट केले आहे.

### १. 'अन्न दर्जा' निकष

ज्या कुटुंबांना वर्षभर पोटभर आणि चांगले अन्न मिळते त्या कुटुंबांचा राहणीमानाचा दर्जा चांगला असतो. म्हणून आदिवासींच्या राहणीमानाचा दर्जा अभ्यासण्यासाठी 'अन्नाचा दर्जा' हा निकष विचारात घेतला आहे. खालील तक्त्यात सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबांपैकी किती कुटुंबांना चांगल्या दर्जाचे अन्न मिळते, याची माहिती दिली आहे.

तक्ता क्रमांक – १

| अ.क्र. | जमातीचे नाव | अन्नाचा दर्जा चांगला असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या | सर्व्हेक्षण केलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | महादेव कोळी | 08 | 60 | 13.33 |
| 2 | ढोर कोळी | 01 | 60 | 1.66 |
| 3 | कातकरी | 00 | 60 | 0 |
| 4 | वारली | 02 | 60 | 3.33 |
| 5 | कोकणा | 03 | 60 | 5.00 |
| 6 | म ठाकूर | 05 | 60 | 8.33 |
| 7 | क ठाकूर | 07 | 60 | 11.66 |
| | **एकूण** | **26** | **420** | **6.19** |

*१) संदर्भः प्राथमिक सर्व्हेक्षण*

*२) स्तंभ क्रमांक ५ मधील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका विशिष्ट जमातीतील अन्नाचा दर्जा चांगला असणाऱ्या कुटुंबांचे त्याच एका विशिष्ट जमातीतील सर्व्हेक्षण केलेल्या एकूण कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

तक्त्यावरून असे दिसते की, अभ्यासक्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबापैकी केवळ ६.१९ टक्के कुटुंबांच्या अन्नाचा दर्जा चांगला आहे. म्हणजेच ९३.८१ टक्के कुटुंबांना चांगल्या दर्जाचे अन्न मिळत नाही. वरील तक्त्यावरून असे दिसते की, राहणीमानाच्या अन्नाचा दर्जा या निकषानुसार चांगले राहणीमान असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण ६.१९ टक्के एवढे अल्प आहे. बहुसंख्य म्हणजे ९३.८१ टक्के कुटुंबांचे राहणीमान निकृष्ट दर्जाचे आहे.

एकेका जमातीचा स्वतंत्रपणे विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की, महादेव कोळी या जमातीतील सर्व्हेक्षित ६० कुटुंबांपैकी १३.३३ टक्के कुटुंबांचा अन्नाचा दर्जा चांगला आहे. या जमातीतील ८६.६७ टक्के कुटुंबांचा अन्नाचा दर्जा चांगला नाही. क ठाकूर या जमातीतील ११.६६ टक्के कुटुंबांचा अन्नाचा दर्जा चांगला आहे. तर या जमातीतील ८८.३४ टक्के कुटुंबांचा अन्नाचा दर्जा चांगला नाही. कातकरी या जमातीतील एकाही कुटुंबाचा अन्नाचा दर्जा चांगला नाही. तर ढोरकोळी या जमातीतील केवळ १.६६ टक्के कुटुंबांचा अन्नाचा दर्जा चांगला आहे. तर या जमातीतील ९८.३४ टक्के कुटुंबांचा अन्नाचा दर्जा चांगला नाही. अशा प्रकारे सर्वच आदिवासी जमातीत अन्नाचा दर्जा चांगला नसणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ८६ टक्क्यापासून १०० टक्क्यापर्यंत असल्याचे दिसते. म्हणून 'अन्नाचा दर्जा' या निकषानुसार चांगले राहणीमान असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण अत्यंत अल्प असल्याचे स्पष्ट होते. आदिवासींच्या पाहणीत असे आढळले की, ज्या ९३.८१ टक्के आदिवासी कुटुंबांचा अन्नाचा दर्जा चांगला नाही त्यापैकी बहुसंख्य कुटुंबांना वर्षातील काही महिने अर्धपोटी तसेच काही वेळा उपाशीही रहावे लागते. भात, नागलीची भाकरी, तूर व उडीद डाळीची आमटी इत्यादी साधा आहार सुद्धा त्यांना पोटभर मिळत नाही.

**२ 'निवास दर्जा' निकष**

फरशीयुक्त जमीन, फर्निचर, स्नानगृह, संडासाची सोय, पुरेशा खोल्या, सिमेंटचे पक्के घर, भरपूर सूर्यप्रकाश व मोकळी हवा इत्यादी निकष विचारात घेऊन घराचा दर्जा ठरवला जातो. घर किंवा निवास व्यवस्था चांगल्या दर्जाची असेल तर संबंधित कुटुंबांचा राहणीमानाचा दर्जा चांगला आहे असे मानले जाते. म्हणून आदिवासींच्या राहणीमानाचा दर्जा अभ्यासण्यासाठी 'निवासाचा दर्जा' हा निकष विचारात घेतला आहे. तक्ता क्र. २ मध्ये सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबांपैकी किती कुटुंबांची घरे चांगल्या दर्जाची आहेत, याची माहिती दिली आहे.

अभ्यासक्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबांपैकी एकाही कुटुंबाच्या घराचा दर्जा चांगला नाही. अगदी थोड्या आदिवासींची घरे सिमेंटची किंवा पक्की असल्याचे प्रस्तुत अभ्यासकाला आदिवासींच्या वास्तव्यात दिसून आले. परंतु त्यांच्याकडे चांगले फर्निचर तसेच संडासाची सोय नसल्याचे आढळले. बहुसंख्य आदिवासी कुडाच्या व कौलारू घरात राहतात. घरात पुरेसा उजेड किंवा मोकळी हवा नसते. थंडीच्या दिवसात आदिवासींना कुडकुडत झोपावे लागते. साध्या घरात राहावे लागत असल्याने पावसाळ्यात आदिवासींचे खूप हाल होतात. बहुसंख्य आदिवासींची घरे पावसाळ्यात माणसांना राहण्यालायक नसतात. पावसाळ्यात घरभर ओल पसरलेली असते. घरातच

तक्ता क्रमांक - २

| अ.क्र. | जमातीचे नाव | निवासाचा दर्जा चांगला असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या | सर्व्हेक्षण केलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | महादेव कोळी | 0 | 60 | 0 |
| 2 | ढोर कोळी | 0 | 60 | 0 |
| 3 | कातकरी | 0 | 60 | 0 |
| 4 | वारली | 0 | 60 | 0 |
| 5 | कोकणा | 0 | 60 | 0 |
| 6 | म ठाकूर | 0 | 60 | 0 |
| 7 | क ठाकूर | 0 | 60 | 0 |
| | **एकूण** | **0** | **420** | **0** |

*(१) संदर्भ: प्राथमिक सर्व्हेक्षण*

एका बाजूला जनावरे, कोंबड्यांची डालगी आणि कुत्री असतात. त्यामुळे कुबट वास येत असतो. डास, गोचिड, माशा इत्यादीमुळे घरातील वातावरण निरूत्साही आणि रोगट बनलेले असते. निवास व्यवस्था चांगली नसल्याने आदिवासींना अनेक आजारांना तोंड द्यावे लागते.

### ३ 'पाण्याची सुविधा' निकष

कुटुंबांला पिण्याचे आणि वापराचे पाणी किती प्रमाणात मिळते यावरही कुटुंबाच्या राहणीमानाचा दर्जा ठरवला पाहिजे. म्हणून आदिवासींच्या राहणीमानाचा दर्जा अभ्यासण्यासाठी 'पाण्याची सुविधा' किंवा 'पाण्याची पुरेशी उपलब्धता' हा निकष विचारात घेतला आहे. तक्ता क्र. ३ मध्ये सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबापैकी किती कुटुंबांना पिण्याचे आणि वापराचे पाणी पुरेसे आणि वर्षभर मिळते, याची माहिती दिली आहे.

वरील तक्त्यावरून असे दिसते की, अभ्यासक्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबापैकी केवळ ४०.०० टक्के कुटुंबांना पिण्याचे आणि वापराचे पाणी वर्षभर पुरेशा प्रमाणात मिळते. पाण्याची टंचाई भासणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ६०.०० टक्के एवढे मोठे आहे. म्हणून राहणीमानाच्या 'पाण्याची सुविधा' या निकषानुसार चांगले राहणीमान असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण ४०.०० टक्के एवढे अल्प आहे. तर निकृष्ट राहणीमान असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ६०.०० टक्के एवढे मोठे आहे.

एकेका जमातीचा स्वतंत्रपणे विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की, ढोरकोळी या जमातीतील सर्व कुटुंबांना पिण्याचे आणि वापराचे पाणी वर्षभर पुरेशा प्रमाणात मिळते. कातकरी जमातीतील केवळ १.६६ टक्के कुटुंबांनाच वर्षभर पुरेसे पाणी मिळते. या जमातीतील ९८.३४ टक्के कुटुंबांना वर्षातील काही महिने पाण्याची टंचाई जाणवते. कातकरी जमाती व्यतिरिक्त इतर सर्वच जमातीतील बहुसंख्य आदिवासी कुटुंबांना वर्षातील काही महिने पाण्याच्या टंचाईला तोंड द्यावे लागत

तक्ता क्रमांक – ३

| अ.क्र. | जमातीचे नाव | वर्षभर पाणी उपलब्ध असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या | सर्व्हेक्षण केलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | महादेव कोळी | 22 | 60 | 36.66 |
| 2 | ढोर कोळी | 60 | 60 | 100.00 |
| 3 | कातकरी | 01 | 60 | 1.66 |
| 4 | वारली | 12 | 60 | 20.00 |
| 5 | कोकणा | 34 | 60 | 56.66 |
| 6 | म ठाकूर | 29 | 60 | 48.33 |
| 7 | क ठाकूर | 10 | 60 | 16.66 |
| | **एकूण** | **168** | **420** | **40.00** |

*(१) संदर्भः प्राथमिक सर्व्हेक्षण*

*(२) स्तंभ क्रमांक ५ मधील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका विशिष्ट जमातीतील वर्षभर पाणी उपलब्ध असणाऱ्या कुटुंबांचे त्याच एका विशिष्ट जमातीतील सर्व्हेक्षण केलेल्या एकूण कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

असल्याचे वरील तक्त्यावरून दिसून येते. आदिवासींच्या पाहणीत असे आढळले की, बहुसंख्य आदिवासींना पावसाळ्यात गढूळ पाणी प्यावे लागते. तसेच उन्हाळ्यात अशुद्ध व काहीसे शेवाळलेले पाणी प्यावे लागते. त्यामुळे विविध आजारांना आदिवासींना तोंड द्यावे लागते.

### ४ 'भांडी, कपडे सुविधा' निकष

ज्या कुटुंबांच्या घरात पुरेशी भांडी असतील आणि पुरेसे कपडे (अंगावरील कपडे, चादरी, गोधडी, रग इत्यादी) वापरण्यास मिळत असतील तर त्या कुटुंबांचा राहणीमानाचा दर्जा चांगला आहे, असे मानले जाते. म्हणून आदिवासींच्या राहणीमानाचा दर्जा अभ्यासण्यासाठी 'भांडी, कपडे सुविधा' निकष विचारात घेतला आहे. तक्ता क्र. ४ मध्ये सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबांपैकी किती कुटुंबांजवळ पुरेशी भांडी आणि कपडे आहेत, याची माहिती दिली आहे.

वरील तक्त्यावरून असे दिसते की, अभ्यास क्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबांपैकी केवळ ७.६१ टक्के कुटुंबाजवळच भांडी आणि कपडे पुरेशा प्रमाणात आहेत. उर्वरित ९२.३९ टक्के कुटुंबाकडे भांडी आणि कपडे पुरेशा प्रमाणात नाहीत. म्हणून राहणीमानाच्या 'भांडी व कपडे सुविधा' या निकषानुसार चांगले राहणीमान असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण केवळ ७.६१ टक्के इतकेच आहे. तर राहणीमानाचा दर्जा निकृष्ट असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण मोठे म्हणजे ९२.३९ टक्के इतके आहे.

एकेका जमातीचा स्वतंत्रपणे विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की, कातकरी या जमातीतील एकाही आदिवासी कुटुंबाजवळ पुरेशी भांडी आणि कपडे नाहीत. ढोरकोळी या जमातीतील १.६६ टक्के कुटुंबांजवळ पुरेशी भांडी व कपडे आहेत. तर या जमातीतील ९८.३४ टक्के कुटुंबाकडे पुरेशी

तक्ता क्रमांक - ४

| अ.क्र. | जमातीचे नाव | भांडी व कपडे पुरेशा प्रमाणात असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या | सर्व्हेक्षण केलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | महादेव कोळी | 09 | 60 | 15.00 |
| 2 | ढोर कोळी | 01 | 60 | 1.66 |
| 3 | कातकरी | 00 | 60 | 0 |
| 4 | वारली | 02 | 60 | 3.33 |
| 5 | कोकणा | 06 | 60 | 10.00 |
| 6 | म ठाकूर | 06 | 60 | 10.00 |
| 7 | क ठाकूर | 08 | 60 | 13.33 |
| | **एकूण** | **32** | **420** | **7.61** |

*(१) संदर्भः प्राथमिक सर्व्हेक्षण*

*(२) स्तंभ क्रमांक ५ मधील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका विशिष्ट जमातीतील भांडी व कपडे पुरेशा प्रमाणात असणाऱ्या कुटुंबांचे त्याच एका विशिष्ट जमातीतील सर्व्हेक्षण केलेल्या एकूण कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

भांडी व कपडे नाहीत. महादेव कोळी या जमातीतील सर्व्हेक्षित ६० कुटुंबांपैकी १५.०० टक्के कुटुंबांजवळ पुरेशी भांडी व कपडे आहेत. तर ८५.०० टक्के कुटुंबांकडे पुरेशी भांडी व कपडे नाहीत. अशा प्रकारे सर्वच आदिवासी जमातीत भांडी आणि कपडे पुरेशा प्रमाणात नसणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ८५.०० टक्क्यापासून १०० टक्क्यापर्यंत आहे. म्हणून 'भांडी, कपडे सुविधा' या निकषानुसार चांगले राहणीमान असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण अत्यंत अल्प असल्याचे स्पष्ट होते.

उन्हाळ्यात जेव्हा आदिवासी घरी असतात तेंव्हा त्यांच्या अंगावर पुरेसे कपडे नसतात. पुरुष अर्धनग्नच असतात. इतर बहुसंख्य लहान मुलांच्या अंगावर तर एकही कपडा नसतो. दिवाळी, होळी सारख्या सणादिवशी आणि लग्न प्रसंगीच आदिवासींच्या अंगावर कपडे दिसतात. परंतु ही कपडेही कमी किंमतीची व हलक्या दर्जाची असतात. आदिवासी स्त्रिया अंगावर जे वस्त्र किंवा लुगडे नेसतात त्याला 'फडकी' असे म्हणतात. ही फडकी रंगीबेरंगी असतात व ती फक्त आदिवासी स्त्रियाच वापरतात. ही फडकी जुनी, विटकी झाली अथवा वापरण्यायोग्य राहिली नाहीत तर त्यापासून अंथरण्यासाठी आणि पांघरण्यासाठी गोधडी तयार करतात. या गोधड्या सुद्धा कित्येक आदिवासी कुटुंबांकडे पुरेशा प्रमाणात नसल्याचे पाहणीत दिसून आले. मोखाडा तालुक्यातील अतिदुर्गम भागातील काही आदिवासी पाड्यावर प्रस्तुत अभ्यासकाला अनेक रात्री मुक्कामास रहावे लागले. थंडीच्या दिवसातील त्या मुक्कामात बहुसंख्य आदिवासी आपापल्या घरासमोर शेकोट्या पेटवून त्याभोवती झोपत असल्याचे आढळून आले.

### 'वीज सुविधा' निकष

घरात विजेची सुविधा उपलब्ध असेल तर मनुष्याला चांगल्या प्रकारचे जीवन जगता येते. म्हणून आदिवासींच्या राहणीमानाचा दर्जा अभ्यासण्यासाठी

'वीज सुविधा' हा निकष विचारात घेतला आहे. तक्ता क्र. ५ मध्ये सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबापैकी किती कुटुंबांच्या घरी विजेची सुविधा आहे, याची माहिती दिली आहे.

अभ्यास क्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबांपैकी ४९.७६ टक्के कुटुंबाकडे विजेची सुविधा आहे. तर ५०.२४ टक्के कुटुंबाकडे वीज सुविधा नाही. म्हणून राहणीमानाच्या 'विजेची सुविधा' या निकषानुसार चांगले राहणीमान असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण ४९.७६ टक्के इतके आहे. तर निकृष्ट राहणीमान असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ५०.२४ टक्के इतके आहे.

एकेका जमातीचा स्वतंत्रपणे विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की, वीज सुविधा असणाऱ्या कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण महादेव कोळी व कोकणा या जमातीत आहे. या जमातीतील प्रत्येकी ७३.३३ टक्के कुटुंबाकडे वीज आहे. तर या जमातीतील प्रत्येकी २६.६७ टक्के कुटुंबाकडे वीज सुविधा नाही. वीज सुविधा नसणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण सर्वात जास्त ढोरकोळी (७८.३४ टक्के) आणि क ठाकूर (७६.६७ टक्के) या जमातीत आहे. अशा प्रकारे विविध जमातीत विजेची सुविधा नसणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण मोठे असल्याने 'वीज सुविधा' या निकषानुसार चांगले राहणीमान असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण अत्यंत कमी आहे.

तक्ता क्रमांक - ५

| अ.क्र. | जमातीचे नाव | वीज सुविधा असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या | सर्व्हेक्षण केलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | महादेव कोळी | 44 | 60 | 73.33 |
| 2 | ढोर कोळी | 13 | 60 | 21.66 |
| 3 | कातकरी | 27 | 60 | 45.00 |
| 4 | वारली | 33 | 60 | 55.00 |
| 5 | कोकणा | 44 | 60 | 73.33 |
| 6 | म ठाकूर | 34 | 60 | 56.66 |
| 7 | क ठाकूर | 14 | 60 | 23.33 |
| | **एकूण** | **209** | **420** | **49.76** |

(१) *संदर्भ: प्राथमिक सर्व्हेक्षण*

(२) *स्तंभ क्रमांक ५ मधील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका विशिष्ट जमातीतील वीजेची सुविधा असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे त्याच एका विशिष्ट जमातीतील सर्व्हेक्षण केलेल्या एकूण कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

तालुक्यातील दुर्गम भागात सर्व्हेक्षणासाठी फिरत असताना प्रस्तुत अभ्यासकाला रस्त्याच्या कडेला विजेचे खांब दिसून आले. परंतु पाच-सात वर्षापासून हे खांब तसेच पडून असून अद्याप या खांबावरून विजेची सोय पुरवली जात नसल्याचे तेथील आदिवासींनी सांगितले. तसेच विजेची सुविधा देण्यासाठी प्रत्येक आदिवासी कुटुंबाकडून पाच वर्षांपूर्वीच पाचशे रूपये घेतल्याचे आदिवासींनी

मुलाखतीत सांगितले. तसेच ज्या आदिवासी गावात आणि पाड्यावर शासनाची वीज सुविधा पोहचली आहे तेथील काही आदिवासींना गरीबीमुळे या सुविधेचा लाभ घेता येत नसल्याचे पाहणीत दिसून आले.

**'गुंतवणूक' निकष**

कुटुंबाची गुंतवणूक किती आणि कशा प्रकारची आहे यावरून सुद्धा कुटुंबाच्या राहणीमानाची कल्पना येते. म्हणून आदिवासींच्या राहणीमानाचा दर्जा अभ्यासण्यासाठी 'गुंतवणूक' हा निकष विचारात घेतला आहे. तक्ता क्र. ६ मध्ये सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबापैकी किती कुटुंबांनी राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे, बँकेतील मुदत बंद ठेवी इत्यादी मध्ये गुंतवणूक केली आहे, याची माहिती दिली आहे.

अभ्यासक्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबांपैकी केवळ ३.८० टक्के कुटुंबांनी राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे, मुदत बंद ठेवी इत्यादी मध्ये गुंतवणूक केली आहे. गुंतवणूक करू न शकलेल्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण ९६.६० टक्के एवढे मोठे आहे. म्हणून राहणीमानाच्या गुंतवणूक या निकषानुसार चांगले राहणीमान असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण केवळ ३.८० टक्के एवढेच आहे.

एकेका जमातीचा स्वतंत्रपणे विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की, ढोरकोळी आणि कातकरी इत्यादी जमातीत गुंतवणूक केलेल्या कुटुंबांचे प्रमाण शून्य आहे. वारली आणि म ठाकूर या जमातीत गुंतवणूक केलेल्या कुटुंबांचे प्रमाण प्रत्येकी १.६६ टक्के इतके आहे. कोकणा जमातीत हे प्रमाण ३.३३ टक्के आहे. महादेव कोळी आणि क ठाकूर या जमातीत हे प्रमाण प्रत्येकी १०.०० टक्के इतके आहे.

तक्ता क्रमांक – ६

| अ.क्र. | जमातीचे नाव | गुंतवणूक केलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या | सर्व्हेक्षण केलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | महादेव कोळी | 06 | 60 | 10.00 |
| 2 | ढोर कोळी | 0 | 60 | 0 |
| 3 | कातकरी | 0 | 60 | 0 |
| 4 | वारली | 01 | 60 | 01.66 |
| 5 | कोकणा | 02 | 60 | 03.33 |
| 6 | म ठाकूर | 01 | 60 | 01.66 |
| 7 | क ठाकूर | 06 | 60 | 10.00 |
| | **एकूण** | **16** | **420** | **3.80** |

*(१) संदर्भः प्राथमिक सर्व्हेक्षण*

*(२) स्तंभ क्रमांक ५ मधील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका विशिष्ट जमातीतील गुंतवणूक केलेल्या आदिवासी कुटुंबांचे त्याच एका विशिष्ट जमातीतील सर्व्हेक्षण केलेल्या एकूण कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

## 'पैशातील उत्पन्न' निकष

राहणीमानाचा दर्जा ठरविण्यासाठी पैशातील उत्पन्न हा महत्त्वाचा निकष आहे. कुटुंबाला पुरेसे उत्पन्न मिळत नसेल तर त्या कुटुंबाला जीवनावश्यक गरजा सुद्धा भागवता येत नाहीत. त्यामुळे राहणीमानाचा दर्जा निकृष्ट राहतो. म्हणून आदिवासींच्या राहणीमानाचा दर्जा अभ्यासण्यासाठी 'पैशातील उत्पन्न' हा निकष विचारात घेतला आहे. त्यासाठी उत्पन्नाची वार्षिक मर्यादा रूपये ५०,००० विचारात घेतली आहे. ज्या कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न रूपये ५०,००० पेक्षा जास्त आहे, त्या कुटुंबांचा राहणीमानाचा दर्जा चांगला असतो असे गृहित धरले आहे. तक्ता क्र. ७ मध्ये सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबापैकी किती कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न ५०,००० रूपयापेक्षा जास्त आहे, त्याची माहिती दिली आहे.

अभ्यासक्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबांपैकी केवळ ५.४७ टक्के कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न रूपये ५०,००० पेक्षा जास्त आहे. बहुसंख्य (९४.५३ टक्के) कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न रूपये ५०,००० पेक्षा कमी आहे. म्हणून राहणीमानाच्या 'पैशातील उत्पन्न' या निकषानुसार चांगले राहणीमान असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण ५.४७ टक्के एवढेच अल्प आहे.

एकेका जमातीचा स्वतंत्रपणे विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की, रूपये ५०,००० पेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ढोरकोळी आणि वारली या जमातीत शून्य इतके आहे. कातकरी या जमातीत हे प्रमाण १.६६ टक्के तर कोकणा जमातीत हे प्रमाण ३.३३ टक्के आहे. क ठाकूर जमातीत रूपये ५०,००० पेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण १३.३३ टक्के इतके

तक्ता क्रमांक – ७

| अ.क्र. | जमातीचे नाव | रू. ५०,००० पेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या | सर्व्हेक्षण केलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | महादेव कोळी | 07 | 60 | 11.66 |
| 2 | ढोर कोळी | 0 | 60 | 0 |
| 3 | कातकरी | 01 | 60 | 01.66 |
| 4 | वारली | 0 | 60 | 0 |
| 5 | कोकणा | 02 | 60 | 03.33 |
| 6 | म ठाकूर | 05 | 60 | 08.33 |
| 7 | क ठाकूर | 08 | 60 | 13.33 |
| | **एकूण** | **23** | **420** | **5.47** |

*(१) संदर्भ: प्राथमिक सर्व्हेक्षण*

*(२) स्तंभ क्रमांक ५ मधील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका विशिष्ट जमातीतील रूपये ५०,००० पेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे त्याच एका विशिष्ट जमातीतील सर्व्हेक्षण केलेल्या एकूण कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

आहे. तर महादेव कोळी या जमातीत हे प्रमाण ११.६६ टक्के इतके आहे. अशा प्रकारे वार्षिक ५०,००० रूपयापेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण विविध जमातीत शून्य टक्क्यापासून १३ टक्क्यापर्यंत आहे. त्यामुळे चांगले राहणीमान असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाणही अत्यंत कमी आहे.

## 'करमणूक सुविधा' निकष

व्यक्तीला किंवा कुटुंबाला पुरेशा करमणूक सुविधांचा उपभोग घेता येत असेल तर त्या व्यक्तीचा किंवा कुटुंबांचा राहणीमानाचा दर्जा चांगला आहे, असे मानले जाते. म्हणून आदिवासींच्या राहणीमानाचा दर्जा अभ्यासण्यासाठी 'करमणूक सुविधा' हा निकष विचारात घेतला आहे. करमणूक साधनामध्ये रेडिओ, टी.व्ही. टेपरेकॉर्डर, बाजा इत्यादी आदिवासींकडे आढळून आलेल्या साधनांचा समावेश केला आहे. तक्ता क्र. ८ मध्ये अभ्यासक्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबांपैकी किती कुटुंबाजवळ वर उल्लेख केलेल्या करमणूक सुविधा आहेत, याची माहिती दिली आहे.

अभ्यासक्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबांपैकी केवळ १३.८० टक्के कुटुंबांकडे रेडिओ, टी.व्ही. बाजा इत्यादी करमणुकीच्या सुविधा आहेत. ८६.२० टक्के कुटुंबांकडे करमणूकीच्या कोणत्याही सुविधा नाहीत. म्हणून राहणीमानाच्या 'करमणूक सुविधा' या निकषानुसार चांगले राहणीमान असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण अत्यंत अल्प आहे.

एकेका जमातीचा स्वतंत्रपणे विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की, कातकरी आणि वारली या जमातीतील प्रत्येकी केवळ ५.०० टक्केच कुटुंबांकडे करमणूक सुविधा आहेत. ढोरकोळी जमातीतील ६.६६ टक्के कुटुंबांकडे या सुविधा आहेत. महादेव कोळी, कोकणा आणि म ठाकूर या जमातीतील प्रत्येकी १८.३३ टक्के कुटुंबाकडे करमणुकीच्या सुविधा आहेत. क ठाकूर जमातीतील २५.०० टक्के कुटुंबांजवळ करमणुकीच्या सुविधा आहेत. अशा प्रकारे सर्वच जमातीत करमणूक सुविधा असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण अत्यंत अल्प असल्याचे दिसते.

तक्ता क्रमांक – ८

| अ.क्र. | जमातीचे नाव | करमणूक सुविधा असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या | सर्व्हेक्षण केलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | महादेव कोळी | 11 | 60 | 18.33 |
| 2 | ढोर कोळी | 04 | 60 | 6.66 |
| 3 | कातकरी | 03 | 60 | 5.00 |
| 4 | वारली | 03 | 60 | 5.00 |
| 5 | कोकणा | 11 | 60 | 18.33 |
| 6 | म ठाकूर | 11 | 60 | 18.33 |
| 7 | क ठाकूर | 15 | 60 | 25.00 |
| | **एकूण** | **58** | **420** | **13.80** |

*(१) संदर्भः प्राथमिक सर्व्हेक्षण*

*(२) स्तंभ क्रमांक ५ मधील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका विशिष्ट जमातीतील करमणूक सुविधा असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे त्याच एका विशिष्ट जमातीतील सर्व्हेक्षण केलेल्या एकूण कुटुंबांशी असणारे शेकडा प्रमाण दर्शविते.*

## 'स्व–मालकीच्या वाहतूक साधनांची उपलब्धता'

ज्या कुटुंबांजवळ स्वतःच्या मालकीची वाहतूक साधने असतात त्या कुटुंबांचा राहणीमानाचा दर्जा चांगला मानला जातो. म्हणून आदिवासींच्या राहणीमानाचा दर्जा कसा आहे ते पाहण्यासाठी 'स्व मालकीच्या वाहतूक साधनांची उपलब्धता' हा निकष घेतला आहे. वाहतूक साधनामध्ये सायकल, मोटार सायकल, जीपगाडी इत्यादी आदिवासीकडे आढळून आलेल्या साधनांचा विचार केला आहे. तक्ता क्र. ९ मध्ये सर्व्हेक्षण केलेल्या ४२० आदिवासी कुटुंबांपैकी किती कुटुंबांकडे स्वतःच्या मालकीची वाहतुकीची साधने आहेत, याची माहिती दिली आहे.

अभ्यासक्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबांपैकी केवळ २.६१ टक्के कुटुंबाजवळ स्वतःच्या मालकीची वाहतूकीची साधने आहेत. तर ९७.३९ टक्के आदिवासी कुटुंबांजवळ स्वतःच्या मालकीची वाहतूकीची साधने नाहीत. म्हणून राहणीमानाच्या 'स्व मालकीच्या वाहतूक साधनांची उपलब्धता' या निकषानुसार चांगले राहणीमान असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण २.६१ टक्के एवढे अल्प आहे.

एकेका जमातीचा स्वतंत्रपणे विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की, महादेव कोळी जमातीतील १०.०० टक्के कुटुंबांकडे वाहतूकीची साधने आहेत. तर या जमातीतील ९०.०० टक्के कुटुंबांजवळ वाहतुकीची साधने नाहीत. ढोरकोळी, कातकरी, वारली, कोकणा आणि म ठाकूर जमातीतील एकाही कुटुंबाकडे स्वतःच्या मालकीची वाहतुकीची साधने नाहीत.

तक्ता क्रमांक – ९

| अ.क्र. | जमातीचे नाव | वाहतूक साधने असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या | सर्व्हेक्षण केलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | महादेव कोळी | 06 | 60 | 10.00 |
| 2 | ढोर कोळी | 0 | 60 | 0 |
| 3 | कातकरी | 0 | 60 | 0 |
| 4 | वारली | 0 | 60 | 0 |
| 5 | कोकणा | 0 | 60 | 0 |
| 6 | म ठाकूर | 0 | 60 | 0 |
| 7 | क ठाकूर | 05 | 60 | 8.33 |
| | एकूण | 11 | 420 | 2.61 |

*(१) संदर्भः प्राथमिक सर्व्हेक्षण*

*(२) स्तंभ क्रमांक ५ मधील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका विशिष्ट जमातीतील स्वतःची वाहतुकीची साधने असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे त्याच एका विशिष्ट जमातीतील सर्व्हेक्षण केलेल्या एकूण कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

## ‘व्यसनाधिनता’ निकष

व्यसनाधिनता हा सुद्धा राहणीमानाचा दर्जा ठरविणारा महत्वाचा निकष आहे. कारण व्यसनाधिनतेमुळे कुटुंबातील कर्त्या व्यक्तींचे किंवा कुटुंब प्रमुखांचे मुलाबाळांच्या शिक्षणाकडे, आरोग्याकडे, आहाराकडे दुर्लक्ष होते. उत्पन्नाचा काही हिस्सा दारू, तंबाखू इत्यादी सारख्या बाबींवर खर्च झाल्याने पुरेशा जीवनावश्यक वस्तू खरेदी करता येत नाहीत. त्यामुळे अशा कुटुंबांचा राहणीमानाचा दर्जा निकृष्ट राहतो. म्हणून आदिवासींच्या राहणीमानाचा दर्जा अभ्यासण्यासाठी ‘व्यसनाधिनता’ हा निकष विचारात घेतला आहे. तक्ता क्र. १० मध्ये सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबांपैकी किती कुटुंबे निर्व्यसनी आहेत याची माहिती दिली आहे.

अभ्यासक्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबांपैकी केवळ २.१४ टक्के कुटुंबे निर्व्यसनी आहेत. दारू, तंबाखू इत्यादी व्यसने असलेल्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण ९७.८६ टक्के एवढे मोठे आहे.

एकेका जमातीचा स्वतंत्रपणे विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की, वारली आणि म ठाकूर या जमातीत निर्व्यसनी कुटुंबांचे प्रमाण प्रत्येकी ५.०० टक्के आहे. तर या जमातीतील प्रत्येकी ९५.०० टक्के कुटुंबे व्यसनी आहेत. महादेव कोळी, ढोरकोळी आणि क ठाकूर या जमातीत निर्व्यसनी कुटुंबांचे प्रमाण शून्य आहे.

तक्ता क्रमांक – १०

| अ.क्र. | जमातीचे नाव | निर्व्यसनी आदिवासी कुटुंबांची संख्या | सर्व्हेक्षण केलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | महादेव कोळी | 0 | 60 | 0 |
| 2 | ढोर कोळी | 0 | 60 | 0 |
| 3 | कातकरी | 01 | 60 | 1.66 |
| 4 | वारली | 03 | 60 | 5.00 |
| 5 | कोकणा | 02 | 60 | 3.33 |
| 6 | म ठाकूर | 03 | 60 | 5.00 |
| 7 | क ठाकूर | 0 | 60 | 0 |
| | **एकूण** | **09** | **420** | **2.14** |

*(१) संदर्भः प्राथमिक सर्व्हेक्षण*

*(२) स्तंभ क्रमांक ५ मधील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका विशिष्ट जमातीतील निर्व्यसनी कुटुंबांचे त्याच एका विशिष्ट जमातीतील सर्व्हेक्षण केलेल्या एकूण कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

## ‘नोकरदार कुटुंबे’ निकष

कुटुंबात बऱ्यापैकी उत्पन्न देणाऱ्या पदावर नोकरी करणाऱ्या व्यक्ती असतील तर त्या कुटुंबाचा राहणीमानाचा दर्जा चांगला असतो. कुटुंबात नोकरी करण्याऱ्या व्यक्ती असतील तर घड्याळ, फर्निचर, मिक्सर, कुकर, गॅसची शेगडी, चांगली कपडे, स्वयंचलित दुचाकी वाहन इत्यादी वस्तू कुटुंबाकडून उपभोगल्या जातात. त्यामुळे राहणीमानाचा दर्जा

चांगला राहतो. म्हणून आदिवासींच्या राहणीमानाचा दर्जा अभ्यासण्यासाठी नोकरदार कुटुंबे हा निकष विचारात घेतला आहे. तक्ता क्र. ११ मध्ये सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबांपैकी किती कुटुंबात नोकरदार व्यक्ती आहेत, याची माहिती दिली आहे.

तक्ता क्रमांक - ११

| अ.क्र. | जमातीचे नाव | नोकरदार आदिवासी कुटुंबांची संख्या | सर्व्हेक्षण केलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | महादेव कोळी | 07 | 60 | 11.66 |
| 2 | ढोर कोळी | 01 | 60 | 1.66 |
| 3 | कातकरी | 0 | 60 | 0 |
| 4 | वारली | 02 | 60 | 3.33 |
| 5 | कोकणा | 03 | 60 | 5.00 |
| 6 | म ठाकूर | 03 | 60 | 5.00 |
| 7 | क ठाकूर | 06 | 60 | 10.00 |
| | **एकूण** | **22** | **420** | **5.23** |

(१) *संदर्भ: प्राथमिक सर्व्हेक्षण*

(२) *स्तंभ क्रमांक ५ मधील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका विशिष्ट जमातीतील नोकरदार व्यक्ती असलेल्या आदिवासी कुटुंबांचे त्याच एका विशिष्ट जमातीतील सर्व्हेक्षण केलेल्या एकूण कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

वरील तक्त्यावरून असे दिसते की, अभ्यासक्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबांपैकी केवळ ५.२३ टक्के कुटुंबात नोकरदार व्यक्ती आहेत. बहुसंख्य (९४.७७ टक्के) आदिवासी कुटुंबांत एकही नोकरदार व्यक्ती नाही. सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबापैकी केवळ ५.२३ टक्के कुटुंबांचाच राहणीमानाचा दर्जा चांगला आहे. कारण या ५.२३ टक्के कुटुंबांतच नोकरदार व्यक्ती आहेत. उर्वरित कुटुंबांत एकही नोकरदार व्यक्ती नाही. म्हणून त्या कुटुंबांचा राहणीमानाचा दर्जा निकृष्ट आहे.

एकेका जमातीचा स्वतंत्रपणे विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की, महादेव कोळी या जमातीतील सर्व्हेक्षित ६० कुटुंबांपैकी ११.६६ टक्के कुटुंबांत नोकरदार व्यक्ती आहेत. या जमातीतील ८८.३४ टक्के कुटुंबांत एकही नोकरदार व्यक्ती नाही. क ठाकूर जमातीतील १०.०० टक्के कुटुंबांत नोकरदार व्यक्ती आहेत. तर या जमातीतील ९०.०० टक्के कुटुंबात एकही नोकरदार व्यक्ती नाही. कातकरी जमातीतील सर्व्हेक्षित ६० कुटुंबांपैकी एकाही कुटुंबात नोकरदार व्यक्ती नाही. ढोरकोळी या जमातीतील सर्व्हेक्षित ६० कुटुंबापैकी १.६६ टक्के कुटुंबे नोकरदार आहेत. तर, या जमातीतील ९८.३४ टक्के कुटुंबात एकही नोकरदार व्यक्ती नाही.

**'आजारपण' निकष**

विविध रोगांमुळे येणारे आजारपण हा सुद्धा व्यक्तीच्या किंवा कुटुंबाच्या राहणीमानाचा दर्जा ठरविणारा महत्वाचा निकष आहे. व्यक्तीचे आरोग्य चांगले नसेल तर कुपोषण, बालमृत्यू, मोठ्या व्यक्तींचे मृत्यू इत्यादी समस्यांना कुटुंबाला तोंड द्यावे लागते. आजारपणामुळे किंवा विविध रोगांमुळे आरोग्य बिघडते. त्यामुळे राहणीमानाचा दर्जा निकृष्ट राहतो. म्हणून आदिवासींच्या राहणीमानाचा दर्जा अभ्यासण्यासाठी 'आजारपण' हा निकष विचारात घेतला आहे. खालील तक्तात सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबांपैकी किती कुटुंबांना वर्षभरात ढाळ -वांती, ताप - थंडी, जुलाब, डोकेदुखी इत्यादी आजारांना तोंड द्यावे लागले नाही याची माहिती दिली आहे.

तक्ता क्रमांक - १२

| अ.क्र. | जमातीचे नाव | आजारांना तोंड द्यावे न लागलेल्या कुटुंबांची संख्या | सर्व्हेक्षण केलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | महादेव कोळी | 0 | 60 | 0 |
| 2 | ढोर कोळी | 0 | 60 | 0 |
| 3 | कातकरी | 0 | 60 | 0 |
| 4 | वारली | 0 | 60 | 0 |
| 5 | कोकणा | 0 | 60 | 0 |
| 6 | म ठाकूर | 0 | 60 | 0 |
| 7 | क ठाकूर | 0 | 60 | 0 |
| | **एकूण** | **0** | **420** | **0** |

*(१) संदर्भ: प्राथमिक सर्व्हेक्षण*

अभ्यासक्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील सर्व्हेक्षित सर्व ४२० आदिवासी कुटुंबातील सदस्यांना वर्षभरात सर्व ऋतूत कोणत्या ना कोणत्या आजारांना तोंड द्यावे लागले. ताप, थंडी, मलेरिया, कावीळ, गॅस्ट्रो, ढाळ-वांती, डोकेदुखी, अशक्तपणा इत्यादी विविध आजारांशी प्रत्येक कुटुंबाला सामना करावा लागल्याचे पाहणीत आढळून आले. पावसाळ्यात ताप-थंडी, मलेरिया, जुलाब इत्यादींनी आजारी पडणाऱ्या आदिवासींचे प्रमाण खूप जास्त असते असे आदिवासींमधील काही वर्षांच्या वास्तव्यात दिसून आले.

**जमातीनुसार चांगले राहणीमान असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण**

तक्ता क्र. १३ मध्ये अभ्यासक्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील विविध जमातीतील किती कुटुंबांचे राहणीमान चांगले आहे, याची माहिती दिली आहे.

तक्ता क्रमांक - १३

| अ.क्र. | जमातीचे नाव | राहणीमानाच्या विविध 12 निकषांनुसार चांगले राहणीमान असणाऱ्या कुटुंबांची संख्या | राहणीमानाच्या विविध 12 निकषांनुसार कुटुंबांची संख्या | सर्व्हेक्षण केलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या | सर्व्हेक्षण केलेल्या आदिवासी कुटुंबांची सरासरी संख्या | चांगले राहणीमान असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | महादेव कोळी | 120 | 10.00 | 720 | 60 | 16.66 |
| 2 | ढोर कोळी | 80 | 6.66 | 720 | 60 | 11.11 |
| 3 | कातकरी | 33 | 2.75 | 720 | 60 | 4.58 |
| 4 | वारली | 58 | 4.83 | 720 | 60 | 8.05 |
| 5 | कोकणा | 107 | 8.91 | 720 | 60 | 14.86 |
| 6 | म ठाकूर | 97 | 8.08 | 720 | 60 | 13.47 |
| 7 | क ठाकूर | 79 | 6.58 | 720 | 60 | 10.97 |
| **एकूण व सरासरी** | | **574** | **47.83** | **5040** | **420** | **11.38** |

*(१) संदर्भ: प्राथमिक सर्व्हेक्षण*

*(२) स्तंभ क्रमांक ४ मधील आकडे हे स्तंभ क्रमांक ३ मधील आकड्यांना राहणीमानाच्या विविध १२ निकषांनी भागून काढले आहेत.*

*(३) प्रत्येक जमातीतील ६० कुटुंबांचा सर्व्हे केला आहे. या ६० आकड्याला राहणीमानाच्या विविध १२ निकषांनी भागून स्तंभ क्रमांक ५ मधील आकडे काढले आहेत.*

*(४) या शोधनिबंधात राहणीमानाचे १२ निकष विचारात घेतले आहेत. स्तंभ क्रमांक ५ मधील आकड्यांना या १२ आकड्याने भागून स्तंभ क्रमांक ६ मधील आकडे काढले आहेत.*

*(५) स्तंभ क्रमांक ७ मधील आकडे एका विशिष्ट जमातीतील चांगले राहणीमान असणाऱ्या कुटुंबांचे त्याच एका विशिष्ट जमातीतील सर्व्हेक्षण केलेल्या एकूण कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शवितात.*

राहणीमानाच्या विविध १२ निकषानुसार निकृष्ट राहणीमान असणाऱ्या कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण कातकरी या जमातीत असून ते ९५.४२ टक्के इतके आहे. या जमातीतील केवळ ४.५८ टक्के कुटुंबांचाच राहणीमानाचा दर्जा चांगला आहे. महादेव कोळी या जमातीतील ८३.३४ टक्के कुटुंबांचा राहणीमानाचा दर्जा निकृष्ट आहे. तर या जमातीतील १६.६६ टक्के कुटुबांचा राहणीमानाचा दर्जा चांगला आहे. सर्वच जमातीतील बहुसंख्य (८३ ते ९५ टक्क्यापर्यंत) आदिवासी कुटुंबांचा राहणीमानाचा दर्जा निकृष्ट असल्याचे वरील तक्त्यावरून स्पष्ट होते.

**राहणीमानाच्या विविध १२ निकषानुसार अभ्यासक्षेत्रातील विविध जमातीतील चांगले राहणीमान असलेल्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण**

तक्ता क्र. १४ मध्ये अन्नाचा दर्जा, निवासाचा दर्जा इत्यादी राहणीमानाच्या विविध १२ निकषानुसार अभ्यासक्षेत्रातील विविध सात जमातीतील चांगले राहणीमान असलेल्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण दर्शविले आहे.

* राहणीमानाच्या विशिष्ट निकषानुसार चांगले राहणीमान असलेल्या कुटुंबांचे सर्व्हेक्षित सर्व सात जमातीतील एकूण ४२० कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण.

* राहणीमानाच्या विविध १२ निकषानुसार चांगले राहणीमान असलेल्या कुटुंबांचे प्रमाण.

राहणीमानाच्या विविध १२ निकषानुसार सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबांपैकी चांगले राहणीमान असलेल्या कुटुंबांचे प्रमाण ११.३८ टक्के इतके आहे. म्हणजेच ८८.६२ टक्के कुटुंबांच्या राहणीमानाचा दर्जा चांगला नाही.

राहणीमानाच्या मनिवासाचा दर्जाफ आणि मआजारपणफ या निकषानुसार चांगले राहणीमान असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण शून्य आहे. मनिर्व्यसनीपणाफ या निकषानुसार २.१४ टक्के आदिवासी कुटुंबांचे राहणीमान चांगले आहे. पाणी आणि वीज या सुविधा असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण अनुक्रमे ४०.०० टक्के आणि ४९.७६ टक्के इतके आहे. पाणी आणि वीज या सुविधा वगळता इतर सुख सुविधा उपलब्ध असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण खूपच कमी असल्याने राहणीमानाचा दर्जा चांगला असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाणही अत्यंत कमी असल्याचा निष्कर्ष निघतो.

**राहणीमानाचा दर्जा उंचावण्यासाठी काही शिफारशी**

बहुसंख्य आदिवासी कुटुंबांचा राहणीमानाचा दर्जा निकृष्ट असून या कुटुंबांच्या राहणीमानाचा दर्जा

तक्ता क्रमांक - १४

| अ.क्र. | राहणीमानाचे निकष | जमातीचे नाव व चांगले राहणीमान असलेल्या कुटुंबांचे त्या त्या (विशिष्ट) जमातीतील सर्व्हेक्षण केलेल्या (प्रत्येकी 60) कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण | | | | | | | शेकडा प्रमाण * |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | महादेव कोळी | ढोर कोळी | कातकरी | वारली | कोकणा | म ठाकूर | क ठाकूर | |
| 1 | अन्नाचा दर्जा | 13.33 | 1.66 | 0 | 3.33 | 5.00 | 8.33 | 11.66 | 6.19 |
| 2 | निवास दर्जा | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 3 | पाणी सुविधा | 36.66 | 100 | 1.66 | 20.00 | 56.66 | 48.33 | 16.66 | 40.00 |
| 4 | भांडी, कपडे | 15.00 | 1.66 | 0 | 3.33 | 10.00 | 10.00 | 13.33 | 7.61 |
| 5 | वीज सुविधा | 73.33 | 21.66 | 45.00 | 55.00 | 73.33 | 56.66 | 23.33 | 49.76 |
| 6 | गुंतवणूक | 10.00 | 0 | 0 | 1.66 | 3.33 | 1.66 | 10.00 | 3.80 |
| 7 | पैशातील उत्पन्न | 11.66 | 0 | 1.66 | 0 | 3.33 | 8.33 | 13.33 | 5.47 |
| 8 | करमणूक सुविधा | 18.33 | 6.66 | 5.00 | 5.00 | 18.33 | 18.33 | 25.00 | 13.80 |
| 9 | वाहतूक साधने | 10.00 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 8.33 | 2.61 |
| 10 | निर्व्यसनीपणा | 0 | 0 | 1.66 | 5.00 | 3.33 | 5.00 | 0 | 2.14 |
| 11 | नोकरी | 11.66 | 1.66 | 0 | 3.33 | 5.00 | 5.00 | 10.00 | 5.23 |
| 12 | आजारपण | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | **सरासरी**** | **16.66** | **11.10** | **4.58** | **8.05** | **14.85** | **13.47** | **10.97** | **11.38** |

उंचावा किंवा सुधारावा यासाठी प्रस्तुत अभ्यासकाने खालीलप्रमाणे काही शिफारशी केल्या आहेत.

१) आदिवासी भागात शाळा, आश्रमशाळा, सरकारी दवाखाने व इतर अनेक शासकीय कार्यालये आहेत. या सर्व ठिकाणच्या नोकऱ्यांत आदिवासींनाच प्राधान्य देण्यात यावे. नोकऱ्या देताना विशिष्ट जमातीतील आदिवासींनाच त्या देऊ नयेत. सर्व जमातीतील आदिवासींना नोकऱ्या द्याव्यात. नोकऱ्या मिळाल्यामुळे कायमस्वरूपी उत्पन्न मिळून आदिवासींच्या राहणीमानाचा दर्जा उंचावेल.

२) जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किंमतीमुळे राहणीमानाचा दर्जा ढासळतो. म्हणून सरकारने काही वर्षापर्यंत आदिवासींना अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तू मोफत पुरवाव्यात. ग्रामीण आणि शहरी भागाच्या तुलनेत आदिवासी भागातील स्वस्त धान्य दुकानातील धान्याचे दर कमी असले तरी आदिवासी इतके गरीब आहेत की त्यांना हे कमी किंमतीचे धान्य सुद्धा खरेदी करता येत नाही. यासाठी एका कुटुंबाला पुरेल एवढे आणि चांगल्या प्रतीचे अन्नधान्य, डाळी, तेल इत्यादी सरकारने मोफत देणे आवश्यक आहे.

३) मलेरिया, ताप, थंडी, गॅस्ट्रो इत्यादी आजारामुळे आदिवासींची कार्यक्षमता कमी होते. अशक्तपणामुळे आदिवासी काही दिवस काम करू शकत नाहीत. म्हणून असे आजार उद्भवू नयेत यासाठी सरकारने प्रयत्न करावेत. आपली आरोग्य यंत्रणा कार्यक्षम बनवावी.

४) सर्व आदिवासी गावांचे व पाड्यांचे सरकारने विद्युतीकरण करावे. काही वर्षापर्यंत आदिवासींना मोफत वीजेचा पुरवठा करावा.

५) आदिवासींना कमी खर्चात चांगली घरे बांधता यावीत यासाठी शासनाने आर्थिक मदत करावी. आदिवासींच्या घराची रचना कशी असावी ते सरकारने ठरवू नये. आदिवासींना घरासाठी केवळ आर्थिक तसेच वस्तू रूपात मदत करावी. आर्थिक मदतीमुळे आदिवासींना चांगली घरे बांधता येतील. त्यामुळे घरातील व घराच्या आसपासचे वातावरण चांगले राहून रोगराईचे व आजारी पडण्याचे प्रमाण कमी होईल.

६) आदिवासी भागात भरपूर पाऊस पडत असूनसुद्धा काही गावातील आदिवासींना चार ते सहा महिने पाणी टंचाईला तोंड द्यावे लागते. यासाठी सरकारने जास्तीत जास्त बुडके, विहिरी, तलाव, बंधारे, छोटी धरणे बांधणे आवश्यक आहे.

७) आदिवासी भागात करवंदे, आंबे, काजू, भात, नागली, वरई इत्यादीचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते. म्हणून आदिवासी भागात कृषी आधारीत उद्योग क्रांती घडवून आणणे गरजेचे आहे. घरच्या घरी काही करता येणारे अगदी छोट्या स्वरूपाचे कृषी उत्पादनावर प्रक्रिया करणारे व्यवसाय करण्यास आदिवासींना प्रोत्साहन व मदत दिली तर आदिवासी भागात लहान लहान उद्योजक तयार होतील व त्यांच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ होऊन राहणीमानाचा दर्जाही उंचावू शकेल.

**समारोप**

अभ्यासक्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील चांगले राहणीमान असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण अत्यंत कमी असल्याचे वरील विविध तक्त्यांवरून स्पष्ट होते. केवळ अभ्यासक्षेत्रातील नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील बहुसंख्य आदिवासींच्या राहणीमानाचा दर्जा अत्यंत निकृष्ट आहे. महाराष्ट्रातील ज्या थोड्या आदिवासींच्या राहणीमानाचा दर्जा चांगला आहे त्या आदिवासींची चांगले राहणीमान असणाऱ्या बिगर आदिवासींशी तुलना केली तर चांगले राहणीमान असलेली आदिवासी कुटुंबे निकृष्ट राहणीमान असलेलीच ठरतात. कारण बिगर आदिवासी भागात जवळ जवळ शंभर टक्के विद्युतीकरण झाले आहे. वीजेचे भारनियमन कमी आहे. शिक्षणाचा दर्जा चांगला आहे. वाहतूक व दळवणाची साधने संख्यात्मक व गुणात्मकदृष्ट्या चांगली व पुरेशी आहेत. त्यांच्या आहाराचा, निवासाचा दर्जाही खूप चांगला आहे. तसेच आदिवासीपेक्षा बिगर आदिवासींचे प्रतिकुटुंब वार्षिक सरासरी उत्पन्नही खूप जास्त असल्याने बिगर अदिवासी कुटुंबात ज्या विविध आधुनिक आणि आरामदायी वस्तू विपूल प्रमाणात आढळून येतात तशा वस्तू चांगले राहणीमान असलेल्या आदिवासी कुटुंबात फारशा आढळून येत नाहीत. म्हणून आदिवासींची आदिवासींशी तुलना करून ठरविलेली चांगली राहणीमान असलेली आदिवासी कुटुंबे चांगले राहणीमान असलेल्या बिगर आदिवासींच्या तुलनेत निकृष्ट राहणीमान असलेलीच ठरतात. म्हणून जेव्हा आदिवासी बांधवांना चांगले राहणीमान असलेल्या बिगर आदिवासींना मिळणाऱ्या सुख सुविधा मिळतील तेव्हाच आदिवासींच्या राहणीमानाचा दर्जा उंचावला असे म्हणता येईल. म्हणून आदिवासींची सर्वांगीण प्रगती घडवून आणण्यासाठी सरकारने जोराचे प्रयत्न केले पाहिजेत.

• • •

# दुसऱ्याची जमीन खंडाने कसणाऱ्या आदिवासींच्या खंडाच्या शेतीचा अभ्यास

**प्रास्ताविक**

या शोध निबंधात ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील दुसऱ्याची शेतजमीन खंडाने कसणाऱ्या आदिवासींच्या खंडाच्या शेतीची माहिती दिली आहे. या निबंधात खंडाने शेती करणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण,खंडाचे स्वरुप (म्हणजे खंड पैशात दिला जातो की धान्यात दिला जातो.), खंडाची निश्चिती कशी होते? (म्हणजे उत्पादन विचारात घेऊन खंड ठरतो की उत्पादनाचा विचार न करता खंड ठरतो.), खंड केव्हा दिला जातो? (म्हणजे पाऊस पडण्यापूर्वी दिला जातो की पीक तयार झाल्यावर दिला जातो.) इत्यादी बाबतची माहिती दिली आहे. तसेच खंडाच्या शेतीचा उत्पादन खर्च आणि खंडाच्या शेतीपासून मिळालेले निव्वळ उत्पन्न,खंडाच्या शेतजमिनीची वैशिष्ट्ये, खंडाने शेती कसणाऱ्या आदिवासींच्या समस्या इत्यादी बाबतची माहिती थोडक्यात दिली आहे.

गरिबीमुळे आदिवासींना दुसऱ्याची शेतजमिन खंडाने कसण्यासाठी घ्यावी लागते. आदिवासींना शेतमालकाकडून खंडाने जी जमीन कसावयास मिळते तिचे धारण क्षेत्र अत्यंत लहान असते. या जमिनी निकृष्ठ आणि अडचणींच्या जागी असतात. ज्यांच्याकडे शेतीची साधने असतात त्यांनाच खंडाने जमीन कसावयास मिळते. जमीन कसणाऱ्यांनी शेतमालकाला किती खंड द्यावयाचा ते पाऊस पडण्यापूर्वी उन्हाळ्यातच ठरवले जाते. गरीब किंवा नाडलेल्या आदिवासींकडून जमीन मालक जास्त खंड घेतात. बहुसंख्य शेतमालक आपली जमीन खंडाने कसण्यासाठी एकाच हंगामापुरतीच देतात. शेतमालकांकडून खंडाने जमीन कसणाऱ्या आदिवासींना बैल,अवजारे,बी-बियाणे पुरवली जात नाहीत. तसेच मजुरीचा खर्चही खंडाने जमीन कसणाऱ्यांनाच करावा लागतो. अतिमागास जमातीतील आदिवासींना कोणी खंडाने जमीन देत नाही. नैसर्गिक आपत्तीमुळे पिक वाया गेले तरी जमीन मालक खंड माफ करत नाहीत किंवा खंड कमी करत नाहीत. खंड मोठ्या प्रमाणात द्यावा लागत असल्याने खंडाने शेती करणे परवडत नाही.आदिवासी समाजातील मोठ्या शेतकऱ्यांनी कमी प्रमाणात खंड घेतला तरच गरीब आदिवासींना खंडाने शेती करणे परवडेल. या संदर्भात आदिवासी समाजातील खंडाने जमीन देणाऱ्या मोठ्या शेतकऱ्यांचे प्रबोधन झाले पाहिजे. तरच आदिवासींकडूनच आदिवासींचे म्हणजे सधन आदिवासींकडून गरीब आदिवासींचे होणारे आर्थिक शोषण थांबेल.

**खंडाच्या शेतीबरोबरच स्वत:ची व वनखात्याची जमीन कसणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण**

उपजीविकेसाठी आदिवासी दुसऱ्याची जमीन खंडाने कसण्यासाठी घेतात. खंडाने जमीन कसणे याला आदिवासी बटईने जमीन कसणे असे म्हणतात. भूमिहीन आदिवासीप्रमाणे सीमांत आणि लहान शेतकरीही खंडाने जमीन कसतात.जमीन तुटपुंजी असल्याने आणि जमिनीतील उत्पादन ३ महिने सुद्धा पुरत नसल्याने भूमिधारी आदिवासींना सुद्धा दुसऱ्याची जमीन खंडाने कसण्यासाठी घ्यावी लागते. तक्ता क्र. १ मध्ये केवळ खंडाची शेती करणारी कुटुंबे,स्वत:ची

शेती कसणारी व खंडाची शेती करणारी कुटुंबे,वनखात्याची शेती करणारी व खंडाची शेती करणारी कुटुंबे तसेच स्वतःची,वनखात्याची व खंडाची शेती करणारी कुटुंबे यांचे प्रमाण दर्शविले आहे.

तक्ता क्रमांकः १

| अ.क्र. | घटक | कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | स्वतःची शेती असणारी आणि दुसऱ्याची जमीन खंडाने कसणारी कुटुंबे | 23 | 29.12 |
| 2 | स्वतःची शेती असणारी,वनखात्याची जमीन कसणारी आणि दुसऱ्याची जमीन खंडाने कसणारी कुटुंबे | 06 | 7.60 |
| 3 | वनखात्याची जमीन कसणारी आणि दुसऱ्याची जमीन खंडाने कसणारी कुटुंबे | 15 | 18.98 |
| 4 | केवळ दुसऱ्याची जमीन खंडाने कसणारी कुटुंबे | 35 | 44.30 |
| | एकूण | 79 | 100 |

संदर्भ : प्राथमिक सर्व्हेक्षण

वरील तक्त्यावरून असे दिसते की,केवळ भूमिहीन आदिवासीच दुसऱ्याची जमीन खंडाने कसतात असे नाही.तर स्वतःची शेती असणारी कुटुंबे सुद्धा त्यांची शेतजमीन पुरेशी नसल्याने दुसऱ्याची जमीन बटईने किंवा खंडाने कसतात.वरील तक्त्यावरून असे दिसते की,केवळ दुसऱ्याची जमीन खंडाने कसणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण मोठे असून ते ४४.३० टक्के इतके आहे.या कुटुंबांकडे स्वतःच्या मालकीची शेती नाही.वरील तक्त्यावरुन असे दिसते की,स्वतःच्या मालकीची शेती असूनही दुसऱ्याची जमीन खंडाने कसणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण २९.१२ टक्के इतके आहे.वनखात्याच्या जमिनीबरोबर दुसऱ्याची जमीन खंडाने कसणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण १८.९८ टक्के इतके आहे.तर स्वतःची ,वनखात्याची आणि खंडाची अशी तिन्ही प्रकारची शेती करणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ७.६० टक्के इतके आहे.

**जमातीनुसार खंडाने जमीन कसणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण**

तक्ता क्र. २ मध्ये दुसऱ्याची जमीन खंडाने किंवा बटईने कसणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण त्यांच्या जमातीनुसार दर्शविले आहे.

तक्ता क्रमांक : २

| अ.क्र. | जमातीचे नाव | खंडाने जमीन कसणारी कुटुंबे | कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | म.कोळी | 20 (25.31) | 60 | 33.33 |
| 2 | ढोरकोळी | 07 (8.86) | 60 | 11.66 |
| 3 | कातकरी | 06 (7.59) | 60 | 10.00 |
| 4 | वारली | 13 (16.45) | 60 | 21.66 |
| 5 | कोकणा | 18 (22.78) | 60 | 30.00 |
| 6 | मठाकूर | 05 (6.32) | 60 | 8.33 |
| 7 | क ठाकूर | 10 (12.65) | 60 | 16.66 |
| | एकूण | 79 (100) | 420 | 18.80 |

१. *संदर्भ: प्राथमिक सर्व्हेक्षण*

२. *स्तंभ क्र.३ मधील कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी खंडाने जमीन कसणाऱ्या एका जमातीतील कुटुंबांचे खंडाने जमीन कसणाऱ्या सर्व सात जमातीतील एकूण ७९ कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

३. *स्तंभ क्र.५ मधील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी खंडाने जमीन कसणाऱ्या एका विशिष्ट जमातीतील कुटुंबांचे त्याच विशिष्ट जमातीतील सर्व्हेक्षण केलेल्या एकूण कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.*

वरील तक्त्यावरुन असे दिसते की,सर्व्हेक्षण केलेल्या एकूण ४२० आदिवासी कुटुंबांपैकी खंडाने जमीन कसणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण १८.८० टक्के एवढे आहे.

विविध सात जमातींचा तुलनात्मक दृष्ट्या विचार करता वरील तक्त्यावरुन असे दिसते की,खंडाने जमीन कसणाऱ्या कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण महादेव कोळी या जमातीत असून ते २५.३१ टक्के एवढे आहे. त्या खालोखाल हे प्रमाण कोकणा या जमातीत असून त २२.७८ टक्के एवढे आहे.म ठाकूर जमातीत हे प्रमाण ६.३२ टक्के एवढे आहे.

एकेका जमातीचा स्वतंत्रपणे विचार करता असे दिसते की,महादेव कोळी जमातीतील ३३.३३ टक्के कुटुंबे खंडाने जमीन कसतात. तर या जमातीतील ६६.६७ टक्के कुटुंबे खंडाने जमीन कसत नाहीत.म ठाकूर जमातीतील ८.३३ टक्के कुटुंबे खंडाने जमीन कसतात.तर या जमातीतील ९१.६७ टक्के कुटुंबे खंडाने जमीन कसत नाहीत.

**खंडाचे स्वरुप**

तक्ता क्र. ३ मध्ये खंडाने जमीन कसणाऱ्या आदिवासी शेतकऱ्यांनी कोणत्या स्वरुपात जमीन मालकाला खंड दिला याची माहिती दिली आहे.

तक्ता क्र. - ३

| अ.क्र. | जमातीचे नाव | खंडाचे स्वरुप व आदिवासी कुटुंबांची संख्या | | | एकूण कुटुंबे |
|---|---|---|---|---|---|
| | | पैसे | धान्य | पैसे व धान्य | |
| 1 | महादेव कोळी | 11 | 06 | 03 | 20 |
| 2 | ढोर कोळी | 03 | 01 | 03 | 07 |
| 3 | कातकरी | 04 | 0 | 02 | 06 |
| 4 | वारली | 04 | 07 | 02 | 13 |
| 5 | कोकणा | 12 | 03 | 03 | 18 |
| 6 | म ठाकूर | 02 | 01 | 02 | 05 |
| 7 | क ठाकूर | 07 | 02 | 01 | 10 |
| | **एकूण** | **43 (54.44)** | **20 (25.31)** | **16 (20.25)** | **79 (100)** |

१. *संदर्भ: प्राथमिक सर्व्हेक्षण*

२. *कंसातील आकडे टक्केवारी दर्शवितात.*

वरील तक्त्यावरुन असे दिसते की,खंडाने जमीन कसणाऱ्या ५४.४४ टक्के आदिवासी कुटुंबांनी जमीन मालकांना पैशात खंड दिला असून २५.३१ टक्के कुटुंबांनी धान्याच्या स्वरुपात खंड दिला आहे.तर २०.२५ टक्के कुटुंबांनी पैसे व धान्य अशा दोन्ही स्वरुपात खंड दिला आहे.

## खंडाची निश्चिती

खालील तक्त्यात खंड केव्हा निश्चित होतो किंवा खंड कसा ठरतो? याची माहिती दिली आहे.

तक्ता क्र. – ४

| अ.क्र. | जमातीचे नाव | खंडाची निश्चिती आणि कुटुंबांची संख्या | | एकूण कुटुंबे |
|---|---|---|---|---|
| | | उत्पादन विचारात घेऊन | उत्पादनाचा विचार न करता | |
| 1 | महादेव कोळी | 0 | 20 | 20 |
| 2 | ढोर कोळी | 0 | 07 | 07 |
| 3 | कातकरी | 0 | 06 | 06 |
| 4 | वारली | 0 | 13 | 13 |
| 5 | कोकणा | 0 | 18 | 18 |
| 6 | मठाकूर | 0 | 05 | 05 |
| 7 | क ठाकूर | 0 | 10 | 10 |
| | **एकूण** | **0** | **79 (100)** | **79 (100)** |

१. *संदर्भः प्राथमिक सर्व्हेक्षण*

२. *कंसातील आकडे टक्केवारी दर्शवितात.*

आदिवासींशी चर्चा करता असे समजून आले की, शेतजमीन कसावयास घेतल्यानंतर त्या जमिनीपासून प्रत्यक्षात किती उत्पादन झाले त्या उत्पादनावरुन खंड ठरवला जात नाही.प्रत्यक्ष उत्पादनाला सुरवात होण्यापूर्वीच खंड निश्चित केला जातो.पावसाळ्यापूर्वी उन्हाळ्यात पेरणी अगोदरच जमिनीचे क्षेत्र पाहून खंड ठरवला जातो.खंडाने जमीन कसणारे आदिवासी अत्यंत गरीब असल्याने खंड निश्चित करताना जमीन मालक त्यांच्या मताचा फारसा विचार करत नाहीत.जमीन मालक सांगेल तेवढा खंड त्यांना द्यावा लागतो.पाऊस पडला नाही किंवा अतिवृष्टी होऊन रोगराई पडून

पिकांचे नुकसान झाले तरी पूर्वी ठरलेला खंड त्यांना जमीन मालकांना द्यावाच लागता.उत्पादन अजिबात झाले नाही तरी जमीन मालक खंडाने जमीन कसणाऱ्यांकडून खंड घेतात.पुढच्या वर्षी जमीन कसावयास देऊन मागील वर्षाचा व चालू वर्षाचा खंड जमीन मालक वसूल करुन घेतात किंवा खंडाने जमीन कसणारे शेतकरी दुसरीकडे कोठेतरी कामाला राहून किंवा मजुरी करुन ठरलेली खंडाची रक्कम आणून मालकाला देतात अथवा ज्याला खंडाची बाकी द्यावयाची असते त्या जमीन मालकाकडे चाकरीस राहतात आणि मजुरी करुन खंडाची परतफेड करतात.थोडक्यात खंडाचा उत्पादन किती झाले याच्याशी काही संबंध नसतो. उत्पादन होण्यापूर्वीच अगोदर खंड ठरतो.पीक जर व्यवस्थित उगवून आले नाही तर खंडाने जमीन कसणाऱ्या आदिवासींचे मोठे नुकसान होते. त्यांनी केलेली गुंतवणुक वाया जातेच शिवाय शेतीत केलेली श्रमही वाया गेल्याने त्यांचे जगणे मुश्किल होते.त्यांना मोठ्या उपासमारीस तोंड द्यावे लागते.

### खंड दिल्याचा काळ

तक्ता क्र. ५ मध्ये अभ्यास क्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील खंडाने जमीन कसणाऱ्या ७९ आदिवासी

कुटुंबांनी जमीन मालकांना खंड केव्हा दिला याची माहिती दिली आहे.

तक्ता क्र. – ५

| अ.क्र. | जमातीचे नाव | खंड दिल्याचा काळ व त्यानुसार कुटुंबांची संख्या | | | एकूण कुटुंबे |
|---|---|---|---|---|---|
| | | पाऊस पडण्यापूर्वी | पीक तयार झाल्यावर | पाऊस पडण्यापूर्वी व पीक तयार झाल्यावर | |
| 1 | महादेव कोळी | 11 | 06 | 03 | 20 |
| 2 | ढोर कोळी | 03 | 01 | 03 | 07 |
| 3 | कातकरी | 04 | 0 | 02 | 06 |
| 4 | वारली | 04 | 07 | 02 | 13 |
| 5 | कोकणा | 12 | 03 | 03 | 18 |
| 6 | म ठाकूर | 02 | 01 | 02 | 05 |
| 7 | क ठाकूर | 07 | 02 | 01 | 10 |
| | **एकूण** | **43 (54.44)** | **20 (25.31)** | **16 (20.25)** | **79 (100)** |

*१. संदर्भ: प्राथमिक सर्व्हेक्षण   २. कंसातील आकडे टक्केवारी दर्शवितात.*

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, ५४.४४ टक्के आदिवासी कुटुंबांनी पाऊस पडण्यापूर्वी म्हणजे पेरणीपूर्वी ठरलेला खंड दिला होता.हा खंड पैशाच्या स्वरुपात दिला होता. २५.३१ टक्के कुटुंबांनी पीक तयार झाल्यानंतर खंड दिला होता.हा खंड धान्याच्या स्वरुपात होता.तर २०.२५ टक्के कुटुंबांनी ठरलेल्या खंडाचा काही भाग पाऊस पडण्यापूर्वी व काही भाग पीक तयार झाल्यानंतर दिला होता.हा खंड पैशाच्या व धान्याच्या स्वरुपात होता.

**खंडाच्या शेतीचा उत्पादन खर्च आणि खंडाच्या शेतीपासून मिळालेले निव्वळ उत्पन्न**

तक्ता क्र. ६ मध्ये खंडाच्या शेतीचा उत्पादन खर्च,शेतमालकाला दिलेला खंड आणि खंडाने जमीन कसणाऱ्यांना मिळालेले निव्वळ उत्पन्न यांची माहिती दिली आहे.खंडाने शेती करणाऱ्या १४ शेतकऱ्यांची खंडाच्या संदर्भातील माहिती खालील तक्त्यात दिली आहे.

तक्ता क्रमांक ६ चे स्पष्टीकरण थोडक्यात खालीलप्रमाणे दिले आहे.

**१.उत्पादन**

खंडाने कसावयास घेतलेल्या जमिनीपासून अत्यंत कमी उत्पादन प्राप्त होते.कारण शेतजमिनीचे तुकडे अत्यंत लहान असतात.तक्ता क्र.४.६ असे दर्शवितो की, ०१ क्विंटल उत्पादन प्राप्त झालेल्या आदिवासी कुटुंबाची संख्या ०२ इतकी आहे. ०२ क्विंटल उत्पादन झालेल्या शेतकऱ्यांची संख्या ०२ आहे. ०३ क्विंटल उत्पादन झालेल्यांची संख्या ०४ इतकी आहे. ४ ते ४.५० क्विंटल उत्पादन झालेल्या आदिवासी शेतकऱ्यांची संख्या ०३ आहे.तर ५ ते ६ क्विंटल उत्पादन झालेल्या शेतकऱ्यांची संख्या ०२ असून ०८ क्विंटल उत्पादन झालेल्यांची संख्या फक्त ०१ आहे.

**२.उत्पादनाचा खर्च**

खंडाने कसावयास घेतलेल्या शेतीतील

तक्ता क्र. 6

खंडाच्या शेतीचा उत्पादन खर्च आणि खंडाच्या शेतीपासून मिळालेले निव्वळ उत्पन्न

| अ.क्र. | झालेले एकूण उत्पादन | | उत्पादन खर्च (रु.) | शेतमालकाला दिलेला खंड | | | एकूण खर्च (खंड+उत्पादन खर्च) (रुपये) | खंडाने जमीन कसणाऱ्यांना मिळालेले निव्वळ उत्पन्न (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | उत्पादन (क्वि.) | उत्पादनाची पैशातील किंमत (रुपये) | | धान्य (क्विं.) | पैसे | खंडाची पैशातील किंमत | | |
| 1 | 01 | 715 | 140 (19.58) | - | 250 | 250 (34.96) | 390 (54.54) | 325 (45.45) |
| 2 | 01 | 715 | 140 (19.58) | - | 200 | 200 (27.97) | 340 (47.55) | 375 (52.44) |
| 3 | 02 | 1430 | 325 (22.72) | - | 500 | 500 (34.96) | 825 (57.69) | 605 (42.30) |
| 4 | 02 | 1430 | 325 (22.72) | 01 | - | 715 (50.00) | 1040 (72.72) | 390 (27.27) |
| 5 | 03 | 2145 | 450 (20.97) | - | 400 | 400 (18.64) | 850 (39.62) | 1295 (61.64) |
| 6 | 03 | 2145 | 450 (20.97) | 02 | - | 1430 (66.66) | 1880 (87.64) | 265 (12.35) |
| 7 | 03 | 2145 | 450 (20.97) | - | 500 | 500 (23.31) | 950 (44.28) | 1195 (55.71) |
| 8 | 03 | 2145 | 450 (20.97) | - | 450 | 450 (20.97) | 900 (41.95) | 1245 (50.04) |
| 9 | 04 | 2860 | 600 (20.97) | 1.50 | 100 | 1172 (40.99) | 1772.50 (61.97) | 1087.50 (38.02) |
| 10 | 04 | 2860 | 600 (20.97) | - | 800 | 800 (27.97) | 1400 (48.95) | 1460 (51.04) |
| 11 | 4.50 | 3217.50 | 700 (21.75) | 2.50 | - | 1787.50 (55.55) | 2487.50 (77.31) | 730 (22.68) |
| 12 | 05 | 3575 | 850 (23.77) | 02 | - | 1430 (40.00) | 2280 (63.77) | 1295 (36.22) |
| 13 | 06 | 4290 | 1140 (26.57) | 01 | 100 | 815 (18.99) | 1955 (45.57) | 2335 (54.42) |
| 14 | 08 | 5720 | 1340 (23.42) | 2.50 | - | 1787.50 (31.25) | 3127.50 (54.67) | 2592.50 (45.32) |
| एकूण | 49.50 | 35392.50 | 7960 (22.49) | 12.50 | 3300 | 12237.50 (34.57) | 20197.50 (57.06) | 15195 (42.93) |

1. संदर्भ: प्राथमिक सर्व्हेक्षण
2. कंसातील आकडे टक्केवारी दर्शवितात.

उत्पादनाचा सरासरी खर्च २२.४९ टक्के एवढा आहे. वरील उदाहरणात उत्पादनाचा खर्च १९.५८ टक्के पासून २६.५७ टक्के एवढा असल्याचे दिसते. मोठ्या आकाराचे क्षेत्र असल्यास आणि नांगरणी,लावणी इ. कामे त्वरीत आटोपावी लागत असल्याने बाहेरचे मजूर बोलवावे लागतात.सर्व कामे कुटुंबातील सदस्यांच्या मदतीने वेळेत पूर्ण करता येत नाहीत.त्यामुळे उत्पादनाचा खर्च वाढतो.उत्पादन खर्चामध्ये बी-बियाणे,मजुरीचा खर्च,बैलाचे भाडे,अवजारे दुरुस्ती,औत हाकणाऱ्यांना मोबदला, औताचे भाडे इ. विचार केला आहे.(ज्यांच्याकडे बैल नसतात ते आदिवासी दुसऱ्यांकडून शेतीच्या कामासाठी बैल आणतात त्याचे पैसे द्यावे लागतात.याला आदिवासी बैलाची वाफ असे म्हणतात.हा स्थानिक शब्द आहे.)

### ३. एकूण खर्च

एकूण खर्चामध्ये खंडाने जमीन कसणाऱ्या आदिवासींनी जमीन मालकांना दिलेल्या खंडाची रक्कम आणि उत्पादनाचा खर्च विचारात घेतला आहे.वरील तक्त्यावर्रन असे दिसते की,खंडाने शेती कसणाऱ्यांचा किवा खंडाच्या शेतीचा एकूण उत्पादन खर्च सरासरी ५७.०६ टक्के इतका आहे.एकूण खर्च जास्त असल्याने खंडाने शेती करणे आदिवासींना फारसे परवडत नाही, हे स्पष्ट होते. वरील तक्त्यावरुन असे दिसते की खंडाने शेती कसणाऱ्यांचा एकूण खर्च ३९.६२ टक्के पासून ८७.६४ टक्के पर्यंत आहे.

### ४.शेतमालकाला दिलेला खंड

एकूण उत्पन्नाच्या सरासरी ३४.५७ टक्के इतका खंड शेतमालकाला द्यावा लागतो.वरील विविध १४ उदाहरणावरुन असे दिसते की,खंडाने जमीन कसणाऱ्यांना आपल्या मालकांना २०.९७ टक्के पासून ६६.६६ टक्के पर्यंत खंड द्यावा लागतो.याचा अर्थ सर्व आदिवासींकडून शेतमालक सारखाच खंड होत नाहीत. गरीब किंवा नाडलेल्या आदिवासींकडून अधिक खंड घेतला जातो असे आदिवासींनी चर्चेदरम्यान सांगितले.

### ५. निव्वळ उत्पन्न

खंडाने जमीन कसणाऱ्यांना शेतीपासून सरासरी ४२.९३ टक्के एवढे म्हणजे निम्म्यापेक्षा कमी निव्वळ उत्पन्न मिळाले असल्याचे वरील तक्त्यावरुन दिसून येते. वरील १४ उदाहरणांचा विचार करता असे दिसते की,खंडाने जमीन कसणाऱ्यांना शेतीपासून निव्वळ उत्पन्न १२.३५ टक्केपासून ६१.६४ टक्केपर्यंत मिळाले आहे. ४६ टक्के पर्यंत निव्वळ उत्पन्न मिळालेल्या शेतकऱ्यांची संख्या वरील उदाहरणात ०८ इतकी आहे (५७.१४ टक्के). तर ४७ ते ५० टक्के पर्यंत निव्वळ उत्पन्न मिळालेल्या शेतकऱ्यांची संख्या ०१ इतकी आहे (७.१४ टक्के). ५१ ते ५६ टक्के पर्यंत उत्पन्न मिळालेल्यांची संख्या ०४ इतकी आहे (२८.५७ टक्के). आणि ५७ ते ६१.६४ टक्के पर्यंत उत्पन्न मिळालेल्यांची संख्या ०१ इतकी आहे(७.१४ टक्के). थोडक्यात ५०.०० टक्केपेक्षा कमी निव्वळ उत्पन्न मिळालेल्यांचे प्रमाण निम्म्यापेक्षा जास्त म्हणजे ६४.२८ टक्के एवढे मोठे असल्याने खंडाने शेती करणे फारसे किफायतशीर नाही हे दिसून येते.

### खंडाच्या शेतजमिनीची वैशिष्ट्ये

खंडाच्या शेतजमिनीची आढळून आलेली काही ठळक वैशिष्ट्ये थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहेत.

### १) जमिनीचे क्षेत्र

आदिवासींना शेतमालकांकडून खंडाने जी जमीन कसावयास मिळते तिचे धारण क्षेत्र अत्यंत लहान असते. लहान-लहान आकाराचे जमिनीचे तुकडे शेतमालकाकडून कसावयास दिले जातात. जमीन एकरात किंवा गुंठ्यातसुद्धा सांगता येत नाही अशा आकाराची किंवा एवढी लहान असते.

### २) जमिनीचा दर्जा

शेतमालकांकडून खंडाने दिली जाणारी जमीन ही स्वतः शेतमालक कसत असलेल्या जमिनीच्या तुलनेत खूपच निकृष्ट आणि अडचणींच्या जागी असते.तसेच काही जमिनीचे तुकडे आदिवासी वस्तीपासून दूरवर असतात.म्हणूनच अशा जमिनी कसण्यासाठी इतरांना दिल्या जातात.

### ३) परिचयाच्या व विश्वासू व्यक्तींनाच खंडाने जमीन

आपली जमीन खंडाने कसावयास देणारे शेतमालक कोणालाही जमीन कसण्यास देत नाहीत. आपल्या पाड्यावरील किंवा नजिकच्या पाड्यावरील परिचयाच्या विश्वासू व्यक्तींना किंवा नातेवाईकानांच जमीन कसावयास देतात.तशा व्यक्ती मिळाल्या नाहीत तर जमीन पडीक ठेवतात. परंतु कसण्यास देत नाहीत.

### ४) मागासलेल्या जमातींना कमी प्राधान्य

कातकरी आणि ढोरकोळी या जमातींना इतर जमाती हीन समजतात. तुच्छ लेखतात. या जमातीत व्यसनाधिनतेचे प्रमाण जास्त आहे.त्यामुळे इतर जमातीकडून या जमातीतील आदिवासींना खंडाने जमीन कसण्यास मिळत नाही.

### ५) प्रतिष्ठा, मान-सन्मान

खंडाने जमीन कसूनही फारसे उत्पन्न मिळत नाही.तरीही आदिवासी खंडाने जमीन कसावयास तयार होतात.कारण मोठ्या शेतकऱ्यांकडून खंडाने जमीन कसावयास मिळणे हे गरिब आदिवासी प्रतिष्ठेचे लक्षण समजतात. कारण समाजातील चांगल्याच लोकांना खंडाने जमीन कसावयास मिळत असल्याने फारसा फायदा होत नसला तरी गरीब आदिवासी जमीन कसावयास तयार होतात.

### ६) शेतीची साधने असणाऱ्यांनाच खंडाने जमीन

ज्यांच्याकडे बैल,नांगर इ.शेतीची साधने असतात.तसेच कुटुंबात काम करण्यायोग्य माणसे असतात अशाच आदिवासी कुटुंबांना खंडाने जमीन कसण्यास मिळते. त्यामुळे गरीब आदिवासी किंवा ज्यांच्याकडे शेतीची अवजारे नसतात अशा आदिवासींना खंडाने जमीन कसावयास मिळत नाही.

### ७) तोंडी करार

खंडाने जमीन कसावयास घेणारे आदिवासी आणि जमिनीचे मालक यांच्यात खंडाबाबत तोंडी करार होतात. जमिनीचे मालक आणि खंडाने जमीन कसावयास इच्छुक असणारे शेतात जातात. जमीन कसू इच्छिणाऱ्यांना शेतमालकाकडून जमीन दाखवली जाते आणि त्यांना 'माझी एवढी जमीन आहे. एवढे पैसे व धान्य द्यावे लागतील' असे सांगितले जाते.

### ८) खंडाचे स्वरुप

खंड पैशात द्यावयाचा कि धान्यात की दोन्ही स्वरुपात हे शेतमालक आणि खंडाने जमीन कसणारे या दोहोंच्या संबंधावर ठरत असते.काही शेतमालक खंड धान्यात घेतात. तर काही पैशात घेतात. तर काही दोन्हींच्या स्वरुपात घेतात.

## ९) खंडाची निश्चिती

जमीन कसणाऱ्यांनी शेतमालकाला किती खंड द्यावयाचा ते पाऊस पडण्यापूर्वी उन्हाळ्यात (मार्च ते मे महिन्यापर्यंत) ठरवले जाते. उत्पादन किती झाले यावर खंड किंवा खंडाचे प्रमाण ठरत नाही.उत्पादन होण्यापूर्वीच खंड निश्चित केला जातो.जमीन कसू इच्छिणाऱ्यांना जमीन मालक आपली जमीन किंवा जमिनीचे क्षेत्र दाखवतात आणि खंड निश्चित करतात.जमीन मालकाने सांगितलेला किंवा ठरलेला खंड बिनकिफायतशीर किंवा अधिक वाटत असेल तर जमीन कसू इच्छिणारे खंड कमी करण्याची विनंती करतात.ही विनंती मानली नाही तर काही गरिब आदिवासी खंडाने जमीन कसण्यास नकार देतात.तर काही गरीब आदिवासींना खंड जास्त द्यावा लागतो असे वाटत असूनही नाईलाजाने जमीन कसावयास तयार होतात.

पैसे व धान्य दोन्ही स्वरुपात खंडाची रक्कम ठरली असेल तर काही शेतमालक तोंडी करार झाल्यानंतर पेरणीपूर्वीच पैशात ठरवलेला खंड घेतात आणि धान्याच्या स्वरुपातील खंड अर्थातच मळणीनंतर घेतात.खंड केवळ पैशातच ठरवला गेला असेल तर काही शेतमालक पैशात ठरवलेला सर्व खंड पेरणीपूर्वीच घेतात.तर काही शेतमालक ठरलेल्या खंडाची निम्मी रक्कम पेरणीपूर्वी घेतात व उर्वरित रक्कम प्रत्यक्ष उत्पादन झाल्यानंतर (मळणीनंतर) घेतात.

## १०) खंड निश्चितीवर मालकांचा प्रभाव

शेतजमिनीचा खंड ठरवताना त्यावर जमीन मालकांना प्रभाव जास्त असतो. गरीब किंवा नाडलेले आदिवासी जास्त खंड द्यावयास तयार असतात. त्याचा गैरफायदा सर्वच जमीन मालक घेतात. अपेक्षेइतका खंड मिळाला नाही तर जमीन मालक जमीन पाडून ठेवतात. परंतु खंडाने कसावयास देत नाहीत.

## ११) कराराची मुदत

बहुसंख्य शेतमालक आपली जमीन खंडाने कसण्यासाठी एकाच हंगामापुरती देतात. तसेच खंडाने जमीन कसणारे आदिवासी कुळकायदा लाऊन आपली जमीन ताब्यात घेतील या भीतीपोटी शेतमालक दरवर्षी वेगवेगळ्या आदिवासींना जमिनी कसण्यासाठी देतात.सलग ५ वर्षे एकाच आदिवासी कुटुंबाला खंडाने जमीन देणाऱ्या शेतमालकांचे प्रमाण अभ्यासात केवळ ०.२.०० टक्के एवढेच असल्याचे दिसून आले.

## १२) नैसर्गिक आपत्ती व खंड

अतिवृष्टी (ओला दुष्काळ) किंवा अजिबात पाऊस न पडणे(कोरडा दुष्काळ) यामुळे पिकांचे नुकसान झाले किंवा जमिनीत काहीही उगवून आले नाही तरी ठरलेला खंड हा द्यावाच लागतो. यावर्षी पीक आले नाही तर या वर्षीचा खंड शेतमालक पुढच्या वर्षी वसूल करतात. म्हणजे चालू वर्षाचा खंड देऊन मागच्या वर्षाचाही खंड द्यावा लागतो. त्यामुळे खंडाने जमीन कसणे म्हणजे एक प्रकारे जुगारच ठरतो. या संदर्भात आदिवासींनी सांगितले की, कमी-जास्त पावसामुळे पीक वाया गेले तर ठरलेला खंड देण्यासाठी आम्हांला दुसरीकडे मजुरीस जावे लागते.मजुरी करुन खंडाची रक्कम आम्ही फेडतो. तसे केले नाही तर पुन्हा खंडाने जमीन मिळत नाही आणि समाजात किंमत राहत नाही.

## १३) खंड वसुलीसाठी जबरदस्ती

आदिवासींच्या मते खंड कोणत्याही परिस्थितीत बुडवता येत नाही किंवा माफ होत नाही.उदाहरणार्थ तीन पोती खंड द्यावयाचा ठरला असेल आणि दोनच

पोती धान्य उत्पादन झाले तर ते सर्व धान्य देऊन राहिलेले एक पोते धान्य पुढच्या वर्षी जमीन कसून द्यावे लागते. काही गरीब आदिवासी शेतमालकाला खंड न देता घरी उपभोगासाठी ठेऊन घेतात.(अशा आदिवासींची संख्या अर्धा टक्केपेक्षासुद्धा कमी असते.) त्यांच्या घरी जाऊन शेतमालक सर्व धान्य जबरदस्तीने घेऊन जातात. शिवाय खंड देण्यास टाळा-टाळ केली म्हणून मारहाणही करतात.

### १४) घरच्या लोकांकडून कसवणूक

खंडाने जमीन कसणारे आदिवासी अत्यंत गरीब असतात. त्यामुळे ते बाहेरचे मजूर न घेता कुटुंबातील सदस्यांच्या मदतीने शेती करतात. मोठे क्षेत्र असेल तर काही दिवस बाहेरचे मजूर बोलावून शेतीची कामे केली जातात. परंतु खंडाने जमीन कसणाऱ्यांपैकी ९० टक्क्यापेक्षा अधिक शेतकरी बाहेरचे मजूर न लावता स्वतः शेतीत श्रम करतात.

### १५) आदाने व इतर खर्च

शेतमालकाकडून खंडाने जमीन कसणाऱ्या आदिवासींना बैल, अवजारे, बी-बियाणे पुरवली जात नाहीत.हा सर्व खर्च जमीन कसणाऱ्यांना करावा लागतो.तसेच मजुरीचा खर्चही त्यांनाच करावा लागतो.

### १६) खंडाव्यतिरिक्त इतर कृषी उत्पादनावर हक्क

खंडाने जमीन कसणारे शेतकरी नागली, वरई, भात इ.पीकाबरोबर आजूबाजूला असलेल्या मोकळ्या जागेत किंवा बांधावर करटुली व इतर रानभाज्या लावतात. काही रानभाज्या आपोआप उगवून येतात. त्यातील काही भाज्या जमीन मालकांना द्याव्या लागतात. म्हणजे धान्य किंवा पैशातील खंडाबरोबरच पालेभाज्यासुद्धा जमीन मालक मागून घेतात.

### १७) निम्म्यापेक्षा कमी उत्पन्न

शेतमालाचा उत्पादन खर्च आणि खंड वजा जाता खंडाने जमीन कसणाऱ्या आदिवासी शेतकऱ्यांना वार्षिक सरासरी निव्वळ उत्पन्न ४२.९३ टक्के एवढे म्हणजे निम्म्यापेक्षा खूपच कमी मिळते. त्यामुळे खंडाने शेती करणे फारसे किफायतशीर नाही हे लक्षात येते. शेकडेवारीच्या भाषेत जरी ४२.९३ टक्के हा आकडा मोठा वाटत असला तरी खंडाच्या शेतीपासूनचे उत्पादनच आदिवासींना अत्यंत कमी प्रमाणात प्राप्त होत असल्याने झालेल्या एकूण उत्पादनापैकी ४२.९३ टक्के उत्पादन किंवा उत्पन्न हे खूपच कमी आहे. उदा. बहुसंख्य आदिवासींना खंडाच्या शेतीपासून १ ते ३ क्विंटल एवढेच उत्पादन होते. त्यापैकी त्यांना सरासरी ४२.९३ टक्के एवढे म्हणजे ५० क्विंटल ते दीड क्विंटल एवढेच उत्पादन मिळते. या उत्पन्नातून त्यांची जेमतेम एक ते दोन महिनेच उपजीविका होते.

## ४.८ खंडाने शेती करणाऱ्या आदिवासींच्या समस्या

खंडाने शेती करणाऱ्या आदिवासींना विविध समस्यांना तोंड द्यावे लागते. या समस्यांचे स्पष्टीकरण खंडाच्या शेतजमिनीची वैशिष्ट्ये या भागात दिले आहे.तरीही थोडक्यात स्वतंत्रपणे खंडाने शेती करणाऱ्या आदिवासींच्या समस्या खालीलप्रमाणे दिल्या आहेत.

१) गरीब किंवा नाडलेल्या आदिवासींकडून जमीन मालक जास्त खंड वसूल करतात.

२) पाऊस पडण्यापूर्वी उन्हाळ्यात खंड द्यावा लागणाऱ्या आदिवासींना शेती कसण्यासाठी (बियाणे कर्जाऊ आणणे,मजुरी देणे) इ. साठी भरमसाठ व्याजाने कर्ज घ्यावे लागते. त्यामुळे त्यांचे खूपच आर्थिक नुकसान होते. त्यामुळे

खंडाने शेती करणे परवडत नाही.

३) नैसर्गिक आपत्तीमुळे पीक वाया गेले तरी जमीन मालक खंड माफ करत नाहीत किंवा खंड कमी करत नाहीत.

४) शेतमालकाकडून खंडाने जमीन कसणाऱ्या आदिवासींना बैल, अवजारे, बी-बियाणे पुरवली जात नाहीत. ही साधने ज्यांच्याकडे असतात त्यांनाच खंडाने जमीन देतात.

५) उत्पादन कमी झाले म्हणून एखाद्याने खंड देण्यास टाळा-टाळ केली तर जमीन मालक दमदाटी,मानहानी व मारहाण करतात.

६) अति मागास जमातीतील आदिवासींना कोणी खंडाने जमीन देत नाही.

**समारोप**

अशा प्रकारे गरीबीमुळे आदिवासींना मोठ्या शेतकऱ्यांकडून जमीन खंडाने कसण्यासाठी घ्यावी लागते. परंतु जमिनी निकृष्ट असल्याने आणि शेतमालकाकडून अवजारे,बैल इ. च्या स्वरुपात कोणतीही मदत मिळत नसल्याने खंडाने शेती करणे फारसे परवडत नाही. तरीसुद्धा पुरेसा रोजगार उपलब्ध नसल्याने आदिवासी खंडाने जमीन कसण्यास तयार होतात. आदिवासी समाजातील मोठ्या शेतकऱ्यांनी कमी प्रमाणात खंड घेतला तर गरीब आदिवासींना खंडाने शेती करणे किफायतशीर होईल. या संदर्भात मोठ्या शेतकऱ्यांचे प्रबोधन करणे किंवा मन वळवणे आवश्यक आहे. प्रामाणिक सामाजिक कार्यकर्ते आणि आदिवासी समाजात ज्यांना मान-सन्मान आहे अशा आदिवासींपैकीच असलेल्या पुढाऱ्यांना हे करणे शक्य आहे. तसेच खंड पाऊस पडण्यापूर्वी निश्चित न करता प्रत्यक्ष उत्पादन झाल्यानंतर निश्चित झाला पाहिजे. तोही उत्पादन खर्च विचारात घेऊन निश्चित झाला पाहिजे. म्हणजे खंडाने जमीन कसणाऱ्यांचे नुकसान होणार नाही. या संदर्भातसुद्धा कार्यकर्ते,आदिवासी पुढारी,न्यायदान करणाऱ्या पंचायतीचे पंच यांनीच मोठ्या शेतकऱ्यांचे मन वळवले पाहिजे. असे झाले तरच आदिवासींकडूनच आदिवासींचे म्हणजे सधन आदिवासींकडून गरीब आदिवासींचे जे शोषण होते ते थांबू शकेल.कारण आदिवासी ज्यांच्याकडून खंडाने जमीन कसावयास घेतात ते सर्व त्यांच्याच समाजातील म्हणजे आदिवासींपैकीच आहेत.

• • •


निवेदन

(फॉर्म ४, नियम ८ नुसार)

१. प्रकाशन स्थळ : ६४, आनंद पार्क,
पुणे - ४११ ००७.

२. प्रकाशन काळ : त्रैमासिक

३. मुद्रक, प्रकाशक, संपादक :
रामचंद्र केशव मुटाटकर

राष्ट्रीयत्व : भारतीय


पत्ता : ६४, आनंद पार्क,
पुणे - ४११ ००७.

४. स्वामीत्व : महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

मी, रा. के. मुटाटकर जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीनुसार खरा आहे.

३१ जानेवारी २०१० रा. के. मुटाटकर
प्रकाशक

## ।। संस्था-वृत्त ।।



## बहुउद्देशीय प्रशिक्षण केंद्र, कोचरे (सिंधुदुर्ग)

वरील छायाचित्र महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेच्या नव्याने बांधण्यात आलेल्या प्रशिक्षण केंद्राचे आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला तालुक्यात कोचरे या गावी समुद्र किनाऱ्यालगत निसर्गरम्य परिसरात ही टुमदार इमारत आहे.

कोचरे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच मा. श्री. लवू गावडे यांनी स्वत:ची २२ गुंठे जमीन संस्थेच्या नावे बक्षिसपत्र करुन दान केली आहे. सदर जमिनीमध्ये माजी खासदार श्री. सुरेश प्रभू स्थानिक विकास निधीतून प्रशिक्षण केंद्राची ही इमारत बांधण्यात आलेली आहे.

सदरचे प्रशिक्षण केंद्र उभारण्यात श्री. जयवंत मंत्री, सचिदानंद जाधव, लवू गावडे, योगेश प्रभू, राउळ सर, आदरणीय मीराताई जाधव व समस्त कोचरे ग्रामस्थांचे मोठे योगदान लाभले आहे.

# हाकारा अंक सूची


१९८० – १. जबरन जोत जंगल जमीन
२. आदिवासी व शिक्षण
३. आदिवासी वनसंवर्धन
४. आदिवासी साहित्य व कला
१९८१ – १. दलितांना सवलती व राखीव जागा
२. आदिवासी व आरोग्य
३. वनशेती व संवर्धन
४. रोजगार हमी योजना
१९८२ – १. धरणे व विकास
२. धरणे व विकास
३–४. जंगल व्यवस्थापन
१९८३ – १. आदिवासी व दारु
२. आदिवासींच्या सामाजिक / राजकीय चळवळी
३. प्रा. सरदार गौरव अंक
४. आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न
१९८४ – १–२ आदिवासींमधील स्वयंसेवी कार्य
३. आदिवासी स्त्री
४. आदिवासी आरोग्य व शिक्षण
१९८५ – १. आदिवासी संघटन
२. जमीन हस्तांतर
३. आदिवासी महिला
४. आदिवासी व सरकार
१९८६ – १. जंगल व धरण
२. आदिवासी कला
३. आदिवासी व वेठबिगारी
४. आदिवासी विषयक ग्रंथ : मानवशास्त्र परिचय
१९८७ – १. भटक्याविमुक्त जमातींचे प्रश्न
२. आदिवासी आणि सांस्कृतिक बदल
३–४. राष्ट्रीय वननितीचा प्रश्न
१९८८ – १. सवलती अपहरणाची समस्या
२. आदिवासी साहित्य
३.–४. आदिवासी समाज व संस्कृती
१९८९ – १–२. डॉ. वेरिअर एल्विन विशेषांक
३–४. व्यवसाय मार्गदर्शन
१९९० – १–२. १महाराष्ट्रातील आदिवासींची परिस्थिती
३. जागतिक अदिवासी
४. गं. बा. सरदार स्मृति विशेषांक
१९९१ – १. आदिवासी साहित्य संमेलन विशेषांक
२. आदिवासींच्या विकासात्मक व सांस्कृतिक समस्या
३. आदिवासी जीवन व संस्कृती
१९९२ – १–२. आदिवासी समाज जीवन
३–४. अनुताई वाघ विशेषांक
१९९३ – १–२. आदिवासी धर्म, सण व उत्सव
३–४. धरण – विस्थापन व पुनर्वसन
१९९४ – १. आदिवासी संस्कृती
२. आदिवासी एकता परिषद
३. आदिवासी विकासाची सैध्दांतिक भुमिका
४. आदिवासी जमाती
१९९५ – १–२. राणीपूर अभ्यास विशेषांक
३. कुपोषण विशेषांक
४. पर्यावरण विशेषांक
१९९६ – १. आदिवासी जमाती
२. महाराष्ट्र, ओरिसा अदिवासी अध्ययन
३. आदिवासी जमाती
४. आदिवासी शिक्षण
१९९७ – १–२. वारली लोकगिते व बोलीभाषा
३. पंचायत राज विशेषांक
४. साहित्य संमेलन विशेषांक
१९९८ – १. वृक्ष लागवड व संवर्धन विशेषांक
२. आदिवासी व प्रशासन
३–४. आदिवासी समाज व संस्कृती
१९९९ – १. आदिवासी व आर्थिक धोरण
२. आदिवासी विकास व संस्कृती
३–४. बोर्डी परिसर अभ्यास
२००० – १. आदिवासी जीवन, कला व मराठी साहित्य
२. स्त्रिया आणि आरोग्य
३. पाणी टंचाई आणि पाणलोट विकास
४. आदिवासी जीवन व संस्कृती
२००१ – १–२. अस्मिता व विकास विशेषांक
३. आदिवासी समाज व शासन
४. अस्मिता व विकास : दिशा २००१
२००२ – १. अदिवासी व उपेक्षित समाज : अस्मिता आणि विकास
२–३. पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प : महाराष्ट्र
४. पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प : पर्यायी उपाययोजना
२००३ – १–२. पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प : मध्यप्रदेश
३. आदिवासी समाज
४. आदिवासी संस्कृती
२००४ – १. पुस्तक परिचय
२. आदिवासी समाज व संस्कृती
३–४. आदिवासी विकास धोरण
२००५ – १. प्रस्तावित वनकायदा
२. डॉ. बानू कोयाजी स्मृती विशेषांक
३–४. आरोग्य व शिक्षण – नंदूरबार अभ्यास विशेषांक
२००६ – १–२. डॉ. इरावती कर्वे स्मृति विशेषांक
३–४. आदिवासी अस्मिता व साहित्य कला
२००७ – १–२ संस्कृती व समाज – आदिवासी पायाभूत सर्वेक्षण विशेषांक
३–४ आरोग्य– आदिवासी पायाभूत सर्वेक्षण विशेषांक
२००८– १. मिझोराम विशेषांक
२. स्वयंसेवी संस्था व आदिवासी विकास
३–४. डॉ. राज आरोळे गौरव विशेषांक
२००९– १. जव्हारचे आदिवासी जीवन व संस्कृती
२. आदिवासी गाबीत समाज
३. मंथन विशेषांक (आदिवासी व ग्रामीण कार्यकर्त्यांचे चर्चासत्र)
४. आदिवासी संस्कृती व विकास

Registered with the Registrar of Newspaper of India under No. 35835/80

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

## (द महाराष्ट्र असोसिएशन ऑफ ॲन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस - मास)

मानव विज्ञान या संज्ञेमध्ये मानव, समाज, संस्कृती व पर्यावरणाशी असलेले नाते याविषयी सर्वांगीण दृष्टीने अभ्यास करणाऱ्या सर्व विद्याशाखांचा अंतर्भाव होतो. महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेची स्थापना १९७६ साली पुणे विद्यापीठात झाली. शासन, सामाजिक कार्यकर्तेव संशोधक यांना एका व्यासपीठावर आणून आदिवासी ग्रामीण तसेच शहरी समाजातील लोकांच्या समस्या समजावून त्या सोडविण्यासाठी ज्ञान व अनुभवाचा उपयोग करणे हे परिषदेचे मुख्य ध्येय आहे. महाराष्ट्र राज्याचे पहिले आदिवासी सचिव - आयुक्त श्री. वसंत मंडलेकर हे संस्थेचे पहिले अध्यक्ष होते. त्यानंतर प्रा. गं. बा. सरदार, श्री जनार्दन वळवी, प्रा. पां. वा. सुखात्मे, प्रा. अ. रा. कुलकर्णी यांनी अध्यक्षपद भूषविले. आदिवासी भागात काम करणारे कार्यकर्तेतसेच आदिवासी साहित्यिक यांना महाराष्ट्रात प्रथमच परिषदेचे एका व्यासपिठावर आणले.

केवळ आदिवासींच्या प्रश्नांना वाहिलेले हाकारा त्रैमासिक गेली २५ वर्षेपरिषदेतर्फे प्रकाशित होत आहे. लोकांच्या समस्या त्यांच्या नजरेतून समजून, त्यांचा सहभागातून एकात्मिक विकास साधण्याची परिषदेची वैचारिक बैठक आहे. आर्थिक विकास व समता हे परिषदेचे ब्रीद आहे. आदिवासी उत्थान कार्यक्रमाद्वारे आदिवासी समाजाच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आदिवासी लोकांचे सबलीकरण करणे व त्या प्रक्रियेतून त्यांचा आत्मविश्वास, आत्मसन्मान व अस्मिता जागृत करणे हा परिषदेचा दृष्टिकोन आहे. त्याद्वारे बहुविध राष्ट्रीय सांस्कृतिक प्रवाहास आदिवासी संस्कृतिच्या योगदानाच्या निरंतर संधी प्राप्त होतील.

यापुढील काळामध्ये आर्थिक परिवर्तनाद्वारे सामाजिक क्षेत्रांचा विकास घडवून आणणाऱ्या सरकारी व स्वयंसेवी संस्थाच्या सहकार्याने वाटचाल करण्याचा परिषदेचा मानस आहे. परिषदेची कार्यकक्षा अधिक विस्तृत व्हावी या हेतूने दोन केंद्रांची स्थापना केली आहे.

१. स्वास्थ व विकास संशोधन केंद्र २. आदिवासी व ग्रामीण विकास केंद्र

### महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व

हाकारा वार्षिक सभासद १०० रुपये (व्यक्तींसाठी)
हाकारा वार्षिक सभासद १५० रुपये (संस्थासाठी)
परिषद आजीव सभासद १००० रुपये (व्यक्तींसाठी)

परिषदेच्या आजीव सभासदांना हाकारा विनामूल्य पाठविला जातो. आपले सदस्यत्व आणि वार्षिक / आजीव वर्गणी कृपया खालील पत्त्यावर महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद (द महाराष्ट्र असोसिएशन ऑफ ॲन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस) यांचे नावे डिमांड डाफ्ट अथवा मनिऑर्डर पाठवावी. मनिऑर्डर करताना फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव व पूर्ण पत्ता लिहिण्यास विसरू नये.

### पत्रव्यवहाराचा पत्ता

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, ६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११ ००७.

आपल्या क्रियाशील सहकार्याबद्दल धन्यवाद